**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४५

निर्णय दिनांक ०१-०९-२००९

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, : अपिलार्थी
पंचशीलनगर (मंजरथ रोड), माजलगांव,
तालुका माजलगाव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव,
तालुका माजलगाव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, माजलगाव व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी संगनमताने चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अशीही तक्रार केली आहे की, संबंधित अधिका-यांनी सन २००६ ते २००७ या वर्षाच्या निधी

अंतर्गत माजलगांव तालुक्यात नैसर्गिक आपत्तीत मंजूर झालेल्या रस्त्यांची कामे न करता कामाची बोगस बिले उचलून निधीचा अपहार केला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "सन २००६ ते २००७ या वर्षाच्या (एफ. डी. आर.) च्या निधी अंतर्गत माजलगांव तालुक्यात रस्त्याची कामे न करता कामाची बोगस बिले उचलून निधीचा अपहार केला" या विषयावर एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासनातर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीच्या आदेशाच्या प्रती, जिल्हाधिकारी कार्यालयास मंजूरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रत, जिल्हाधिकारी, बीड यांनी २००६ ते २००७ या वर्षी नवीन रस्ते तयार करण्यासाठी मंजूरी दिल्याची झेराक्स प्रत, कोणत्या गावास किती खर्च केला याची प्रत, झालेला रस्ता कोणत्या गावात झाला याची यादी व ग्रामपंचायतीचे नवीन रस्ते झाल्याचे लेखी उत्तर - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०५-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०४-२००८ रोजी माहिती पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर माहिती अधिका-याने केलेली कार्यवाही त्यांना माहित नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्यामुळे व्दितीय अपील सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दिनांक २८-०४-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपील अर्जाबरोबर कोणताही पुरावा जोडलेला नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीची, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माजलगांव तालुक्यातील नैसर्गिक आपत्तीत मंजूर झालेली रस्त्याची कामे न करता ती कामे झाल्याचे दाखवून बोगस बिले काढल्याबद्दल तक्रार असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या तक्रारीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे तसेच शासनाच्या गृह विभागाचे वेगळे प्राधिकरण अस्तित्वात आहे. अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी या सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करण्याचे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे संबंधित अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग केला आहे व आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव नि:संशयपणे सिध्द केला आहे. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दाव्याप्रीत्यर्थ आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत कोणताही पुरावा जोडला नसल्यामुळे व आज रोजी सुनावणीसाठी त्यांच्या दाव्याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्याने त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, पंचशीलनगर (मंजरथ रोड), माजलगांव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४६

निर्णय दिनांक ०१-०९-२००९

१ श्री. बालासाहेब दत्तराव लंगोटे, : अपिलार्थी
लंगोटे क्लिनिक, मौलाना आझाद रोड, महाराष्ट्र मेडीकल
समोर, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाकडे दिनांक २८-०३-२००२ ते २४-०५-२००२ या कालावधीकरिता टॅक्ट्रर भाडे तत्वावर दिले होते. तथापि या ट्रॅक्टरचे बील अपिलार्थीस

अद्यापही मिळाले नसल्याने अपिलार्थीने ते बील केव्हा देणार याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी हजर व जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी परभणी नगरपरिषदेस दिनांक २८-०३-२००२ ते २४-०५-२००२ या कालावधीकरिता त्यांचे ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.२२ - ए ९४०१ हे भाडे तत्वावर दिले होते. तथापि या ट्रॅक्टरचे भाडे परभणी नगरपरिषदेने त्यांना दिलेले नाही. हे थकीत भाडे नगर परिषद परभणीकडून त्वरीत प्राप्त व्हावे यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे थकीत बील केव्हा मिळणार याबाबत माहिती मागितली होती. तथापि त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी भाड्याने दिलेल्या ट्रॅक्टरचे बील त्वरित मिळावे एवढीच माफक अपेक्षा आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत

नाही. अपिलार्थीने माहितीच्या अधिकाराचा आधार घेऊन त्यांच्या थकीत बिलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडील कार्यवाही या प्रकरणी अपेक्षिली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारे अर्जदाराच्या वैयक्तीक विनंती अर्जाचा विचार करुन त्यावर अशा स्वरुपात निर्णय देणे अभिप्रेत नाही. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे बील केव्हा देणार ही भविष्यकाळातील माहिती मागितली आहे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसणार हे उघड आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात कोणतीही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) नुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमातील कलम ७ (१) व ७ (८) प्रमाणे कार्यवाही करणे सर्वसाधारण परिस्थतीत अपेक्षित होते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे कोणतीही कार्यवाही केली नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती द्यावी असे सूचित करुनही अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अकारण नाकारली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या या प्रकरणातील प्रथम अपील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे मान्य केले आहे व जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थितीत अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे आश्वासीत केले गेले आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी आपले आश्वासन पाळल्याचे दिसत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाच्या अशा प्रकारच्या वर्तनाव्दारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी (दिनांक २५-०२-२००८ ते २४-०३-२००८ या कालावधीत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात कोणतीही माहिती देय होत नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी (दिनांक २५-०२-२००८ ते २४-०३-२००८ या कालावधीत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बालासाहेब दत्तराव लंगोटे, लंगोटे क्लिनिक, मौलाना आझाद रोड, महाराष्ट्र मेडीकल समोर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४७

निर्णय दिनांक ०१-०९-२००९

१ श्री. जिवन रामराव उबाळे, : अपिलार्थी
रा. संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय. टी. आय. मागे,
नगर रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय वन अधिकारी यांचे कार्यालय,
जायकवाडी गेटजवळ, नगर रोड, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय वन अधिकारी, उपविभागीय वन अधिकारी
यांचे कार्यालय, जायकवाडी गेटजवळ, नगर रोड, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वन परिक्षेत्र अधिकारी, उपविभागीय वन अधिकारी कार्यालय, जायकवाडी गेटजवळ, नगर रोड, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही तसेच त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व

तसेच या प्रकरणी मुदतीत माहिती न दिल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - बीड जिल्ह्यामध्ये दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२००८ पर्यंत किती गावामध्ये त्यांनी वन व्यवस्थापन समित्यांची स्थापना केली आहे, त्या गावांचे नांव, तालुक्याचे नांव, स्थापन दिनांक, बीड जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र, तालुकानिहाय व गावनिहाय, वन क्षेत्राची टक्केवारी, वन विभागाच्या ताब्यात एकूण किती हेक्टर क्षेत्र आहे, गेल्या दोन आर्थिक वर्षात वन क्षेत्रामध्ये लागवड करण्यात आलेल्या रोपांची तालुकानिहाय माहिती व पावसाच्या प्रमाणाची सरासरी, वन विभागात दिनांक ०१-०७-२००७ ते ३१-०३-२००८ या कालावधीमध्ये वेगवेगळया योजना राबविण्यासाठी शासनाने किती रुपयाचे अनुदान दिले याची माहिती, व जानेवारी २००८ या महिन्यात जन माहिती अधिकारी यांच्या अखत्यारित रोजगार हमी योजने अंतर्गत तालुका निहाय कामावर उपस्थित असलेल्या मजुरांची उपस्थिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनिमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत. आयोगाकडे त्यांनी केलेल्या व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन करता

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना अपेक्षित असल्याचे व अपिलार्थीस माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची कार्यवाही आयोगाकडून अपेक्षित असल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-०७-२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, बीड वन विभागातील सहायक वन संरक्षकाचे पद दिनांक ०६-०७-२००८ पासून परभणी वन विभागामध्ये कायमस्वरुपी स्थलांतरीत करण्यात आले त्यामुळे माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार अतिरिक्त कार्यभार म्हणून वन परिक्षेत्र अधिकारी, बीड यांना देण्यात आला. या पदाचा अतिरिक्त कार्यभार पाहत असल्याने व कार्यालयात अपुरा कर्मचारीवर्ग असल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०७-२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत होती, त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे विहित केलेल्या कालावधीमध्ये आवश्यक तो प्रतिसाद देणे अनिवार्य होते. तथापि अशा प्रकारचा कोणताही प्रतिसाद त्यांनी अपिलार्थीस दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीच्या समर्थनार्थ त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेले समर्थन आयोगास मान्य नाही. मूळात माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार हे जादाचे काम आहे असे त्यांनी समजण्याचे कोणतेही कारण नाही, कारण माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी तो त्यांच्या दैनंदिन कार्यभाराचा अविभाज्य भाग आहे याची त्यांनी नोंद घेणे आवश्यक आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०७-

२००८ रोजीच्या पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेलल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील पावसाच्या प्रमाणाची सरासरी व मुद्दा क्रमांक २ मधील बीड जिल्ह्यातील गावनिहाय वन क्षेत्राची टक्केवारी ही माहिती पुरविली नसल्याचे दिसून येत आहे. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आश्वासीत केले. तसेच प्राप्त माहितीवर अद्यापपावेतो अपिलार्थीने त्यांचे कोणतेही लेखी भाष्य आयोगाकडे पाठविले नाही अथवा ते करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वर नमूद केलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची दखल न घेऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली मुद्दा क्रमांक २ व ४ मधील उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जिवन रामराव उबाळे, रा. संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय. टी. आय. मागे, नगर रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, उपविभागीय वन अधिकारी कार्यालय, जायकवाडी गेटजवळ, नगर रोड, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, उपविभागीय वन अधिकारी यांचे कार्यालय, जायकवाडी गेटजवळ, नगर रोड, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वन संरक्षक, प्रादेशिक, औरंगाबाद वनवृत्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४८

निर्णय दिनांक ०१-०९-२००९

१ श्री. धिरज बाबुराव कन्नावार, : अपिलार्थी
मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आखाडा
बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने त्यांना मिळालेली माहिती स्पष्ट व समाधानकारक नसल्याचे नमूद करुन त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यात आली नसल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे ग्रामविकास अधिकारी, आखाडा बाळापूर तालुका कळमनुरी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायतीने बांधलेल्या

ग्रामसचिवालयाच्या संदर्भात व या इमारतीसंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली आहे व प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे त्यांनी त्यांच्या विनादिनांकाच्या पत्रामध्ये कबूल केले आहे. त्यांच्या या युक्तिवादाप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले विनादिनांकाचे पत्र सादर केले असून या पत्रान्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील माहिती दिल्याचे कबूल केले आहे व आयोगास त्यांचा अपील अर्ज निकाली काढण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना प्राप्त झालेली माहिती अस्पष्ट व समाधानकारक नाही असेही म्हटले आहे. मात्र प्राप्त माहिती त्यांना असमाधानकारक का वाटते हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, परंतु माहिती प्राप्त झाल्याचे पत्र त्यांनी आयोगास लिहिले आहे. अपिलार्थी यांचे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये वेगवेगळया टप्प्यावरील विसंगत वर्तन लक्षात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धिरज बाबुराव कन्नावार, मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४९

निर्णय दिनांक ०१-०९-२००९

१ श्री. सुनिल श्रावण बनसोडे, : अपिलार्थी
मु. पो. नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इटकळ,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिल्याने व त्यांच्या प्रथम अपील अर्जाची या प्रकरणी सुनावणी झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - बारावा वित्त आयोग, यशवंत

ग्रामसमृध्दी योजना व दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत केलेल्या कामाची यादी, त्यांचा मंजूर निधी, खर्च व शिल्लक निधी, या योजनेअंतर्गत सुरु केलेली कामे पूर्ण झाली काय ? नसल्यास त्याची कारणे व त्यावर झालेला खर्च, उचललेली रक्कम, कोणत्या खर्चासाठी कोणत्या निधीतून किती रक्कम उचलली व शिल्लक किती यासाठी पासबुकातील व्यवहाराच्या पानाची झेरॉक्स, गावाच्या पाणीपुरवठा योजनेवर मंजूर झालेला निधी, खर्च झालेला निधी, शिल्लक निधी, कोणाकडून किती निधी मिळाला, कामे कोणामार्फत केली व वापरण्यात आलेल्या पाईपचा दर्जा, या कामाची गुणनियंत्रण कार्यालयामार्फत तपासणी झाली काय ? नसल्यास कारणे, या कालावधीत घेण्यात आलेल्या मासिक सभा व ग्रामसभा नियमाप्रमाणे घेण्यात आल्या का? असल्यास त्याच्या प्रोसेडिंगच्या झेरॉक्स प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी जानेवारी २००४ ते फेब्रुवारी २००८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे त्यांच्या पूर्वी काम करणा-या ग्रामसेवकाने कोणतेही दप्तर दिले नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती पुरविण्यास असमर्थता व्यक्त केली व त्यांच्याकडील उपलब्ध असलेले मासिक सभेचे दिनांक ११-१२-२००७ ते जानेवारी २००८ या कालावधीतील व ग्रामसभेचे दि. २६-०१-२००८ रोजीचे इतिवृत्त अपिलार्थीस उपलब्ध करुन दिले. प्राप्त झालेली माहिती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त झाली नाही. त्यांना प्राप्त झालेली माहिती ही अर्धवट व चुकीची आहे. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी मागणी केलेल्या एकूण सहा मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात त्यांना काही माहिती प्राप्त झाली आहे. या मुद्दयाव्दारे त्यांना फक्त आर्थिक वर्ष २००८ च्या संदर्भातील माहिती प्राप्त झाली आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे जानेवारी २००४ ते फेब्रुवारी २००८ या कालावधीतील माहिती मागितली होती, ती त्यांना अद्याप प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर येण्यापूर्वी श्री. मोकाशी व श्रीमती तांबोळी यांनी त्यांच्याकडे बदली झाल्यानंतर आवश्यक ते दप्तर हस्तांतरीत न केल्यामुळे ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाहीत. आता ते अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ मधील योजनेअंतर्गत सुरु केलेली कामे पूर्ण झाली काय ? नसल्यास त्याची कारणे व मुद्दा क्रमांक ५ मधील वरील कामाची गुणनियंत्रण कार्यालयामार्फत तपासणी झाली काय ? नसल्यास कारणे ही माहिती अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाबद्दलची अथवा कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे मागणे अनुज्ञेय नाही. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीस अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस त्यांना अर्धवट माहिती प्राप्त झाली हा युक्तिवाद, तो सिध्द झाल्याने आयोग मान्य करीत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या

माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे कर्तव्य पार पाडले न गेल्याचे कारण म्हणजे ज्या पातळीवर त्यांनी कार्यभार स्वीकारला त्यावर या पदावर पूर्वी कार्यरत असणारे श्री. मोकाशी, श्रीमती तांबोळी यांनी संबंधित अभिलेखे त्यांच्याकडे सोपविले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त श्री. मोकाशी व श्रीमती तांबोळी यांच्याविरुध्द, त्यांनी बदली झाल्यानंतर आपल्या पदभाराशी संबंधित अभिलेखे नंतर येणा-या अधिका-याकडे न सोपविल्याबद्दल, त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे आवश्यक ती शिस्तभंगविषयक कारवाई करावी. जर अद्यापही अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ज्या दप्तरामध्ये आहे ते दप्तर उपलब्ध होत नसेल तर संबंधितांच्या विरुध्द फौजदारी कारवाई करण्याचा देखील त्यांनी विचार करावा.

आयोगास देखील गेल्या ३ वर्षामध्ये त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या ग्रामपंचायतीशी संबंधित अपिलांवर सुनावणी घेतांना असे आढळून आले आहे की, ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कार्यरत असलेले ग्रामसेवक /ग्राम विकास अधिका-यांच्या कार्यालयांची संबंधित गट विकास अधिकारी यांच्याकडून नियमितपणे दप्तर तपासणी होत नाही. तसेच ग्रामसेवकांची अथवा ग्रामविकास अधिका-यांची बदली झाल्यानंतर त्यांचा पदभार नंतर येणा-या अधिका-याकडे व्यवस्थित हस्तांतरीत केला जात नाही. बहुतांश प्रकरणी तो हस्तांतरीत न करता संबंधित ग्रामसेवक हे त्यांच्या बदलीच्या नवीन ठिकाणी आपल्या जुन्या कार्यालयातील दप्तर घेऊन जात असतात. त्यामुळे कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाकडे पूर्वीची कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे ते माहिती देऊ शकत नाहीत. अशा प्रकारास वेळीच आळा घालण्याकरिता सचिव (ग्राविवि) यांना असे सूचित करण्यात येते की, ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी यांची एका ठिकाणाहून बदली झाल्यानंतर त्यांनी आपला कार्यभार व त्यांच्याकडील उपलब्ध असलेले इतर अभिलेखे त्यांच्यानंतर येणा-या अधिका-याकडे कशाप्रकारे व किती कालावधीत हस्तांतरीत करावे, प्राप्त

झालेल्या कार्यभाराबद्दल कार्यभार घेणा-या ग्रामसेवकाने त्यांच्यावर अभिप्राय नोंदविण्यासाठी निश्चित कालावधी, त्यांची दप्तर तपासणी इत्यादी संदर्भात त्यांच्या स्तरावरुन सर्व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना सूचना देणारे एक परिपत्रक जारी करावे जेणेकरुन अशा तक्रारी या संदर्भात यादृष्टीने टाळता येतील.

या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेपर्वा कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती वाघमोडे, यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०१-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुनिल श्रावण बनसोडे, मु. पो. नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इटकळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५०

निर्णय दिनांक ०१-०९-२००९

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपिलार्थी
मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, प्रेमनाथ निवासी अपंग विद्यालय, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो माहिती न दिल्याने, जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो जवाब न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यावर शिस्तभंगविषयक किंवा दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या उपरोक्त विद्यालयासंबंधी जून १९९५ ते डिसेंबर २००७ या कालावधीतील काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन अर्जासोबत पुरावा जोडल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक २३-०१-२००८ रोजीचा कथित अर्ज त्यांना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून दिनांक ०२-०७-२००८ रोजी प्रथमतः प्राप्त झाला. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या पत्राने पाठविली. यासंदर्भातील पोस्टाची पावती त्यांनी आयोगास दाखविली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तथापि या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडला नव्हता, तरीही त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती विनामूल्य पाठविली आहे. अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि ही माहिती ऑडिट रिपोर्टमध्ये समाविष्ट असल्याने अपिलार्थीस पुरविली नसल्याचा जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक ११-०८-२००८ रोजी व दिनांक ३०-०८-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी व मुख्याध्यापक हे गैरहजर असल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे न केल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज प्रेमनाथ निवासी अपंग विद्यालयातील जन माहिती अधिकारी यांना मुदतीत प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते परंतु यासंदर्भात त्यांनी कोणताही वैध पुरावा त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडला नव्हता. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये गंभीर त्रुटी असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०६-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर, आवश्यक ती माहिती दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारेअपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही आक्षेप आयोगाकडे लेखी स्वरुपात प्राप्त झाले नाहीत अथवा तोंडी स्वरुपात आयोगापुढे म्हणणे मांडण्यासाठी आज अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्रेमनाथ निवासी अपंग विद्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५१
निर्णय दिनांक: ०१-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सुनिल माणिकराव कांबळे,<br>नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (रो.ह.यो.),<br>इस्लापूर, ता.किनवट, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (रो. ह.यो.),<br>नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये माहे मे ते ऑक्टोबर, २००७ या कालावधीतील महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी, खर्च, कामाच्या मस्टरची सत्यप्रत, मजूरांचे पगारपत्रक व मोजमाप पुस्तिकेची सत्यप्रत -

अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन, जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १०.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०४.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नुकतेच बदलून आले असून अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज करतेवेळी श्री. प्रकाश अंबादास कुलकर्णी नावाचे वनपरिक्षेत्र अधिकारी (सध्या माहूर येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी वाचली असून ही माहिती पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस पुरविण्यात येईल, असे आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतया देय होत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१)च्या तरतुदीप्रमाणे कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे कबूल करुनही त्यांनी आजतागायत अपिलार्थीस माहिती पुरविलेली नाही, असे उपलब्ध कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीस माहिती देणे, हे जन माहिती अधिकारी यांना क्लिष्ट वा अवघड वाटावे, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्याच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कृतीचे मूळात समर्थन अस्तित्त्वातच असू शकत नाही. अपिलार्थीस अशाप्रकारे कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे, अशी आयोगाची खात्री झालेली आहे. संबंधित जन माहिती अधकारी हे आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. प्रकाश अंबादास कुलकर्णी सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर या पदावर कार्यरत) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून, असद्‌हेतूने वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. प्रकाश अंबादास कुलकर्णी) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल माणिकराव कांबळे,मु. जयभिमनगर, पो.शिवाजीनगर, नांदेड-४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,इस्लापूर, ता.किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रो. ह.यो.),नांदेड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. प्रकाश अंबादास कुलकर्णी, सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी, माहुर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालव्दारे)

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५२
निर्णय दिनांकः ०१-०९-२००९

१. श्री. जी.एस. रायबोळे, : अपिलार्थी
किनवट,जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
ग्रामीण रुग्णालय,गोकुंदा,
ता.किनवट, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक,
गुरु गोविंदसिंगजी जिल्हा रुग्णालय,नांदेड
प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वैद्यकीय अधीक्षक,
उपजिल्हा रुग्णालय, गोकुंदा,
ता.किनवट,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामीण रुग्णालय,गोकुंदा येथील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या संदर्भात सन २००८-०९ मधील काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नक्की केव्हा प्रतिसाद दिला, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. परंतु या प्रकरणी अपिलार्थीने कलम १९(१) व कलम १९(३) नुसार अनुक्रमे जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे प्रथम व द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आह.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या त्यांना उद्देशून लिहिलेल्या दि. १०.०८.२००९ रोजीच्या पत्राची एक प्रत आयोगास सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना दि.२५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने प्रथम व द्वितीय अपील दाखल केल्यानंतर पूर्णपणे मिळाल्याचे व प्राप्त माहितीच्या संदर्भात त्यांची काहीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांतील मजकूराचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते.या सर्व मुद्यांचा एकत्रितपणे विचार करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती “व्यक्तिशः” या माध्यमाव्दारे मागितली असल्यामुळे ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व अपिलार्थीचे होते. हे उत्तरदायित्त्व अपिलार्थीने कशाप्रकारे पार पाडले, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. या सर्व बाबी एकत्रितपणे लक्षात घेता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ११५२/०८, दि. १३.०६.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०१-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जी.एस. रायबोळे,मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकुळ,किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक,उपजिल्हा रुग्णालय, गोकुंदा, ता. किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,गुरु गोविंदसिंगजी जिल्हा रुग्णालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५३
निर्णय दिनांकः ०१-०९-२००९

१. श्री. शिंदे काशिनाथ नारायण, : अपिलार्थी
किनवट,जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),
किनवट, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (जं.का.स.),
किनवट, जि.नांदेड

त्रयस्थ पक्षः श्री. गोबरा प्रकाश राठोड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाद्वारे भरणा करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे तलाठी सजा व वनरक्षक कार्यक्षेत्र, अंबाडी अंतर्गत शेतजमीन क्र.१११ व १०४ चे मालक श्री. गोबरा प्रकाश राठोड

यांनी त्यांच्या शेतातील सागी वृक्ष कटाईच्या परवानगीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या संचिकेच्या छायाप्रतींची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१०.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २३०/- इतके चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा किनवटमध्ये करुन शुल्क भरल्याचे चलन जन माहिती अधिकारी यांना दि. १६.०४.२००८ रोजी सादर केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणासंदर्भात त्यांच्याकडील कागदपत्रे आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. तसेच ही माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कुठलाही प्रत्यवाय असू नये. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे

अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा किनवट येथे दि. १६.०४.२००८ रोजी भरले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी शुल्काचा भरणा करण्यासाठी लिहिलेल्या पत्राचा दिनांक व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्काचा भरणा करुन त्यासंदर्भातील चलनाची प्रत ज्या दिवशी सादर केली, तो दिनांक पाहता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस उशिरात उशिरा दि.०९.०५.२००८ रोजी ही माहिती सशुल्क देय होत आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून आवश्यक ते माहितीपोटीचे शुल्क आकारुनही, दि. ०९.०५.२००८ ही मुदत व्यपगत झाल्यानंतर, अपिलार्थीस दि. ०९.०६.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही अभिप्राय नाहीत. मात्र सशुल्क माहिती देण्यासाठीचा अनुज्ञेय कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती न देता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी शुल्क आकारले आहे, ही जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २३०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दि. ०९.०६.२००८ रोजी पुरविली आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २३०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिंदे काशिनाथ नारायण,मु.पो.इस्लापूर, ता. किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.सं),किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५४
निर्णय दिनांकः ०१-०९-२००९

१. श्री. गजानन बापूराव पाटील, हदगाव, जि.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, उपवनसंरक्षक कार्यालय,नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.), नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती उपवनसंरक्षक कार्यालयात उपलब्ध असताना जाणीवपूर्वक वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाकडून घेण्याचे त्यांना सूचित केले जात असल्याने व ही माहिती देण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्या संबंधितांच्यावर तात्काळ कारवाई करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करवून घेण्याकरिता त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येत असलेल्या सर्व कामांच्यासंदर्भात एकूण बारा मुद्यांद्वारे व्यापक स्वरुपातील माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी व सहायक वनसंरक्षक यांच्याकडून परस्पर प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना परत केला. यानंतर त्यांनी दि. १०.०४.२००८ रोजीच्या ज्ञापनाद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत सर्व संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर परत दि. २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २१५८/- इतक्याचे चलन तयार करुन या रकमेचा भरणा बँकेत करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा नांदेड येथे रु.२१५८/- इतके शुल्क चलनाद्वारे भरणा केले. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे  अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १५.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय कळवून अपिलार्थीस संबंधित  जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी  उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता त्यांच्या युक्तिवादाद्वारे स्पष्ट केली.

जन माहिती अधिकारी यांना आयोगाने अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार आहे किंवा कसे याची विचारणा केली असता, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील फक्त मुद्दा क्र. ८ च्या संदर्भातील माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्यांनी प्रथमत: अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्याची कार्यवाही, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत करणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही व त्यांच्या दि. ०३.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून परस्पर माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित करुन अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज अपिलार्थीस परत केला. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २१५८/- इतके स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या नांदेड शाखेमध्ये दि. ०८.०५.२००८ रोजी केला. तथापि आजतागायत अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधितांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील एकूण १७५ कामांची १२ मुद्यांद्वारे विस्तृत प्रमाणात माहिती मागविली आहे. ही माहिती अर्थातच जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीने संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडून प्राप्त करुन घेणे या प्रकरणी गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. याही पेक्षा महत्त्वाचे

असे आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांना निश्चितपणे कोणत्या कालावधीच्या संदर्भात माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे, याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. या मुद्यावर त्यांच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने, "३० दिवस"असा उल्लेख केला आहे. यावरुन फक्त एवढे अनुमान काढण्यात येते की, अपिलार्थीस तीस दिवसात माहिती अपेक्षित असावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र ग्रामीण रो.ह.यो.संदर्भात माहिती मागितली आहे. ही योजना सातत्याने चालणारी निरंतर अशा स्वरुपाची आहे. त्यावरुन अपिलार्थीस नेमकी कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे, याचा उल्लेख त्यांनी आपल्या मूळ अर्जामध्ये करणे आवश्यक होते. कारण जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही कालावधीशी संबंधित माहिती अपिलार्थीस दिल्यास ती माहिती त्यांना सदैव अपूर्णच वाटणार. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील, त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीशी संबंधित कालावधी स्पष्टपणे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळ्याने अर्ज करावा व संबंधितांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी रु. २१५८/- इतके शुल्क कशाच्या आधारे काढले याचा तपशील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रात नाही. वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना अपेक्षित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूणपणे, त्यांनी विशिष्ट कालावधीचा उल्लेख केल्याशिवाय प्राप्त होऊ शकणार नाही व या करिता अपिलार्थीस वेगळ्याने नवीन अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे करावा लागणार आहे. पूर्वीच्या अर्जाकरिता अपिलार्थीने रु. २१५८/- इतके शुल्क आधीच जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले आहे. हे पाहता अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीपोटीचे भरलेले शुल्क रु. २१५८/- इतके त्यांना तात्काळ परत करणे न्यायोचित ठरेल, असे आयोगास वाटते. सबब  जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी

अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २१५८/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २१५८/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्री. गजानन बापूराव पाटील,जिजाऊनगर, न.पा.कार्यालयाच्या पाठीमागे, हदगाव, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उपवनसंरक्षक कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५५
निर्णय दिनांक: ०१-०९-२००९

१. श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार, : अपिलार्थी
किनवट, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
किनवट, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
किनवट, जि.नांदेड
प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, किनवट,जि.नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०४.२००८ रोजी सुनावणी ठेवूनही कोणताही निर्णय न दिल्याने व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाअंतर्गत रो.ह.यो. व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना या दोन योजनांतर्गत सन २००६ ते दि. ०७.०२.२००८ या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या

कामासंदर्भात विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०३.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५०४/- अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरणा करण्याचे सूचित केले. तथापि या प्रमाणे शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही आदेश पारित न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे, अपिलार्थीस देण्यासाठी, तयार आहे. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्याने त्यांनी दि. ०३.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५०४/- इतके त्यांना चलनाद्वारे भरणा करण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने आजही शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केल्यास ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकतील. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, त्यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी अपेक्षित केल्यास त्यांच्या अर्जासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याकरिता अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित होऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात यासंदर्भात कधीही उपस्थित राहिले नाहीत. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०३.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे आवश्यक त्या तपशीलासह सूचित केले आहे. परंतु या शुल्काचा भरणा अपिलार्थीने या संपूर्ण घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर करण्याची तयारी दर्शविली नाही. एवढेच नव्हेतर आपल्या अर्जाच्या संदर्भात पुढील कार्यवाही ज्ञात करुन घेण्याकरिता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी कधीही संपर्क साधला नाही. आज रोजी देखील अपिलार्थी त्यांच्या अशाप्रकारच्या कथित भूमिकेसंदर्भात स्पष्टीकरण करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी असद्‌हेतूने टाळलेले नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार,रा. पो. सरस्वती विद्या परिसर, हनुमानमंदिराजवळ, किनवट, ता. किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७४८
निर्णय दिनांक: ०१-०९-२००९

१. श्री. राजेंद्र हरीनारायण शर्मा, : अपिलार्थी
नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, हिमायतनगर,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, हिमायतनगर,जि.नांदेड

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,
हिमायतनगर,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष: श्री. पळशीकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो मिळालेली नाही व तसेच त्यांनी या प्रकरणी केलेल्या प्रथम अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता विनामूल्य प्राप्त व्हावी व या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांच्यावर व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष श्री. पळशीकर, हिमायतनगर मुख्यालय येथील केरोसीन पंपधारक यांनी जानेवारी २००६ ते नोव्हेंबर २००६ या कालावधीमध्ये कोणकोणत्या कार्डधारकांना किती केरोसीन वाटप केले याची यादी व विक्री केलेल्या केरोसीनच्या रजिस्टरची सत्यप्रत - ही माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८०००/- इतके भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि असे कोणतेही पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या मूळ माहितीची मागणी आपल्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ही माहिती त्यांना त्रयस्थ पक्ष श्री. पळशीकर यांच्याकडून उपलब्ध करुन घेऊन, तदनंतर ती अपिलार्थीस द्यावी लागणार आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असू शकत नाही. या प्रकरणी त्रयस्थ पक्ष श्री. पळशीकर यांनी दि. ०३.०७.२००७ रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची उपलब्धता त्यांना कळविल्यामुळे त्यांनी दि. ०५.०७.२००७ रोजी अपिलार्थीस, त्रयस्थ पक्षाने त्यांना

कळविल्यानुसार,  रु. ८,०००/- इतके माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले. आता ते अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

त्रयस्थ पक्षाने, अपिलार्थीने त्यांच्या संदर्भात मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या नियंत्रणाखालील केरोसिन विक्री परवानाधारक श्री. पळशीकर यांच्याकडे उपलब्ध व त्यांच्या प्रत्यक्षात ताब्यात असलेली माहिती मागविली होती. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना श्री. पळशीकर यांच्यावर अवलंबून राहावे लागत आहे. श्री. पळशीकर यांच्यावर जन माहिती अधिकारी यांचे परवाना देणारे प्राधिकरण (Licensing Authority ) म्हणून नियंत्रण आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १८.१२.२००६ रोजीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ मधील विहीत मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात तसे कळविणे आवश्यक होते. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतः होऊन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्रयस्थ पक्षाकडील माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल.  हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १८.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. राठोड, (सध्या अव्वल कारकून या पदावर हिमायतनगर येथे कार्यरत) यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील

कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची जिल्हाधिकारी, नांदेड यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, नांदेड यांना संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी नायब तहसीलदार (श्री. राठोड, सध्या अव्वल कारकून, तहसील हिमायतनगर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र हरीनारायण शर्मा, संपादक, नांदेड पोलखोल, एस. पी. ऑफीसच्या मागे, वजिराबाद,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, हिमायतनगर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिमायतनगर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११९८

निर्णय दिनांक ०२-०९-२००९

१ श्री. आनंद जयराम बनसोडे, : अपिलार्थी
मु. पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर यांच्याकडे महार हाडोळा जमिनीविषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - महार हाडोळा जमिनीची जिल्हाधिका-यांची परवानगी न घेता विक्री करता येते का ? जर विनापरवानगी जमिनीची विक्री केली तर फेरफार

नोंदी करता येतात का ? जर नोंदी घेता येत नसेल तर फुलाबाई बनसोडे यांची माहार हाडोळा जमीन गट नंबर १३९ चे फेर कोणत्या अधिकाराखाली घेण्यात आले ? व महार हाडोळा ७० वर्षापासून रेकॉर्डला असतांना तलाठी साहेबांनी माहार हाडोळा लिहिण्याचे बंद केले त्याचे कारण - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेली मुदत संपून गेल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिनांक १३-०१-२००९ रोजी प्राप्त झाली. तथापि या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित समाधानकारक माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पोस्टाने माहिती पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या त्यांच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या चार मुद्दयांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक तीन वगळता अपिलार्थीस उर्वरित तीन मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. कारण ती माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात व अर्जदाराने विनंती केल्याप्रमाणे हस्तांतरण / पाठविण्याविषयी अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणे इत:पतच प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अर्जदारास जन माहिती अधिका-याकडून त्यांचे वैयक्तीक अभिप्राय अथवा त्यांची मते मागता येणार नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक १, २ व ४ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तीक अभिप्राय व त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षित करणारी माहिती विचारल्याचे दिसून येते, जे चुकीचे आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देय आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या मुद्याशी संबंधित माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले नाही असे अपिलार्थीने आज युक्तिवादामध्ये आयोगास स्पष्ट केले. आयोगास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या कथित माहितीतील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात, त्यांनी अपिलार्थीस स्पष्टपणे माहिती दिली नसल्याचे आढळून येत आहे. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने " महार हाडोळा जमीन गट क्रमांक १३९ चे फेर कोणत्या अधिकाखाखाली घेण्यात आले " ही माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. या जमिनीवर फेर घेण्यात आला असल्याचे व फेर घेण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर संबंधित तलाठ्यास मंडळ अधिका-याच्या मंजुरीनंतर हक्क आहे, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले आहे, हे पाहता महसूल विभागातील कार्यपध्दतीमध्ये संबंधित महसूल अधिनियमातील ज्या कलमाव्दारे तलाठी व मंडळ अधिकारी यांना हे अधिकार प्राप्त झाले आहेत त्या कलमाची प्रत अपिलार्थीस देणे या ठिकाणी जास्त संयुक्तीक व सुसंगत राहिले असते. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांनी या संदर्भात पुरविलेल्या कथितवरुन या "माहिती"चा अर्थबोध आयोगास होत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी वर स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जातील माहिती त्यांना देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांचे पूर्ण वर्तन नकारात्मक असे राहिल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांचे अशाच प्रकारचे मत नोंदविले आहे. त्यांनी त्यांच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याचा निष्कर्ष काढूत त्यांचे " माहिती अधिकाराचे प्रकरणात गांभीर्यपूर्वक लक्ष देत नसल्याचे माझे मत झाल्याने ............ " अशा प्रकारचे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांच्या वर्तनावर नोंदविले आहेत. अपिलार्थीस जरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातून दिनांक २७-११-२००८ रोजी माहिती पाठविल्याचे नमूद केले असले तरी या पत्राची दिनांक १९-१२-२००८ रोजी जावक नोंदवहीत नोंद घेतली गेली आहे व अंतीमतः हे पत्र अपिलार्थीस या नोंदीनंतर २४ दिवसाचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर प्राप्त झाले आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये माहिती देण्यासाठी विशिष्ट कालावधी हा या अधिनियमाचा गाभा आहे. या कलमांमध्ये विहीत केलेल्या मुदतीत प्रत्येक टप्प्यावरील कार्यवाही विहित केलेल्या कालावधीत होणे हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. या प्रकरणी नेमके जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना प्राप्त झालेला माहितीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झाला असल्याने, असे घडणे अपेक्षित असतांना देखील त्यांनी अपिलार्थीने दिनांक २२-०९-२००८ रोजी विचारलेली माहिती अपिलार्थीस २७-११-२००८ रोजी उपलब्ध करुन दिली. प्रत्यक्षात तर अपिलार्थीस ही माहिती आणखी विलंबाने प्राप्त झाली. अपिलार्थीने मागणीसाठी केलेल्या अर्जाचा व अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याचा दिनांक मधील व्यपगत कालावधी लक्षात घेता अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे एकटेच जबाबदार नाहीत तर त्यांना या प्रकरणी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक, जावक विभागाचे सर्व सहायक हे

एकत्रितपणे जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी श्रीमती सविता चौधर नावाच्या तहसीलदार या पदावर कार्यरत होत्या. सध्या त्या उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये तहसीलदार, वाशी या पदावर कार्यरत आहेत.

उपरोक्त प्रकरणी श्रीमती सविता चौधर व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व सहायक कर्मचा-यांनी ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे या सर्वांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी विलंबाने प्रतिसाद देऊन व माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव निःसंशयपणे स्पष्ट केला असल्याची आयोगाची खात्री झाली आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती सविता चौधर (सध्या तहसीलदार, वाशी, जिल्हा उस्मानाबाद या पदावर कार्यरत) व यासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती देण्याच्या दृष्टीने सध्याचे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती सविता चौधर (सध्या तहसीलदार, वाशी, जिल्हा उस्मानाबाद या पदावर कार्यरत) व यासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक या सर्वांवर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आनंद जयराम बनसोडे, मु. पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११९९

निर्णय दिनांक ०२-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. धनराज उत्तमराव गित्ते,<br>मिश्रा निवास, पंचशिलनगर, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बीड | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. इंदाकर गोपाळ खांडेकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अनुचित हेतूने सदर अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे हस्तांतरीत केले. त्यामुळे अपिलार्थी विनाकारण माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावण्यात यावी व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. इंदाकर गोपाळ खांडेकर यांच्या दिनांक १८-१२-२००० रोजीच्या पत्रावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात एकूण चार मुद्याव्दारे दिनांक ०१-१२-२००० ते ३१-१२-२००० या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाने अपेक्षिली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषे-खालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तथापि आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे दिनांक २४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांची जन अपिलीय अधिकारी यांची नेमणूक झाली असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीचे अपील दिनांक २५-०७-२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे निर्णयासाठी पाठविले व या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली. तथापि यानंतरही अपिलार्थीस त्यांच्या अपील अर्जासंदर्भात काहीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी सुनावणी घेऊन या अपील अर्जावर प्रथम निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना असे आदेशित करण्यात येते की,

उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसाच्या आत त्यांनी सुनावणी घ्यावी व या कालावधीतच आपले आदेश पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसाच्या आत सुनावणी घ्यावी व या कालावधीतच आपले आदेश पारीत करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनराज उत्तमराव गित्ते, मिश्रा निवास, पंचशिलनगर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२००

निर्णय दिनांक ०२-०९-२००९

१ श्री. विष्णू महादेव आंधळे, : अपिलार्थी
मु. मरळवाडी, पो. मांडवा, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जलस्वराज्य प्रकल्प विभाग, जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत मरळवाडी, ता. परळी (वैजनाथ), जि. बीड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी (वैजनाथ), जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी ते स्वतः अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २६-०८-२००९ रोजीचे पत्र आयोगासमोर सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३१-०५-२००८ रोजी प्राप्त झाली असून प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याने दिनांक ०२-०९-२००९ रोजी ठेवलेली सुनावणी रद्द करण्यात यावी.

खुद्द अपिलार्थीने आयोगास विनंती केलेल्या पत्रातील मजकूर पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील त्यांना माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांना चालवावयाचे नाही, असे दिसून येते त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १२००/२००८ दिनांक ११-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विष्णू महादेव आंधळे, मु. मरळवाडी, पो. मांडवा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मरळवाडी, ता. परळी (वैजनाथ), जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती परळी (वैजनाथ), जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०१

निर्णय दिनांक ०२-०९-२००९

१ श्री. संदिपान अप्पाराव थोरात, : अपिलार्थी
मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, धारुर, तालुका धारुर,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्य, महिला कला महाविद्यालय,
यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, बीड,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपर्यंत निर्णय दिला नाही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्ण माहिती न दिल्यामुळे विलंबाच्या प्रतिदिनी २५० रुपये प्रमाणे त्यांचेवर शास्ती लावावी, अपिलार्थीस नाहक त्रास झाल्यामुळे या प्रकरणी त्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करावेत, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १. या कयद्याच्या कलम ४ (१) प्रमाणे व सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक केंद्रीय माहितीचा अधिकार २००५/परिपत्र क्र. १९०/०५/५ मंत्रालय मुंबई-३२ दि. १८/६/२००५ अन्वये १७ कामे सर्व प्राधिकरणानी आपल्या कार्यालयाने करणे बंधनकारक करण्यात आले होते. या सह केंद्र शासनाच्या दि. २६ मे २००५ च्या आदेशही आपणाकडे शासनाने दिलेला आहे. या १७ कामांची (आपण मुदतीत केलेल्या) कामाची परीपुर्ण माहिती.

२. आपल्या महाविद्यालयात १२ जुलै २००३ ते ३० जानेवारी २००८ पर्यंत किती प्राध्यापाक तासिका तत्वावर शिकवत होते. कोणत्या प्राध्यापाकास कोणते विषय शिकवत होते. ते प्राध्यापक कोणत्या पात्रतेवर घेतले होते. त्या प्राध्यापकाची वेतन कोणकोणत्या तारखेस व किती देण्यात आले होते, व प्रत्येक प्राध्यापकाच्या बँकेतील खात्यासह माहिती द्यावी. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत अपिलार्थीकडे सविस्तर खुलासा मागितला व मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे तयार आहे व ती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क रुपये ५० इतके डी. डी. व्दारे महाविद्यालयामध्ये जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील एका मुद्दयावरील माहिती दिनांक ०४-०४-२००८ रोजी त्यांना दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे केले. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती

झाली नसल्याने त्यांनी दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस सहायक संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे अपील करण्याचे सूचित केले. यानंतर दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या पत्राद्वारे विभागीय सह संचालकांनी अपिलार्थीस सदरचे अपील संबंधित महाविद्यालयातील अपिलीय अधिकारी यांच्याकडे करण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर काय निर्णय झाला हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन आढळून येत नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने दिनांक २७-०८-२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आपला युक्तिवाद आयोगास लेखी पत्राव्दारे पाठविला आहे. त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, प्राचार्याच्या अशा कृतीमुळे त्यांना प्रथम व व्दितीय अपील करण्याची वेळ आली व त्यांचे मानसिक, आर्थिक व वेळेचे फार मोठे नुकसान झाले. त्यामुळे या आर्थिक मानसिक त्रासापोटी रुपये २००० इतकी नुकसान भरपाई त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांना एक दिवसाचाही दंड कमी करु नये व त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. त्यांनी या युक्तिवादामध्ये असेही नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून उशिरा माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री. अंबादास ए. कवरे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व्दारे १७ कामांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि ती कामे कोणती याचा त्यांना अर्थबोध न झाल्याने व अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती स्पष्टपणे न मांडल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस यासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित मुदतीत खुलासा विचारला व त्यातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती तयार होती ती अपिलार्थीस देण्यासाठी आवश्यक ते शुल्क रुपये

५० इतके भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा त्यांचा कोणताही उद्देश त्यावेळी नव्हता व आजही तो नाही. या प्रकरणी अपिलार्थीने शुल्काचा भरणा त्यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०४-०४-२००८ रोजी माहिती पुरविण्यात आली व तदनंतर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे विनामूल्य पुरविण्यात आली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविण्यात आली असल्याने अपिलार्थीपासून जाणुनबुजून जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडविली नव्हती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १८-०६-२००५ अन्वये पारीत केलेल्या परिपत्रकातील १७ कामांच्या संदर्भात माहिती मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (१) च्या तरतुदीनुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे सर्व अभिलेखे अधिनियमातील कलम ४ (१) (ख) नुसार एकूण १७ उपकलमाव्दारे प्रसिध्द करणे सर्व प्राधिकरणास आवश्यक आहे. अपिलार्थीस अधिनियमातील १७ कामांच्या संदर्भातील माहिती अपेक्षित होती. तथापि त्यांना या माहितीची मांडणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना स्पष्टपणे करता आली नाही. त्यामुळे विहित मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे काही अंशी निश्चितपणे जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील लेखी युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. या मुद्दयासंदर्भात असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक तो खुलासा मागितल्यानंतर अशा प्रकारचा कोणताही खुलासा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये सादर केल्याचे

आयोगास आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देणे हे ज्या प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे, त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना अर्जदाराने ती स्पष्ट स्वरुपात मागणे हे अपिलार्थी यांचे कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या याच कर्तव्याचा विसर पडला व त्यांनी अस्पष्ट स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. एवढेच नव्हे तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचे स्वरुप स्पष्ट करण्यासाठी कळविले असता त्यास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर अथवा दुष्ट हेतूने अपिलार्थीपासून आवश्यक ती माहिती दडविली किंवा माहिती देण्यासाठी असद्‌हेतूने टाळाटाळ केली असे विचाराधीन अपिलाशी संबंधित संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीपासून कोणतीही माहिती जाणुनबुजून विलंबाने देण्याचा हेतू आयोगास आढळून आला नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही करवाई आयोग आदेशित करत नाही. तसेच उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस निश्चितपणे कोणता मानसिक व आर्थिक त्रास झाला व त्यांचे कोणते नुकसान झाले याचा कोणताही तपशील त्यांच्या आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांनी दिला नसल्यामुळे, अपिलार्थीची नुकसानभरपाईची मागणी देखील आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने अपेक्षित केलेली सर्व माहिती व वस्तुस्थिती याचा विचार करता, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संदिपान अप्पाराव थोरात, मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महिला कला महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, बीड, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०२

निर्णय दिनांक ०२-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलास लोकरे,<br>पाटील गल्ली, किल्ले धारुर, तालुका धारुर,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र,<br>उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा रजिस्ट्रार,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०९-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता माहिती अधिका-याने त्यांना अर्धवट माहिती दिली व त्या नाराजीने त्यांनी प्रथम अपील दाखल केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर कलम २० प्रमाणे प्रतिदिनी

२५० प्रमाणे शास्ती लावण्यात यावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्यात यावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जो त्यांनी जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक ०९-०५-२००८ रोजी सादर केला त्याव्दारे, त्रयस्थ पक्ष कु. भारती व्ही. लोकरे व श्री. व्ही. बी. लोकरे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जासंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे व तसेच अधिनियमातील कलम ४ (१) अन्वये सर्व प्राधिकरणांनी करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन आढळून येत आहे. या प्रकरणी आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही अथवा अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश पारीत केले नाही त्याचा परिणाम म्हणून अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात कोणतीही कागदपत्रे दाखविली नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन या अपील अर्जावर प्रथम निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, रजिस्ट्रार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घ्यावी व या कालावधीतच आपले आदेश पारीत करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार व्दितीय अपील सादर करु शकतील.

प्रसंगावशात् आयोग कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या बेपर्वा वर्तनाकडे लक्ष वेधू इच्छितो. आज सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या विद्यापीठाच्या प्रतिनिधींना आयोगास कोणतीही माहिती देता आली नाही. तेव्हा इतःपर आयोगाकडील सुनावणीसाठी विचाराधीन असलेल्या प्रकरणाच्या संबंधात ज्या अधिका-यांना अथवा कर्मचा-यांना पुरेशी माहिती आहे त्यांनाच आयोगाकडे सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी सूचित करावे. या प्रकरणी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या बेपवाईमुळे वंचित राहिले असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी अपिलार्थीस येणारा जाण्यायेण्याचा सर्व खर्च विद्यापीठाने सोसावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. रजिस्ट्रार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घ्यावी व या कालावधीतच आपले आदेश पारीत करावे.

३. सुनावणीसाठी अपिलार्थीस लागणारा त्यांचा जाण्यायेण्याचा व तद्अनुषंगिक खर्च विद्यापीठाने सोसावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विलास लोकरे, पाटील गल्ली, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०३

निर्णय दिनांक ०२-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पठाण अब्दुल्ला खाँ मन्नान खाँ,<br>रा. नुरी मोहल्ला, कळमनुरी, तालुका कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.) व मुद्रांक<br>जिल्हाधिकारी, परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी व्दितीय अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे व आवश्यक असलेल्या माहितीचा उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खरेदीखताच्या संदर्भात एकूण १२ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने

त्यांच्या या अर्जामध्ये प्रत्येक खरेदीखतनिहाय जमिनमालक प्लॉट विक्री करणा-याने एन. ए. लेआऊट केलेले आहे काय ? असल्यास त्यांच्या नकला द्याव्या, तसेच नगरपरिषद ना हरकत ची नक्कल द्यावी व कोणत्या आधारे खरेदीखत केले त्याची नक्कल अशा प्रकारची माहिती वेगवेगळ्या खरेदीखताच्या संदर्भात विचारल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०७-२००८ रोजी आपले आदेश पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या कथित आदेशामध्ये त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश न देता अपिलार्थीच्या या प्रकरणातील वस्तुस्थितीची थोडी कल्पना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या कथित निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी दिनांक १६-०५-२००८ रोजी उपलब्ध करुन ठेवली होती, तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असता जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेल्या माहितीचा स्वीकार त्यांनी केला नाही, त्यामुळे शेवटी त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक १५-०७-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविली व ही माहिती अपिलार्थीस दिनांक २२-०७-२००८ रोजी प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस उपलब्ध करुन ठेवलेल्या व अपिलार्थीस दिनांक १५-०७-२००८ रोजी पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय व्यवस्थितपणे माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत मुद्देनिहाय व विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता त्यांच्यावर नेमून दिलेली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडण्याची क्षमता संबंधित जन माहिती अधिका-यांमध्ये नाही. सबब या प्रकरणी सह जिल्हा निबंधक यांनी लक्ष घालणे आयोगास गरजेचे वाटते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता अपिलार्थीस देण्यापूर्वी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची प्रत्येक मुद्दयावरील माहिती त्यांनी सह जिल्हा निबंधक कार्यालयातून तपासून घ्यावी व तदनंतर ती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या सर्व प्रक्रिया जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत पार पाडावयाच्या आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली प्रत्येक मुद्दयावरील व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पठाण अब्दुल्ला खाँ मन्नान खाँ, रा. नुरी मोहल्ला, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.) व मुद्रांक जिल्हाधिकारी, प्रशासकीय इमारत, हॉल क्रमांक ३, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०४
निर्णय दिनांक: ०२-०९-२००९

१. श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी
रा.मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुरुम, ता.उमरगा, जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर परिषद, मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद येथील पाणीपुरवठयासंदर्भात एकूण तीन मुद्यांद्वारे दि. १०.०२.२००८ ते १६.०२.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- दि.१०.०२.२००८ ते १६.०२.२००८ पर्यंत नगर परिषदेने, पाणी पुरवठा खंडीत केल्यामुळे आलेला मोटारीचा दुरुस्ती खर्च, याबाबत खर्चाचा मेळ घालण्याच्या उद्देशाने विद्युत मोटार जाळली किंवा जळाली गेली, नगर परिषदेच्या

मालकीच्या विद्युत मोटारींची संख्या, या माहितीचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी वाटल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. १३.०५.२००८ रोजी घेतलेल्या निर्णयाची माहिती दिली.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्र.२ शी संबंधित अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे वैयक्तिक अभिप्राय अपेक्षिले असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशाप्रकारचे वैयक्तिक अभिप्राय अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे हे त्यांना अनुज्ञेय नाही. त्यामुळे ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध होती, त्या स्वरुपात विहित मुदतीत दिली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली गेली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. अपिलार्थीचे त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवरील हे भाष्य द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीसाठी जरी गृहीत धरले तरी, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी का वाटते, याचे कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही अथवा या संदर्भात त्यांनी कोणताही लेखी युक्तिवाद अथवा यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगास अद्यापपावेतो सादर केलेला नाही.

वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेल्या बाबी एकत्रितपणे लक्षात घेता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख,रा. मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम, ता.उमरगा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०५
निर्णय दिनांकः ०२-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शाम लक्ष्मण सरवदे,<br>अंबाजोगाई, जि.बीड. | : | +ह्य{ह्मफह्मह्मlह्म |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, अंबाजोगाई, जि. बीड<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | \|ह्मह्यiह्मम्ह्मह्मnङ्ख |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असून दि. ०३.०३.२००८ रोजी फीस भरुन घेऊन ती दिलेली आहे.जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये निविदा प्रतीच्या व वृत्तपत्रातील जाहीरातीबाबतच्या माहितीचा समावेश नाही. अशाप्रकारे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची व शिस्तभंगाची कारवाई करण्याची व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे अंबाजोगाई शहरातील बोधीघाट ते आंबेडकर चौक या रस्त्यावर नगरपरिषदेकडून सन २००३ ते २००७ या कालावधीमध्ये बसविण्यात आलेल्या पथदिव्यांच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पूर्वी बसविण्यात आलेल्या पथदिव्यांचा दाब, नवीन पथदिव्यांचा दाब, नवीन पथदिव्यांचे दर, किती ठिकाणांचे पथदिवे बदलले, बदलण्यात आलेल्या पथदिव्यांची संख्या, या कामाचा खर्च, कामाची तरतुद, खर्च करण्यात आलेली एकूण रक्कम, नगर परिषदेने पूर्वीचे दिवे बदलण्यासाठी घेण्यात आलेल्या ठरावाची छायाप्रत, कामाच्या मोहरबंद निविदा असल्यास त्यांच्या छायाप्रती, कामाच्या निविदेची वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीची प्रत, जाहीरातीचा दिनांक, कामासंबंधी प्राप्त निविदांची संख्या, निविदाधारकाचे नाव, ज्या कंपनीकडून पथदिवे खरेदी करण्यात आले नेमक्या त्याच कंपनीकडून का खरेदी करण्यात आले. - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली. तदनंतर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या नगरपरिषदेच्या ठरावाची प्रत, अपिलार्थीस त्यांनी या माहितीपोटीचे शुल्क नगरपरिषदेकडे भरल्यानंतर दि. ०३.०३.२००८ रोजी पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या |ह्मEन्नणाची सुनावणी +ह्मVह्म ह्यnङ्कxह्मह्महE ०२.०९.२००९ ?ह्मुVह्म्र औरंगाबाद द्यह्मुlह्मु Pह्मुhद्यह्मह्मांह्म +ह्मफ्ह्म्र. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली पूर्ण माहिती त्यांना दि. २०.०२.२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने ज्या कामाविषयी त्यांच्याकडे माहिती मागितली होती ते काम जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांच्या शिफारशीवरुन मजूर सहकारी संस्थेकडून करुन घेण्यात आले. त्यासाठी वृत्तपत्रात जाहीरात देऊन मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे वृत्तपत्रातील निविदा सूचना व जाहीरातीची प्रत उपलब्ध नसल्याबाबत अपिलार्थीस कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. १६.०१.२००८ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद दिला आहे. विलंबाने प्रतिसाद देऊनही अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना द्यावयाच्या एक पृष्ठाच्या माहितीकरिता रु.२/- इतके शुल्क आकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.२/- इतके त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पूर्णपणे माहिती दिली आहे व त्यांच्या कृतीबाबतचे समर्थन त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या युक्तिवादामध्ये केलेले आहे, हे पाहता आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती देण्याचे शिल्लक उरत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र अपिलार्थीकडून माहितीपोटीचे

स्वीकारलेले शुल्क रु. २/- इतके त्यांना वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस परत करावे लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून एक पृष्ठाच्या माहितीकरिता स्वीकारलेले शुल्क रु.२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शाम लक्ष्मण सरवदे,बोधीघाट, आंबेडकर चौक,अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, अंबाजोगाई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०६
निर्णय दिनांक: ०२-०९-२००९

१. श्री. साहेबराव देवराव पोटभरे, : अपिलार्थी
नवीन भाटवडगाव,मांजरथ रोड,
माजलगाव,जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, माजलगाव,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०८.२००८ रोजी दिलेली माहिती खोटी, चूक व दिशाभूल करणारी आहे. या अभिप्रायापृष्ठयर्थ अपिलार्थीने त्यांचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे " बिऱ्हाड थाटो आंदोलनाची थट्टा व कुचेष्टा थांबवून त्यांला न्याय मिळण्याबाबत " या विषयावर एकूण सात मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने, बिऱ्हाड थाटो आंदोलनासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयात, जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या दि. ०४.०४.२००८, ०८.०४.२००८, ०४.०३.२००८, २४.०३.२००८, ०५.१२.२००७, २८.११.२००७ व ०६.१२.२००७ या पत्रावर काय कार्यवाही केली, व जर कार्यवाही केली नसेल तर त्याची कारणे, अशी माहिती त्यांनी या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील विहित मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०८.२००८ रोजी सुनावणी झाली. सुनावणीतील आदेशानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रश्नार्थक स्वरुपातील माहिती पुरविणे त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचे त्यांच्याकडील दि. ११.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले व अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी वेळोवेळी सादर केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती व याच माहितीमध्ये जन माहिती अधिकाऱ्याने जर कार्यवाही केली नसेल तर ती का केली नाही, याची कारणे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जाचे अवलोकन करता, या अर्जातील, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळेवेळी

केलेल्या अर्जांवर त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ प्रमाणे द्यावी लागेल. मात्र अपिलार्थीच्या अर्जांवर संबंधित प्राधिकरणाने कोणतीही कार्यवाही का केली नाही, याची कारणे/स्पष्टीकरणे दर्शविणारी माहिती अपिलार्थीस संबंधित प्राधिकरणाकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने वेगवेगळया दिवशी वेगवेगळया प्राधिकरणाकडे "बिऱ्हाड थाटो आंदोलन" या विषयावर अर्ज केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या मूळ अर्जाची प्रत सर्व संबंधित प्राधिकरणाकडे पाठवून त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस, सदरचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठविणे भाग होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्याकडून केली गेल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ज्या-ज्या तक्रार अर्जांचा संदर्भ दिला आहे व सदरचे तक्रार अर्ज ज्या-ज्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीने केले आहेत, त्या प्राधिकरणाशी त्यांनी संपर्क साधून अपिलार्थीच्या अर्जांवर त्या-त्या प्राधिकरणाने केलेली कार्यवाही, यासंदर्भात संबंधित प्राधिकरणाने इतर प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहारांच्या प्रती, ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील 'कार्यवाही न करण्याची कारणे', या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. साहेबराव देवराव पोटभरे,नवीन भाटवडगाव,मांजरथ रोड,माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०७
निर्णय दिनांक: ०२-०९-२००९

१. श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, परळी (वै.), जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी (वै.),जि.बीड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परळी (वै.),जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, मागितलेली माहिती दिल्यावर पुरवठा विभागातील प्रचंड मोठया प्रमाणात असलेला भ्रष्टाचार उघडकीस येईल असे जन माहिती अधिकारी यांना वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपिलाच्या निर्णयाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून या अपील अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे "स्वस्त धान्य दुकानाबद्दलची दि. ०१.०५.२००७ ते दि. २९.११.२००७ या कालावधीशी संबंधित एकूण सात मुद्यांद्वारे व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या १७ कामाची माहिती, त्यांच्या मूळ अर्जातील ८ व्या मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.१२.२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १३/- इतके भरण्याचे त्यांना सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने दि. १८.०१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले. तथापि संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी त्यांना वेगळा अर्ज करण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दिले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या अपील निर्णयाची प्रत अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांचाही युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले, तर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली, त्यांना ज्या स्वस्त धान्य दुकानाबद्दलची माहिती हवी आहे, त्या स्वस्त

धान्य दुकानाचे नाव, दुकान क्रमांक व पत्ता दिलेला नाही. त्यामुळे साहजिकच जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ ते ७ च्या संदर्भातील कोणतीही माहिती देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविताना अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून विशिष्ट स्वरुपातील माहिती मागणे त्यांना अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस नेमक्या कोणत्या स्वस्त धान्य दुकानदाराच्या संदर्भात माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस आता जर एखाद्या स्वस्त धान्य दुकानासंदर्भात माहिती हवी असेल तर त्या स्वस्त धान्य दुकानाचा आवश्यक तो तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना द्यावा लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण आठ मुद्यांपैकी सात मुद्दे अशाप्रकारे निकाली निघत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.८ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीस त्यांनी ही माहिती अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या वेगळया अर्जाच्या संदर्भात यापूर्वीच पुरविली आहे.जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही. त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या विचाराधीन अपिलाच्या संदर्भात असलेल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ८ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच त्यांना सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीपोटी भरलेल्या शुल्काबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दि. २९.११.२००७ रोजी दोन अर्ज केले होते. त्यापैकी दुसऱ्या अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीने रु.१३/- इतके शुल्क माहितीपोटी त्यांच्या कार्यालयात भरले आहे. अपिलार्थीने भरलेले कथित शुल्क विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाच्या संदर्भात नाही. या मुद्यावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांना असे सूचित करण्यात येते की, या मुद्याची त्यांच्या स्तरावर तपासणी करण्यात येऊन अपिलार्थीने दि. १८.०१.२००८ रोजी भरलेले शुल्क रु. १३/- इतके त्यांनी जर

विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाच्या संदर्भात भरले असेल तर त्यांनी हे शुल्क अपिलार्थीस सात दिवसांच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, दिवाणी न्यायालय,परळी (वै.) जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी (वै.), जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परळी (वै.),जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०८
निर्णय दिनांकः ०२-०९-२००९

१. श्री. कैलास विश्वनाथ भोसले, : अपिलार्थी
रा.मोप, पो.कनेरगाव (नाका)
ता.जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, हिंगोली,
जि.हिंगोली.

२. जन अपिलीय अधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी, हिंगोली,
जि.हिंगोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे हिंगोली तालुक्यातील मौ. मोप येथील स्वस्त धान्य दुकानाच्या संदर्भात सन १९९९ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण सात मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वाटप रजिस्टरच्या नकला, स्टॉक रजिस्टरच्या नकला, केरोसिन वाटप रजिस्टरच्या नकला, बी.पी.एल. लाभार्थी व अंत्योदय योजनेचे लाभार्थींच्या नावाची यादी- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४,२००/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २८.०५.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने दि. १७.०३.२००८ रोजी मागणी केलेल्या माहितीची एकूण पृष्ठे २१०० इतकी होती. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दाखविल्यानंतर या माहितीपैकी अपिलार्थीने २४६ पृष्ठांची माहिती त्यातून विनामूल्य हस्तगत करुन घेतली व उर्वरित माहिती स्वीकारली नाही व आयोगाकडे उर्वरित माहितीकरिता द्वितीय अपील सादर केले आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी सन १९९९ ते २००६ या कालावधीशी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ती माहिती वगळता उर्वरित सर्व माहिती उपलब्ध आहे. ही माहिती हिंगोली तालुक्यामध्ये सन २००६ मध्ये आलेल्या पूरामध्ये वाहून गेल्याने अपिलार्थीस ती माहिती आता देता येणार नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी

यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी सन १९९९ ते २००६ या कालावधीतील माहिती वगळता, उर्वरित सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे.त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती दाखविली देखील होती. त्यातील आवश्यक ती माहिती अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घेतली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली उर्वरित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करावा व तदनंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेता येईल, असे त्यांना या टप्प्यावर सूचविण्यात येऊन त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कैलास विश्वनाथ भोसले,रा.मोप, पो.कनेरगाव (नाका),ता.जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जि.हिंगोली यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०९
निर्णय दिनांक: ०२-०९-२००९

१. श्री. नदाफ म. बशीर खान, : अपिलार्थी
मु.पो.चोंडी (बहिरोबा),
ता.वसमत,जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हाधिकारी (रोहयो),
हिंगोली.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (रोहयो), हिंगोली.

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (रो.ह.यो.),
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी : उपजिल्हाधिकारी (रोहयो),
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व पुरविलेली माहिती खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. १४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात एकूण दोन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उपविभागीय अधिकारी, उपविभाग यांची पत्रे दि. २०.०२.२००७, २८.०५.२००७ व ०२.०६.२००७ नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आणि' कामाबद्दल धान्य' या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत योजनांना सन २००३-२००६ या कालावधीमध्ये केलेल्या मंजूर विकास कामांचा कृती आराखडा व संबंधित यंत्रणांनी दाखल केलेल्या २००३,२००४,२००५,२००६ चे मासिक प्रगती अहवाल - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहितीकरिता अपिलार्थीस एकूण १० यंत्रणांशी संपर्क साधून आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दि. ०१.०२.२००८ रोजी व तदनंतर दि. १९.०३.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मध्ये ज्या तीन पत्रांचा संदर्भ जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिला आहे, त्या

पत्रासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली हे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०१.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अवगत केले आहे. अपिलार्थीने संदर्भित केलेली ही पत्रे म्हणजे अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जावर चौकशी करुन पुढील कार्यवाही करण्यासंदर्भातील कार्यालयीन आदेश/पत्रे आहेत. या तीन पत्रांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दि.२०.०२.२००७ रोजीचे संदर्भित पत्र म्हणजे, उपविभागीय अधिकारी, वसमत यांनी अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर चौकशी करण्याकरिता नेमलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश आहेत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दि. २८.०५.२००७ रोजीचे संदर्भित पत्र म्हणजे, उपविभागीय अधिकारी, वसमत यांनी जिल्हाधिकारी हिंगोली यांना उद्देशून लिहिलेले, वनपरिक्षेत्र कार्यालय, रोहयो, चोंडी, आंबा तालुका वसमत यांच्यामार्फत सन २००४-२००५ मध्ये जिल्हयाबाहेरील मजूरांच्याकडून गुत्तेदारी पध्दतीने केलेल्या कामासंदर्भातील अहवाल असल्याचे दिसून येत आहे. या अहवालामध्ये उपविभागीय अधिकाऱ्याने वनपरिक्षेत्र कार्यालय, रोहयो, चोंडी हे दोषी आढळून येत असल्याचा निष्कर्ष काढून, हा निष्कर्ष जिल्हाधिकारी यांना पाठविला आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दि. ०२.०६.२००७ रोजीचे संदर्भित पत्र म्हणजे, उपविभागीय अधिकारी यांच्या दि. २८.०५.२००७ रोजीच्या पत्रातील मजकूराच्या दुरुस्तीच्या संदर्भातील पत्र आहे. थोडक्यात अपिलार्थीस या मुद्याद्वारे त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या मूळ तक्रारींवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती आवश्यक आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात अपिलार्थीस कृती विकास आराखडयाची प्रत दि. १९.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने पाठविली आहे. मात्र अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात, दहा यंत्रणांकडून झालेल्या कामासंदर्भात सन २००३,२००४ व २००५,२००६ या

कालावधीतील मासिक प्रगती अहवालाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्या नसल्याचे दिसून येते. या मुद्यासंदर्भात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित यंत्रणांकडून परस्पर माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आहे. ही त्यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. रोजगार हमी योजनेतील कामासंदर्भात जिल्हाधिकारी हे मुख्य संनियंत्रण कार्यालय आहे. त्यांच्या कार्यालयाकडे संबंधित योजनांचे अशाप्रकारचे मासिक प्रगती अहवाल नियमितपणे सादर केले जात असल्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे सहज उपलब्ध असू शकते, त्यामुळे त्यांनीच अपिलार्थीस ती देणे या प्रकरणी अभिप्रेत आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले असल्याचे त्यांच्या दि. ०१.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दिलेल्या प्रतिसादावरुन स्पष्ट होत आहे. अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व जर संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयात आढळून आले नाहीत तर हे अभिलेखे जतन करुन ठेवण्यासाठी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यावर अथवा अधिकाऱ्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मृ

कृ.मा.प.५...

२ च्या संदर्भातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केले

आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०२-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नदाफ म. बशीर खान,मु.पो.चोंडी (बहिरोबा),ता.वसमत,जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (रो.ह.यो.),जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१

निर्णय दिनांक ०३-०९-२००९

१ श्री. फखरुद्दीन अब्दुल्लाभाई, : अपिलार्थी
हॉटेल मेट्रोसमोर, लिटल स्टार स्कूल प्रांगण,
फाजीलपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना पाच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" Copy of Plaint & Final Order in t matter of Ali Sher V/S Abdul Muki Khan, pertaining to File No. RBWS AR 17/65 and RBWS III AR 18/66 MAG AR 229/66.

u/s 98 Hydrabad Tenancy & L.A. Ac. Copy of Plaint & Final Order in e of the above files & any other ap cations filed by the contending p. ”

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या गावाच्या व सर्व्हे नंबरच्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली होती त्या गावाचे नांव व सर्व्हे नंबर कळविण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांना आवश्यक तो तपशील अपिलार्थीने दिनांक ०२-०१-२००९ रोजी दिला. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस तहसीलदार यांच्या कार्यालयात सदर संचिका शोधण्याचे काम चालू असल्याचे कळविले. तथापि आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी आश्वासीत करुनही प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ४२ वर्षापूर्वीची जुनी असल्याने त्यांनी अथक परिश्रमाने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची नस्ती त्यांच्या अभिलेख शाखेतून शोधून काढली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये

उपस्थित केलेल्या फिर्यादीसंबंधात संबंधित फिर्यादीच्या (plaint) दोन कागदपत्राच्या प्रती मिळाल्या. तथापि उपलब्ध झालेल्या नस्तीमध्ये फक्त फिर्यादीची दाखल केलेली प्रत होती. या प्रकरणी जारी केल्या गेलेल्या अंतीम आदेशाची प्रत त्यामध्ये उपलब्ध नव्हती. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाले असून अभिलेख कक्षामध्ये फेरबदल झाले आहेत व जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय बदलेले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही शासकीय अभिलेखाच्या "अ" या वर्गात मोडते. अशा प्रकारचे अभिलेखे जतन करुन ठेवावयाचा कालावधी हा कायमस्वरुपी असतो. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात उपलब्ध असावयास हवी. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अंदाजे ४२ वर्षापूर्वीची जुनी असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध त्यांच्या कार्यालयामध्ये परत एकदा घेण्याचे सूचित करण्यात येत आहे. यासाठी त्यांना तीस दिवसाची मुदत देण्यात येत आहे. या कालावधीमध्ये त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध झाल्यास त्यांनी ही माहिती अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. जर या कालावधीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध न झाल्यास त्यांनी शासनाचे कायमस्वरुपी अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती व ज्या अधिका-याच्या / कर्मचा-याच्या हातून ते गहाळ झाले असतील त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य कारवाई करावी, असेही त्यांना पूढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. फखरुद्दीन अब्दुल्लाभाई, हॉटेल मेट्रोसमोर, लिटल स्टार स्कूल प्रांगण, फाजीलपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१०

निर्णय दिनांक ०३-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विश्वनाथ काशिनाथ चोरपगारे,<br>रा. संजयनगर (बायजीपुरा), गल्ली नं. ९,<br>अलका मेडिकल स्टोअर्सजवळ, स्मशान मारोती रोड,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२००८ रोजी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक ०४-०४-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याव्दारे त्यांच्या

पगारामधून केलेल्या रक्कम रुपये ७६८० इतक्या कपातीच्या संदर्भात व त्यांच्या पगारासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या पगारातून कपात करण्यात आलेल्या रकमेचे चलन किंवा पोच पावती, त्यांच्या पगारातून कपात केलेली रक्कम सध्या कोठे आहे ? या रकमेचे काय झाले ? पेन्शनसाठी नो ड्युज पाठविण्यासाठी उशीर का लागला याबाबतची कारणे, सन १९९४-९५ या वर्षाची जी. पी. एफ. स्लीप - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांचे नो ड्युज प्रमाणपत्र पाठविण्यास उशीर केल्याची कारणे व त्यांची सन १९९४-९५ या वर्षाची जी. पी. एफ. स्लीप देण्यात यावी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अशा प्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. कलम २ (च) व्दारे स्पष्ट केलेल्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या अर्जातील त्यांच्या सन १९९४-९५ ची जी. पी. एफ. स्लीप ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांच्याकडून देय होत नाही. कारण महालेखापाल यांच्याकडून प्राप्त होणा-या भविष्यनिर्वाह निधीच्या प्रती मूळ स्वरुपात शासकीय कर्मचा-यांना देण्यात येतात. त्यामुळे ही माहिती सध्याचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील हे दोन मुद्दे वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसाच्या आत देण्याचे मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस देय असलेली त्यांच्या मूळ अर्जातील, वरील दोन मुद्दे वगळता, उर्वरित मुद्दयावरील सर्व माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या दिनांक ०४-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०३-०५-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अभिप्रेत होते. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०६-२००८ रोजी म्हणजे, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिल्यानंतर प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०२-०६-०८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली तर नाहीच परंतु अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती शोधण्याचे काम चालू आहे असे फसवे उत्तर दिले. येथे 'फसवे' हा शब्द अशाकरिता वापरण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज देखील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भातील कोणतीही माहिती उपलब्ध नाही. त्यांनी त्यांच्या दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती शोधण्याचे काम चालू आहे असे अपिलार्थीस मोघम उत्तर देऊन वेळ मारुन नेली होती. परंतु त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती खरोखरच शोधली होती किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. आज देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती तयार नाही, याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या अभिलेख्यात उपलब्ध झाली

नसावी. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध होत नव्हती तर त्यांनी अपिलार्थीस तसे कळविणे भाग होते. परंतु त्यांनी अशा प्रकारचे त्यांचे कर्तव्य पार पाडले नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विश्वनाथ काशिनाथ चोरपगारे, रा. संजयनगर (बायजीपुरा), गल्ली नं. ९, अलका मेडिकल स्टोअर्सजवळ, स्मशान मारोती रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२११

निर्णय दिनांक ०३-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अर्जून साहेबराव नवपुते,<br>मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद<br>तथा सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री,<br>मुख्यालय, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री, मुख्यालय, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या सुनावणीच्या वेळी त्यांना असे सांगण्यात आले की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना एकाच अर्जाव्दारे मिळणार नाही, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी फक्त

तीन मुद्दयांचीच माहिती अपिलार्थीस दिली जाईल व उर्वरित माहितीसाठी अपिलार्थीस दुसरा अर्ज करावा लागेल. तसेच सदरची माहिती आडीच महिन्यानंतर देण्यात येईल. परंतु ती तीस दिवसात देणे अनिवार्य असूनही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी डावलण्यात आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण सात रस्त्यांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या सात रस्त्याच्या अंदाजपत्रकाच्या, मोजमाप पुस्तिकाच्या व मजूर हजेरीपत्रकाच्या प्रती आणि या कामाविषयी जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेल्या तक्रारी निवेदनाच्या छायांकीत प्रती आणि तक्रारी निकाली काढण्यात आलेली पध्दत याविषयीची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस सात पैकी तीन कामांची माहिती तीन महिन्याच्या आत उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले. तथापि या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे एकूण सात रस्त्यांची मोठ्या प्रमाणात व्याप्ती असलेली माहिती व्यक्तिशः मागविली होती. परंतु माहिती घेण्यसाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीहि आले नाहीत. या सात रस्त्याच्या पैकी तीन रस्त्यांच्या संदर्भातील अपिलार्थीने मागणी केलेली ४९६ पृष्ठांची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३.०८.२००८ रोजी विनामूल्य हस्तांतरीत केली आहे व उर्वरित चार रस्त्यांच्या संदर्भातील आणि या कामासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाची व सदर तक्रार अर्ज कार्यकारी अभियंता यांनी निकाली काढण्यासाठी निर्णय दिल्याबाबतची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ते ही माहिती अपिलार्थीस केव्हाही देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणाची व मोठी व्याप्ती असलेली अशी आहे. तसेच अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. मात्र ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत, या जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी, अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत हा मुद्दा, या प्रकरणी विशेषत्वाने लक्षात घेण्यात येत आहे. अपिलार्थीने विस्तृत प्रमाणात व मोठ्या व्याप्तीची माहिती मागवूनही त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही टाळलेले नाही. आज देखील अपिलार्थीस देण्यासाठी राहिलेली उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते, याची अपिलार्थीस जाणीव करुन देण्यात येत आहे. त्यामुळे आता जन माहिती

अधिकारी यांच्याकडे तयार असलेली त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, पूर्वनियोजित वेळी स्वतः हजर राहून ही माहिती स्वतः हस्तगत करुन घेणे त्यांना गरजेचे राहिल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय पूर्णतः अवैध आहे कारण या अपील आदेशावर जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः सही न करता त्यांच्या कार्यालयातील दुस-या व्यक्तीने या आदेशावर सही केली आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे सात रस्त्यांची माहिती मागितली असता, अपिलार्थीस तीन रस्त्यांची माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची जन अपिलीय अधिकारी यांची कृती ही सर्वथा गैर व अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन करणारी अशी आहे. इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या प्रथम अपील अर्जावर ज्यांची प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे अशाच अधिका-याने अपिलार्थीकडून प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर स्वतः सुनावणी घेऊन निर्णय देणे त्यांना अनिवार्य असेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अर्जून साहेबराव नवपुते, मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री, मुख्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१३

निर्णय दिनांक ०३-०९-२००९

१ श्री. जीवन रामराव उबाळे, : अपिलार्थी
रा. संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय. टी. आय. मागे,
नगर रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये प्राचार्य पदाबाबत काय नियम आहेत

याबाबतची व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील  कलम ४ च्या १७ कामांची सीडी दिलेली नाही. या कारणामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आहेत आणि त्यांनी अपिलार्थीस जाणीवपूर्वक माहिती नाकारली आहे त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार प्रतिदिन रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्यात यावी व त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे व कलम ४ च्या १७ कामांची माहिती सीडीच्या स्वरुपात देण्याचे आदेशित व्हावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०१-२००७ ते ०७-०३-२००८ या कालावधीमधील काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे विचारली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - विद्यापीठ अनुदान आयोगाचे नियम, प्राचार्य पद किती कालावधीसाठी प्रभारी ठेवता येते, उच्च न्यायालयाने / खंडपीठाने याबाबत काही जाब विचारला होता काय, असल्यास त्यांच्या उत्तराची प्रत, महाविद्यालयामधील प्राचार्य त्यांचे नांव  व कालावधी, विद्यापीठाने किती महाविद्यालयास नोटीसा दिल्या, त्या नोटीसापैकी किती महाविद्यालयानी नोटीसीचे उत्तर दिले, आणि माहिती अधिकार कायद्याच्या कलम ४ प्रमाणे केलेल्या १७ कामांची माहिती सीडीमध्ये - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २००० इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि अशा प्रकारच्या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामधील प्रत्येक मुद्दयावर भाष्य करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर दिनांक ०३-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली असल्याचे सांगून माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसदंर्भात अपिलार्थीस प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी या माहितीच्या संदर्भातील सीडी देण्याचे आदेशित केले. तथापि त्यांच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस अपेक्षित असलेली सीडी त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे व या मुद्दयासंदर्भात त्यांच्याकडे फक्त हार्ड कॉपी उपलब्ध असल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाकडून कलम ४ च्या १७ कामांची सीडी दिली नसल्याचे नमूद केले आहे. तथापि उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देतांना अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २००० भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. आयोगाकडे प्राप्त

झालेल्या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, प्राचार्य पदाबाबत नियम काय आहेत याची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत पुरविली नाही. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता त्यांनी या मुद्दयावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मूळात माहितीच मागितली नाही त्यामुळे या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती देय होणार नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील एका मुद्दयाव्दारे सीडीच्या स्वरुपात माहिती मागितली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे सीडीच्या स्वरुपात ही माहिती उपलब्ध नाही. परंतु त्यांची सीडीच्या स्वरुपात ही अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना ज्या स्वरुपात अपेक्षित आहे त्या स्वरुपात ती जन माहिती अधिकारी यांनी देणे अनिवार्य आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या कार्यालयातील केल्या गेलेल्या अधिनियमातील कलम ४ च्या संदर्भातील १७ कामांची माहिती सीडीच्या स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने टाळले असल्याचे किंवा ती दडविली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थी यांनी विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कोणतेही कारवाईचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली सीडीच्या स्वरुपात असलेली माहिती त्यांना त्याच स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जीवन रामराव उबाळे, रा. संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय. टी. आय. मागे, नगर रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१४

निर्णय दिनांक ०३-०९-२००९

१ सौ. फुके जयश्री देवराव, : अपिलार्थी
शिवनेरी निवास, तेलगांव रोड,सिरसाळा, तालुका परळी
वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्य, श्री पंडीत गुरु पार्डीकर कला महाविद्यालय,
सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक (उच्च शिक्षण) औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या २३ मुद्दयाच्या माहितीपैकी १० मुद्दयावरील दिलेली माहिती चुकीची, बनावट व दिशाभूल करणारी अशी असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते, यावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना या मुद्दयावर

माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच त्यांनी या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून २००४ इतक्या पृष्ठांची माहिती प्राप्त होऊनही या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांनी ७५०० इतके शुल्क आकारले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ केली असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्यात यावी अशी त्यांनी आयोगास अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे जो दिनांक ०५-०२-२००८ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला, याव्दारे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधित एकूण २३ मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.२७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७५०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांना सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरद्वारे केल्यानंतर त्यांना माहिती प्राप्त झाली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०७-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे संपूर्ण माहिती सशुल्क पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही पूर्णपणे वस्तुस्थितीस धरुन व सत्य स्वरुपात आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील २३ मुद्दयांपैकी १० मुद्दयांवर चुकीची, बनावट व दिशाभूल करणारी माहिती त्यांना दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि ही माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी कशी आहे हे त्यांनी या अपील अर्जामध्ये कोणत्याही प्रकारे सिध्द केलेले नाही अथवा आपले हे मुद्दे तोंडी युक्तिवादाव्दारे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १७ व २२ व्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती चुकीच्या कारणास्तव नाकारली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १७ व्दारे महाविद्यालयात प्रत्येक वर्गात कोणकोणते विषय शिकविण्यात येतात या संदर्भात अनेक उपमुद्दयाव्दारे माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना शक्य आहे. केवळ अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली आहे म्हणून उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नाकारली, त्यांची ही कृती चुकीची आहे. त्यामुळे यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या महाविद्यालयामध्ये शिकविल्या जाणा-या वर्गनिहाय विषयाची यादी अपिलार्थीस पुरवावी. विषयनिहाय शासनाचे अनुदान संबंधित महाविद्यालयास प्राप्त होत आहे. हे विषय शिकविण्यास शासनाने मान्यता दिली असल्याचे देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १७ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना आता अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २२ व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या शिक्षण संस्थेतील कर्मचा-यासाठी मंजूर असलेल्या

सेवानियमांच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, महाराष्ट्र शासनाच्या माध्यमिक शाळा संहिता १९६६ च्या तरतुदीप्रमाणे त्यांच्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवेचे नियमन केले जात असते. ही माहिती छापील स्वरुपात उपलब्ध आहे म्हणून ती अपिलार्थीस द्यावयाची नाही, अशी माहिती अधिकार अधिनियमामध्ये तरतुद नाही, त्यामुळे या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती नाकारण्याची कृती चुकीची आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या मुद्दयाशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस सशुल्क पुरविण्यात आलेली माहिती यांचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १७ व २२ शी संबंधित माहिती नाकारण्याची कृती चुकीची आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १७ व २२ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे. तथापि या पत्रामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या शुल्काचा तपशील उदा. अंदाजे पृष्ठांची संख्या, त्यांचे आकारमान, प्रतिपृष्ठ दर इत्यादी तपशील कळविलेला नाही, जो जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अर्जदारास कळविणे अनिवार्य आहे. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केला असल्यामुळे आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देय होत आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांना देण्यात आलेल्या माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.७५०० इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे लागेल.

वरील प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील विनंतीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कोणतीही कारवाई आदेशित करण्यात येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १७ व २२ शी संबधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ७५०० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. फुके जयश्री देवराव, शिवनेरी निवास, तेलगांव रोड,सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्री पंडीत गुरु पार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, देवगिरी महाविद्यालयाजवळ, स्टेशन रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१५

निर्णय दिनांक ०३-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कचरुलाल बस्तीमल जैन,<br>रा. शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड,<br>तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले असता त्यावर जन अपिलीय अधिकारी त्यांनी निर्णय घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या कालावधीत त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती लावावी, अशी अपिलार्थीने या अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९१-९२ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या जमिनीच्या गटासंदर्भात काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०५-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०५-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर करण्यात आला असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही पूर्ण माहिती न मिळाल्याने व जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे कायद्याचा अनादर केल्यामुळे त्यांच्यावर शास्ती लादण्यात यावी, शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी व तसेच उर्वरित माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी संपूर्ण माहिती दिनांक १६-०५-२००८ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ५, ६ व ७ च्या संदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील नमुना ९ (३) ९ (४) ची प्रत घेऊन जाण्याचे सूचित केले आहे. मात्र या नमुन्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये दिलेली नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण आठ मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित माहिती दुय्यम निबंधक कार्यालयाशी संबंधित असल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक आठशी संबंधित माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्षतः संबंधित नसल्याने, अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भात अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयाशी वेगळ्या अर्जाव्दारे संपर्क साधावा लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती म्हणजे नमुना ९ (३) ९ (४) ची नक्कल विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ५, ६ व ७ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्यामुळे अधीक्षक, भूमि अभिलेख, बीड यांना संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६ व ७ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अधीक्षक, भूमि अभिलेख, बीड यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, रा. शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१६
निर्णय दिनांकः ०३-०९-२००९

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, : अपिलार्थी
अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपआयुक्त (पुरवठा),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः विद्यमान जन अपिलीय अधिकारी : अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १) श्री. प्रशांत सुर्यवंशी
२) श्री. सुभाष आब्दे
३) श्री. आर. आर. देशमुख

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, उपआयुक्त पुरवठा, जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी बीड यांनी संगनमत करुन अपिलार्थीने केलेल्या तक्रारीवर निष्काळजीपणे व अनियमितपणे दप्तर दिरंगाई करुन प्रकरण प्रलंबित ठेवले असून अपिलार्थीला जाणूनबुजून आर्थिक व मानसिक त्रास दिला व त्यांना माहिती न पुरविता अधिकारी आपल्या जबाबदारीपासून दूर जाताना दिसत आहे. त्यामुळे या अपिलाशी

संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रत्येकी २५,०००/- रु. इतकी शास्तीची कारवाई व रु.५०००/- नुकसान भरपाईची कारवाई करण्यात यावी, तसेच अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्याचे आदेशित करण्यात यावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. प्रशांत सूर्यवंशी व श्री. सुभाष आब्दे यांच्याविरुध्द केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे व काही उपमुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.१०.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार दि. ०१.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस १५ दिवसात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या मुदतीत अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष, श्री. प्रशांत सूर्यवंशी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला असून या युक्तिवादाद्वारे त्यांनी अशी मागणी केली आहे की, त्यांना उपरोक्त प्रकरणी झालेल्या प्रवास, स्टेशनरी इ.वरील खर्च, मानसिक व आर्थिक त्रासाबद्दल रु. ५०००/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी व तसेच उपआयुक्त (पुरवठा) व विभागीय आयुक्त यांच्यावर दप्तर दिरंगाईकरिता कारवाई करण्याचे आदेशित करण्यात यावे. या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे

की, जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी सहकार्य न करता, दिरंगाई केल्याबद्दल (त्या कालावधीतील) सेवेसंबंधी त्यांच्यावरही शिस्तभंगाविषयक कारवाई करण्यात यावी आणि श्री.प्रशांत सूर्यवंशी, श्री. सुभाष आब्दे व श्री. आर.आर.देशमुख यांची अधिनियमातील कलम १८(२)(३) पोटकलमानुसार चौकशी करण्यात यावी व त्यांच्यावर उचित कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांचा लेखी स्वरुपातील युक्तिवाद त्यांच्या प्रतिनिधीमार्फत सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. २२.०१.२००८ रोजीच्या पत्रान्वये एकूण ४८ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविली आहे. जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांचे पत्र दि. ०१.०३.२००९ नुसार त्यांच्याकडील २४ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांना पाठविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयामार्फत विलंब अथवा निष्काळजीपणा झाला नसल्याने सदरील प्रकरण निकाली काढण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असे अवगत केले की, श्री. प्रशांत सूर्यवंशी यांच्याविरुध्द त्यांनी केलेल्या तक्रारीवर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थी मागत आहेत. तथापि या चौकशीवर अद्यापपावेतो अंतिम निर्णय न झाल्याने व ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने या चौकशीच्या पुढील कामावर अडथळा येण्याची शक्यता असल्याने, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जी माहिती अपिलार्थीस देय आहे, ती त्यांनी अपिलार्थीस दि. २२.०१.२००८ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'ब' मधील जिल्हाधिकारी, बीड व उपआयुक्त (पुरवठा) यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहाराची माहिती, मुद्दा क्र. 'क-१' मधील जिल्हाधिकारी बीड यांनी तक्रारीसंदर्भात निर्गमित केलेले आदेश, मुद्दा क्र. 'क-२' मधील संपूर्ण माहिती व मुद्दा क्र. 'ड' मधील संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांना देता येईल, मुद्दा क्र. क-३ शी संबंधित माहिती त्यांनी दि. २२.०१.२००८ रोजी अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे.

त्रयस्थ पक्ष श्री. प्रशांत सूर्यवंशी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्याविषयी त्यांच्या वरिष्ठांकडे वेळोवेळी खोटया तक्रारी करुन त्यांना त्रास देत असतात. या

प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीसंदर्भात केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात येऊ नये. कारण त्यांच्याविरुध्द असलेल्या चौकशीशी संबंधित माहिती आता, या चौकशीवर निर्णय होण्यापूर्वीच उघड केल्याने, अपिलार्थी हे त्याचा दुरुपयोग करण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडील अहवालावर अवलंबून राहावे लागत होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २२.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीने त्यांना आज रोजी युक्तिवादामध्ये ही माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांच्या प्रतिनिधीने वरील परिच्छेदात आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये कबूल केल्याप्रमाणे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आता देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या विरुध्द केलेल्या तक्रार अर्जावर अद्यापपावेतो अंतिम निर्णय झाला नसल्यामुळे व त्यांना चौकशीच्या प्रक्रियेमध्ये, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती उघड केल्यास, या चौकशीमध्ये अडथळे येण्याची शक्यता असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्यामुळे व तसेच या प्रकरणी त्रयस्थ पक्षाचा युक्तिवाद लक्षात घेता, अपिलार्थीने केलेल्या तक्रारी वरील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस तूर्तास देऊ नये, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना (वर निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे) देय होत असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. खर्चाबद्दल आदेश नाहीत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, माहिती अधिकारमंच, जेलकॉर्नर, अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१७
निर्णय दिनांक: ०३-०९-२००९

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, : अपिलार्थी
मु.पो. निलेगाव, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, तुळजापूर,
जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय वन अधिकारी,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही, माहिती देण्याचे टाळाटाळ केल्याचे व माहितीच्या अधिकाराचे उल्लंघन केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शिरणापूर व चिवरी येथे त्यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या नालाबंधाऱ्याच्या कामाशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १०.०३.२००८ रोजी जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी उपस्थित नाही. अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे त्यांचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज सादर केल्याचा कोणताही पुरावा त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडला नाही, हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार,मु.पो.निलेगाव, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१८
निर्णय दिनांक: ०३-०९-२००९

१. श्री. प्रकाश विश्वनाथ भोसले, : +ह्य{ह्मफ्ह्मह्म1ह्म
मु.पो.सारोळा,ता.औसा, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : |ह्मह्यiह्मम्ह्मह्मnड्ढ
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अर्जासोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या अर्जासोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन आवश्यक असलेल्या माहितीच्या विवरणपत्रावर अपिलार्थीची स्वाक्षरी नसल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज निकाली काढत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम

१९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयापुर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या |ह्मEन्नाची सुनावणी +ह्मVह्म ह्यnङ्कxह्मह्महE ०३.०९.२००९ न्ह्मुVह्म्र औरंगाबाद द्यह्मुlह्मु Pह्मुhद्यह्मह्मiह्म +ह्मफह्म्र. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस ज्या मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित होती ते मुद्दे त्यांनी आपल्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमूद केले होते. परंतु विवरणपत्रावर अपिलार्थीची स्वाक्षरी नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. याबाबतची कल्पना त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे देखील दिली होती. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या दि. ०४.०८.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये याची कल्पना अपिलार्थीस दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जासोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमूद केली होती. तथापि या विवरणपत्रावर अपिलार्थीची सही नसल्याकारणाने जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांची ही भूमिका तांत्रिक दृष्टीने योग्य आहे. आज रोजी अपिलार्थीच्या उपस्थितीत आयोगाने सूचित केल्याप्रमाणे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी पूर्वीच सादर केलेल्या त्यांच्या मूळ

अर्जासोबत जोडलेल्या विवरणपत्रावर सही केली आहे. अपिलार्थीने या विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेली ९ मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या विवरणपत्राद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात याच कालावधीमध्ये स्वतः उपस्थित राहून हस्तगत करुन घ्यावी लागेल, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या विवरणपत्राद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश विश्वनाथ भोसले,मु.पो.सारोळा,ता.औसा, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१९
निर्णय दिनांकः ०३-०९-२००९

१. श्री. काझी नसिरोद्दीन महेबुब, : अपिलार्थी
उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सहकार आयुक्त कार्यालय,पुणे
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपनिबंधक (आस्थापना),
सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, त्यांनी विचारलेली माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी घेतली नाही. माहिती अधिकारी आणि पहिले अपिलीय अधिकारी हे संबंधित अधिकाऱ्यांना जाणूनबुजून पाठीशी घालत आहेत व माहिती आयुक्त,औरंगाबाद यांच्या आदेशाची जाणूनबुजून पायमल्ली करीत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"मा. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश अपील क्र. २००७/रामाआ/अपील/सीआर,९२४, दि. ०१.०३.२००८ अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व पहिले अपील अधिकारी यांचेवर केलेल्या प्रचलीत नियमानुसार प्रशासकीय कार्यवाहीबाबत. आदेशाची प्रत अवलोकनास्तव जोडली आहे."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. २६.०७.२००८ रोजी अपिलार्थीस दि. ०६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जास उत्तर दिले. तथापि अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या माहितीची आवश्यकता आहे याचा त्यांना बोध होत नव्हता. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दि. २६.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे तशी कल्पनाही दिली होती व राज्य माहिती आयोगाच्या दि. ०१.०३.२००८ रोजीच्या आदेशावर त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या जाणाऱ्या कार्यवाहीची देखील कल्पना दिली होती.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे विशेषतः अपिलार्थीचा मूळ अर्ज पाहता, या

प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चित कोणती माहिती आवश्यक आहे, याचा त्यावरुन बोध होत नाही. राज्य माहिती आयोगाच्या दि. ०१.०३.२००८ रोजीच्या आदेशाप्रमाणे सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य यांनी आवश्यक ती कारवाई संबंधितांच्यावर सुरु केली आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची सद्यस्थिती अवगत करुन देण्यासाठी सहकार आयुक्त कार्यालयाच्या प्रतिनिधीने त्यांच्या कार्यालयातर्फे दि. ०१.०९.२००९ रोजी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून या पत्रातील मजकूर पाहता, जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही केली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती, ती मोघम स्वरुपात असूनही, सहकार आयुक्त यांच्या कार्यालयातर्फे उपलब्ध करुन देण्यात आली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १२१९/०८, दि. २९.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. काझी नसिरोद्दीन महेबुब,मिल्ली कॉलनी,औरंगाबाद रोड, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक (आस्थापना),सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२०
निर्णय दिनांकः ०३-०९-२००९

१. श्री. मो. मोईजखान पठाण, : अपिलार्थी
नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णूपूरी, नांदेड.
२. जन अपिलीय अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णूपूरी, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्राध्यापकांना खाजगी शिकवणी घेणे नियमात आहे काय, ते नियमबाहय असल्यास त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची विद्यापीठाने केलेल्या अंमलबजावणीची तसेच तक्रार केल्यास चौकशी व कारवाई करण्याची पध्दत, गठीत समितीच्या कार्यपध्दती,अधिकार व कर्तव्ये याबाबत कागदपत्रांसह सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले.तथापि त्यांनीही अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी उपस्थित नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. मोईजखान पठाण,द्वारा श्री. राम संगनवार, 'ओम निवास', प्र. नि. हा. शाळेजवळ , कैलासनगर,नांदेड-४३१६०५.

२. जन माहिती अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,विष्णूपूरी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,विष्णूपूरी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२१
निर्णय दिनांक: ०३-०९-२००९

१. श्री. सुधाकर भगवानराव देशमुख, : अपिलार्थी
उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उदगीर,जि.लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०७.२००८ रोजी फेरनोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणूनही, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही शास्ती लावली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००७ रोजी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर परिषद, उदगीर, जि. लातूर करिता सुनिल ट्रेडर्स करत असलेल्या व्यापारी संकुलाच्या बांधकामाविषयी एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले.अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या अपील अर्जावर दि. ३०.११.२००७ रोजी सुनावणी झाली होती. सुनावणीच्या वेळी दिलेल्या तोंडी आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील चार मुद्यांशी संबंधित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दि.०४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती अपूर्ण का वाटत आहे हे स्पष्ट करण्यासाठी, अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच त्यांनी या मुद्यांचे लेखी स्पष्टीकरणही आयोगास आजतागायत सादर केलेले नाही. त्यामुळे विचाराधीन अपिलावर, अपिलार्थीने विचारलेली माहिती व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती, याचा तौलनिक अभ्यास करुन, निर्णय देण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ४ मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात, त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित असलेली, अशा स्वरुपातील व त्यांच्या

कृतीबद्दलची कारणे अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र. २ मधील अंशतः भाग -"ज्या कार्यालयीन हुकूमाद्वारे इमारत वापरास परवानगी दिली गेली त्याची प्रत" या मुद्यावरील माहिती वगळता अपिलार्थीस उर्वरित कोणत्याही मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा खुलासे मागणे आणि त्यांच्याकडून त्यांनी घेतलेल्या एखाद्या निर्णयाबाबत स्पष्टीकरण अपेक्षित करणे, अशास्वरुपाची माहिती मागणे अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशाप्रकारची माहिती ही, अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होत नाही व परिणामी ती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपेक्षिलेली- इमारत वापराच्या परवानगीची प्रत -ही माहिती मात्र अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे त्यांच्या दि. ०४.१२.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता दिसून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस या मुद्यावर सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २८.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर (श्री. भारत राठोड सध्या मुख्याधिकारी, नगर परिषद, मुदखेड, जि. नांदेड) प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य

शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगर पालिका प्रशासन यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगर पालिका प्रशासन यांना, संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. भारत राठोड सध्या मुख्याधिकारी, नगर परिषद, मुदखेड, जि. नांदेड) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०३-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुधाकर भगवानराव देशमुख,देशमुख हॉस्पिटल, नगरपालिकेजवळ,उदगीर,ता.उदगीर, जि.लातूर-४१३ ५१७.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय, राज्य परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२३

निर्णय दिनांक ०४-०९-२००९

१ श्री. शेख हारुन अब्दुल समद, : अपिलार्थी

मु. पो. लोहगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २०-०२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत केलेल्या अर्जावर कार्यवाही न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३-०६-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी या संबंधाने दिनांक १२-०३-२००८ रोजी कारणे दाखवा नोटीस देऊन संबंधितांचा खुलासा मागितला परंतु कोणत्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना माहिती प्राप्त झाली असून या

माहितीमध्ये संबंधिताकडून खुलासा अप्राप्त आहे व या प्रकरणी सारखा पाठपुरावा चालू आहे अशी त्यांना दिनांक २०-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती मिळाली. उपरोक्त प्रकरणी संबंधितांना भरपूर वेळ प्राप्त होऊनही कोणताही त्यांचा खुलासा दाखल केला नाही याचा अर्थ त्यांनी भ्रष्टाचार केला आहे, त्यामुळे विनिर्दीष्ट मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत लोहगांव तालुका पैठण येथील ११ पैकी ०६ ग्रामपंचायत सदस्यांनी लोहगांव ग्रामपंचायतीमध्ये दोन लाखाचा भ्रष्टाचार झाल्याबाबत दिनांक १४-०१-२००८ रोजी दिलेल्या निवेदनावर काय कार्यवाही झाली याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन २००७ शी संबंधित होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती , पैठण यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना दिनांक १२-०३-२००८ रोजी लिहिलेल्या पत्राची प्रत त्यांना पाठविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०६-२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस या प्रकरणी सारखा पाठपुरावा चालू आहे व खुलासा प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या पत्रातील या मजकुराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादावरुन आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस या प्रकरणी संबंधित ग्रामसेवकाने केलेल्या कथित भ्रष्टाचाराबाबत त्यांच्यावर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्वरित कार्यवाही केली जाणे अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, ज्या पत्राने त्यांनी संबंधितांविरुध्द अशी न्याय चौकशी प्रस्तावित करण्यासाठी परिशिष्ट १ ते ४, ज्ञापन दिनांक १७-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे बजावले आहे व संबंधितास या प्रकरणी खुलासा मागितला आहे. त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०५-२००८ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून त्यांनी दिनांक १४-०१-२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर त्वरित कार्यवाही करुन हवी आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरते अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज, प्रथम व व्दितीय अपिलाकडे पाहिल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक १२-०३-२००८, दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या तक्रार अर्जावर त्वरित कार्यवाही होणे अपेक्षित आहे. या मुद्दयासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीस अपेक्षित असलेली कार्यवाही ही पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्वरित कार्यवाही होणे अपेक्षित असल्यास सचिव (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई यांच्याकडे यासंदर्भात पाठपुरावा करणे योग्य राहिल असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२-०३-२००८ व दिनांक २४-०४-०८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविली असल्या-मुळे व अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे कारण नसतांनाही त्यांनी ते केले

असल्यामुळे तसेच अपिलार्थीस अपेक्षित असलेली बाब आयोगाच्या कक्षेबाहेरची असल्यामुळे अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख हारुन अब्दुल समद, मु. पो. लोहगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२४

निर्णय दिनांक ०४-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गोविंद बालाजी चौडेकर,<br>तापडिया प्राईड, सी. बी. ३, महानुभव आश्रमाशेजारी,<br>पैठण रोड, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सह संचालक, सामाजिक वनीकरण वृत्त कार्यालय,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सह संचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, सामाजिक वनीकरण वृत्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विहित मुदतीत अर्ज सादर करुनही त्यांना मोटारसायकल अग्रिम मंजूर न केल्यामुळे व तसेच ज्या कर्मचाऱ्याचे नांव प्रतिक्षायादीमध्ये नव्हते त्यांना अग्रिम मंजूर केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी ०४-०५, व ५-६ या दरम्यान शासनाकडून मोटार सायकल ॲडव्हॉन्स घेण्याकरिता केलेल्या अर्जासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांनी मोटार सायकल ॲडव्हॉन्ससाठी दिलेल्या अर्जाची प्रत, अपिलार्थीचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला त्या पत्राची प्रत, मोटार सायकल ॲडव्हॉन्ससाठी वृत्तस्तरावर तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षायादीची प्रत, मोटार सायकल ॲडव्हान्स मंजूरीची कार्यपध्दती दिनांक ३१-०३-२००८ अखेरपर्यंतच्या शासन आदेशान्वये कर्मचा-यांना मोटार सायकल ॲडव्हॉन्स दिलेल्या आदेशाची / यादीची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जाच्या संदर्भात त्यांनी त्यांच्या दि. १०-०६-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना पुरविण्यात येणा-या माहितीचे शुल्क रु. ४० इतके त्यांना चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १९-०६-२००८ रोजी शुल्काचा भरणा करुन चलन पावती त्यांच्या कार्यालयात सादर केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविली . तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, दिनांक १२-०५-२००८,२६-०६-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, या प्रकरणी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्यांनी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे या मुद्दयावरील माहिती मागणी करण्याचे सूचित केले आहे. तर मुद्दा क्रमांक ५च्या संदर्भात अपिलार्थीस त्यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती अथवा त्या माहितीचा कोणताही भाग जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी अर्जदाराच्या अर्जाच्या संबंधित भागाची प्रत अथवा अर्जदाराच्या अर्जाची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अर्जदाराचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठविणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे न करता अपिलार्थीस त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे मागणी करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने केल्या गेलेल्या व्दितीय समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके चलनाव्दारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा दिनांक १९-०६-२००८ रोजी केला असता, अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस पूर्णतः चुकीची दिली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोटार सायकल ॲडव्हॉन्स मंजुरीची कार्यपध्दतीची प्रत किंवा त्याबद्दलची माहिती अशी माहिती मागितली होती. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मोटार सायकल ॲडव्हान्स मंजूरीकरता निश्चितपणे कोणती कार्यपध्दती वापरावी या संदर्भात शासन अथवा त्यांच्या वरीष्ठ कार्यालयाने त्यांना दिलेल्या निर्देशाची प्रत देणे अपेक्षित आहे. तथापि या मुद्दयाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या पत्रामध्ये ज्या कर्मचा-यांनी मोटार सायकल अग्रिम मंजूर झाले आहे त्यांची यादी पाठविली. थोडक्यात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भातील माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे दिसून येते. मुद्दा क्रमांक ५ व्दारे अपिलार्थीने दिनांक ३१-०३-२००८ अखेरपर्यंतच्या शासन आदेशान्वये कर्मचा-यांस मोटार सायकल ॲडव्हान्स मंजूर केला होता त्या आदेशाची यादीसह प्रत मागितली होती. तथापि शासनाच्या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. यावरुन असे आढळून येते की, अपिलार्थी त्यांच्याकडून माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी स्वीकृत करुनही त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा ती देण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रयत्न केला नाही, हे पाहता, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकृत केलेले संपूर्ण शुल्क त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कर्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले संपूर्ण शुल्क त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

४. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत अहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोविंद बालाजी चौडेकर, तापडिया प्राईड, सी. बी. ३, महानुभव आश्रम शेजारी, पैठण रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, सामाजिक वनीकरण वृत्त कार्यालय, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२५

निर्णय दिनांक ०४-०९-२००९

१ श्री. भिमराव कोंडीबा भोसले, : अपिलार्थी
ब्लॉक क्रमांक ११, फुले कॉलनी, शिवाजी हायस्कूलसमोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य, श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड,
तालुका जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. जी. बी. सोंडगे

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली त्यामुळे त्यांनी या प्रकरणी दिनांक ३१-०३-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी यावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. जी. बी. सोंडगे यांच्या संदर्भात एकूण ११ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रा-वरुन आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन या अपील अर्जावर प्रथम निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसाच्या आत सुनावणी घ्यावी व या कालावधीतच आपले आदेश पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसाच्या आत सुनावणी घ्यावी व या कालावधीतच आपले आदेश पारीत करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भिमराव कोंडीबा भोसले, ब्लॉक क्रमांक ११, फुले कॉलनी, शिवाजी हायस्कूल समोर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२६

निर्णय दिनांक ०४-०९-२००९

१ श्री. संदीपान आप्पाराव थोरात, : अपिलार्थी
व्दारा मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर,
तालुका धारुर, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
श्री विठ्ठल शिक्षण संस्था संचलित
नूतन माध्यमिक विद्यालय, अंजनडोह, तालुका धारुर,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव, श्री विठ्ठल शिक्षण संस्था संचलित
नूतन माध्यमिक विद्यालय, अंजनडोह, तालुका धारुर,
जिल्हा बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, नूतन माध्यमिक विद्यालय, अंजनडोह, तालुका धारुर, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक ११-०२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागविली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०५-२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. ही माहिती अपिलार्थीस विलंबाने प्राप्त झाल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे त्यांच्यावर शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. तसेच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ प्रमाणे त्यांच्या कार्यालयाने करावयाच्या / केलेल्या १७ कामांच्या संदर्भात माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या कामाच्या संदर्भात दिनांक १८-०६-२००५ रोजीचे परिपत्रक जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस माहिती पुरविणे शक्य होत नाही असे त्यांना कळविले व सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती कळविण्यात येईल, असे अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज संस्थेच्या सचिवास प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय होऊ शकला नाही. परंतु तदनंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज ज्यावेळी त्यांच्याकडे प्राप्त झाला त्यावेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या ज्या आदेशाच्या संदर्भाने माहिती मागितली होती, ते आदेश त्यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याने त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत दिनांक २५-०२-२००८ रोजी वस्तुस्थिती कळविली. त्यानंतर त्यांनी प्रयत्न करुन सदर आदेश कृषी उत्पन्न बाजार समिती, किल्ले धारुर यांच्याकडून प्राप्त करुन घेतले व अपिलार्थीस दिनांक २६-०४-२००८ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे व ती ७ दिवसाच्या आत स्वखर्चाने हस्तगत करण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांच्या कार्यालयाने दिनांक २४-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी-पासून माहिती लपविण्याचा त्यांचा कधीही हेतू नव्हता.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी अपिलार्थीस प्रथम दिनांक २६-०४-२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली व तदनंतर अपिलार्थीने ही माहिती दिनांक २६-०५-२००८ रोजी स्वीकृत केली आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याची त्यांची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर विलंबाने माहिती दिल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्याची मागणी केलेली आहे. या

मुद्दयासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्यावेळी प्रथमतः प्राप्त झाला त्यावेळी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पत्र लिहून वस्तुस्थिती अपिलार्थी समोर आणली आहे. अशा वेळी अपिलार्थीने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकाची प्रत जन माहिती अधिकारी यांना लगेच पुरविली असती तर कदाचित माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना सकारात्मक प्रतिसाद दिला, असे म्हणता आले असते. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. त्यानंतर अपिलार्थीने संबंधित संस्थेच्या सचिवाकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केल्याचे नमूद केले आहे. परंतु सदर अपील अर्ज संस्थेच्या सचिवांकडे कधीही प्राप्त झाला नाही असे संस्थेच्या सचिवांनी आज रोजी आयोगास अवगत केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपील अर्ज करणे अनिवार्य असतांना देखील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केला नाही व आयोगा-कडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही दुष्ट हेतूने टाळलेले नाही. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाची प्रत त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती धारुर येथे शोध घेऊन अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. या संपूर्ण घटनाक्रमाच्या प्रत्येक टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने त्यांच्या क्षमतेनुसार अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. मात्र या उलट अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज न करता आयोगाकडे सरळ व्दितीय अपील सादर केले आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २६-०५-२००८ रोजी माहिती प्राप्त झाली असतांना देखील त्यांनी आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे

आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. हे पाहता अपिलार्थीचा या प्रकरणी त्यांना आवश्यक माहिती प्राप्त होण्यापेक्षा जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने शास्ती लावण्याचे आदेश पारित करावेत अशा प्रकारचा उद्देश असल्याचे दिसून येते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही असद्हेतूने अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यासंदर्भात केलेली त्यांची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संदीपान आप्पाराव थोरात, व्दारा मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नूतन माध्यमिक विद्यालय, अंजनडोह, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री विठ्ठल शिक्षण संस्था संचलित, अंजनडोह, तालुका धारुर, जिल्हा बीड मार्फत नूतन माध्यमिक विद्यालय, अंजनडोह, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२७

निर्णय दिनांक ०४-०९-२००९

१ श्री. विष्णू महादेव आंधळे : अपिलार्थी
ता. परळी (वै)जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक,
ग्रा.पं.मरळवाडी ता.परळी (वै) जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गटविकास अधिकारी,
पं.स.परळी (वै) जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाही या संदर्भात अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १७-०८-२००९रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून त्यामध्ये अपिलार्थीनी असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी दिनांक ०७-०४-२००८ रोजी केलेल्या अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ३१-०५-२००८ रोजी शूल्क भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने त्यांचे समाधान झाले आहे या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांचे विचाराधीन अपील वरील दिनांक ०४-०९-२००९ रोजी ठेवलेली सुनावणी रद्द करण्यात यावी. अपिलार्थीच्या या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली

असल्याने आयोगाचा केलेला त्यांचा दिनांक १७-०८-२००९ रोजीच्या विनंती प्राप्त अपीलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विष्णू महादेव आंधळे ता.परळी (वै) जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं.मरळवाडी ता. परळी (वै) जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी पं.स.परळी (वै) जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२८

निर्णय दिनांक ०४-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख आयुब पटेल,<br>मु. पो. खाजानगर, खासबाग, देवी रोड, बीड,<br>तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग केज, तालुका केज, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०७-२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी कुशल व अकुशल भागावर किती खर्च

झाला या संदर्भात कोणतीही माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे साळेगाव तालुका केज येथील गट क्रमांक ५/५ मध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली केलेला पाझर तलाव क्रमांक २ या कामाच्या अंदाजपत्रकाची सत्यप्रत व कुशल, अकुशल कामावर झालेला खर्च याची माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हे आदेश निर्गमित केल्यानंतरही अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कुशल व अकुशल भागावर झालेला खर्च ही माहिती प्राप्त होऊ न शकल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केला असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली व त्यांच्या मूळ अर्जातील कुशल व अकुशल भागावरील खर्चाच्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले .

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५४ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. आता अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कुशल व अकुशल भागावरील खर्चाच्या संदर्भात त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असून ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास ते तयार आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने ज्या कामाच्या संदर्भात त्यांच्याकडे माहिती मागविली होती त्या कामामध्ये अकुशल भागावर कोणताही खर्च झालेला नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक ११-१२-२००७ रोजी पाठविलेल्या पत्राचा पुरावा म्हणून त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीच्या सत्यप्रती मागितल्या असता त्यांना अशा प्रकारचा कोणताही पुरावा आयोगास सादर करता आला नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांचे दिनांक ११-१२-२००७ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही हा अपिलार्थीचा युक्तिवाद आयोग मान्य करीत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे त्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद देणे गरजेचे होते. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-१२-०७ च्या पत्राद्वारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास अवगत केले. तथापि या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केला नाही, अथवा आता तो सादर करु शकत नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ११-१२-२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही हा अपिलार्थीचा युक्तिवाद मान्य करण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अंदाजपत्रकाच्या सत्यप्रती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०१-२००८ रोजी पुरविल्या आहेत. तथापि कुशल व अकुशल भागावरील खर्च त्यांनी अद्यापही अपिलार्थीस पुरविलेला नाही.

थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीन दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कुशल व अकुशल भागावर झालेला खर्च या मुद्यावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी कुशल व अकुशल भागावर झालेला खर्च या मुद्दयावरील माहिती देणे अत्यंत सोपे होते हे जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादावरुन स्पष्ट होते. परंतु एवढे असूनही त्यांनी ही माहिती अपिलार्थीस अद्यापपावेतो न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन त्यांच्या या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख आयुब पटेल, मु. पो. खाजानगर, खासबाग, देवी रोड, बीड, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२९
निर्णय दिनांक: ०४-०९-२००९

१. श्री. परमेश्वर श्रीराम शिंदे, : अपिलार्थी
मु.पो.टाकळी (देशमुख),पो. पांगरी,
ता.परळी (वै.),जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार(महसूल),
तहसील कार्यालय, परळी (वै.),
जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,परळी (वै.),
जि.बीड

त्रयस्थ पक्ष : श्री.श्रीराम शिंदे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,परळी (वै.) यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले शपथपत्र आयोगास सादर केले असून, या शपत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपील क्र.१२२९/०८ च्या संदर्भात त्यांना संपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्यामुळे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडील विचाराधीन अपील, त्यांना आवश्यक ती माहिती संबंधितांच्याकडून प्राप्त झाल्यामुळे निकाली काढण्याची केलेली विनंती आयोग मान्य करीत आहे.

सबब अपिलार्थीच्या अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १२२९/०८, दि. १९.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. परमेश्वर श्रीराम शिंदे, मु. टाकळी (देशमुख) पो. पांगरी, ता. परळी (वै.),जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(महसूल),तहसील कार्यालय, परळी (वै.),जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,परळी (वै.),जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२३०
निर्णय दिनांकः ०४-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शामराव नारायणराव नागरगोजे, रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा थेरला, ता.पाटोदा, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पाटोदा, जि.बीड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी माहितीपोटीचे शुल्क रु.१२३७/- इतके जन माहिती अधिकारी यांना मनीऑर्डरने पाठवूनदेखील त्यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आयोगास त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आणि या प्रकरणी त्यांनी माहितीपोटीचे भरलेले शुल्क रु. १२३७/- आणि पोस्टाचे कमिशन रु.६२/- त्यांना परत देण्याविषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे बीड जिल्हयातील मौ. रोहतवाडी, तालुका पाटोदा येथील स.नं. व ग.नं.चे ७/१२ चे उतारे आणि फेरफाराच्या प्रमाणपत्राची नक्कल त्यांना प्राप्त झाली नसल्याबाबतची कारणे अपेक्षित करणारी एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन १९६०-६१ ते १९७६-७७ व दि. ०१.०३.२००८ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व्हे नं.४/२,७,१०,११,२५,१३०,१३२ व १३४ या जमिनीचे सन १९६०-६१ ते १९७६-७७ या सालचे ७/१२ चे प्रमाणित उतारे, ग.नं. १०६ या जमिनीचा २००७-०८ या सालाचा ७/१२ चा प्रमाणित उतारा, फेरफार क्र. ३०, ३५,३७, २५२, २५४,३७६, ४०७, ४१०, ४२१, ४२२,४५९,५३८ व फेरफार क्र. ६१० मौ. रोहतवाडी या सर्वांच्या प्रमाणित नकला आणि अपिलार्थीने तलाठी, सजा थेरला यांच्याकडे प्रमाणित नकला मिळणेसाठी दि. १४.१२.२००७ रोजी ॲडव्हान्स फी भरुन घेण्याच्या विनंतीसहीत अर्ज केला होता पण त्यांनी फीस स्वीकारली नाही व अपिलार्थीस दि.०१.०३.२००८ पर्यंत त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या नकला दिल्या नाहीत, याची कारणे, दि. १४.१२.२००७ पासून दि. ०१.०३.२००८ पर्यंतची संपूर्ण माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रु. १२३७/- इतके त्यांना मनिऑर्डरद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्याचे व जन माहिती अधिकारी यांना विनाकारण मानसिक त्रास देऊ नये, असे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रानुसार अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.०३.२००८ रोजी एकूण रु. १२३७/- इतक्या रकमेची मनीऑर्डर केली, ती मनिऑर्डर करताना त्यांना एकूण रु.६२/- इतके कमिशन पोस्टाकडे भरावे लागले. सदर मनिऑर्डर जन माहिती अधिकारी यांना दि. ०७.०४.२००८ रोजी प्राप्त झाली. तथापि आवश्यक ते शुल्क प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील

केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो, त्यांनी आवश्यक त्या माहितीपोटीच्या रकमेचा त्यांच्याकडे भरणा करुनही कोणतीही माहिती दिली नाही. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही व त्यांना त्यांच्या या अपिलासंदर्भातील निर्णय दि. ०१.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला. सदर निर्णय त्यांना, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल केल्यानंतर दि. ११.०८.२००८ रोजी प्राप्त झाला. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- इतकी शास्ती लावण्यात यावी व माहितीपोटीचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरलेले शुल्क आणि पोस्टाचे कमिशन असे एकूण रु.१२९९/- इतके त्यांना परत मिळावेत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी संबंधित तलाठी यांच्याकडे माहितीपोटीचे मनिऑर्डरद्वारे पाठविलेले शुल्क संबंधित तलाठयाने अद्यापपावेतो शासकीय कोषागारात जमा केलेले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण चार मुद्यांवरील माहिती पैकी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने, "तेव्हा असे का घडले याची दि. १४.१२.२००७ ते आतापर्यंतची संपूर्ण माहिती " अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अशाप्रकारची माहिती ही अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित तीनही मुद्यांवरील माहिती, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रु. १२३७/- इतके व मनिऑर्डरचे कमिशन रु. ६२/- इतके सहन करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नाही, ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीची शोकांतिका आहे, असे येथे म्हटले तर फारसे वावगे ठरणार नाही. याहीपेक्षा दुसरे असे महत्त्वाचे की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेल्या तक्रारीप्रमाणे संबंधित तलाठयाने खरोखरीच अपिलार्थीने मनिऑर्डरद्वारे पाठविलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केला किंवा कसे यासंदर्भात कसून चौकशी करावी व या प्रकरणी जर संबंधित तलाठी दोषी आढळून आले तर त्यांच्यावर शासकीय रकमेचा अपहार केल्याप्रकरणी न चुकता प्रचलीत नियमाप्रमाणे आवश्यक ती कारवाई करावी व जर जन माहिती अधिकारी यांनी या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केला असेल तर अपिलार्थीने या प्रकरणी माहितीपोटी भरलेले शुल्क रु. १२३७/- अधिक मनीऑर्डर पाठविण्यासाठी केलेला खर्च रु. ६२/- असे एकूण रु. १२९९/- इतकी रक्कम त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावी, असे जन अपिलीय अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजतागायत माहिती प्राप्त न झाल्याने अधिनियमातील कलम ७(६) नुसार आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही

माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये कबूल केल्याप्रमाणे, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ३ शी संबंधित संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहितीपोटीच्या आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत कोणतीही माहिती न पुरविल्याने ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब उपविभागीय अधिकारी, बीड यांना संबंधित तलाठी, सजा थेरला तथा जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

कृ.मा.प. ..६.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त[illegible] ागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,२ व ३ शी संबंधित संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उपविभागीय अधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा थेरला, ता.पाटोदा,जि.बीड यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. तहसीलदार, पाटोदा यांनी अपिलार्थीने मनीऑर्डरद्वारे पाठविलेल्या माहितीपोटीच्या शुल्काच्या रकमेबाबत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत कार्यवाही करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शामराव नारायणराव नागरगोजे,रा.यशवंतराव चव्हाण नाटयगृहाजवळ, आनंदनगर, कॅनॉल रोड (दक्षिण), जुना नगर नाका,बीड- ४३१ १२२

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा थेरला, ता.पाटोदा, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पाटोदा, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपविभागीय अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२३१
निर्णय दिनांकः ०४-०९-२००९

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, : अपिलार्थी
अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई,
जि.बीड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकाऱ्यांनी माहिती न पुरविल्यामुळे द्वितीय अपील केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगरपरिषद, अंबाजोगाई यांच्या कार्यक्षेत्रातील वैधानिक विकास महामंडळातर्फे पुरविण्यात आलेल्या निधीअंतर्गत केलेल्या विकास कामांसंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.०३.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे तक्रार केली होती. यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - यासंदर्भात केलेल्या अर्जातील मांडलेल्या २३ मुद्यांवर कोणत्या

प्रकारची चौकशी केली आहे, यासंदर्भातील कागदपत्रांच्या प्रती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत तळयाच्या कामकाजाबद्दल प्रत्यक्षात पाहणी केलेल्या अहवालाची माहिती व लेखी प्रत आणि त्यावरील अभिलेखे,दस्तऐवज तपासणी अधिकाराच्या तरतुदीखाली दाखविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जासोबत त्यांच्या दि. २३.०३.२००७ रोजीच्या तक्रार अर्जाची प्रत जोडली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०८.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. १२.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले व अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांवरील माहितीचे अनुपालन सात दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. या नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीमध्ये त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन पाठविले. तथापि यानंतरही समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून त्याचे अवलोकन करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपावेतो त्यांनी माहिती न पुरविण्याचे कारण, जन माहिती अधिकारी यांच्या दि. ३०.०८.२००७ रोजीच्या पत्रानुसार मुख्य अभियंता, वनक्षेत्रपाल व पोलीस निरीक्षक यांचा अहवाल मागविण्यात आला होता तर माहिती का दिली नाही ? अधिनियमातील कलम ७(१)(तीन) चे पालन का केले नाही ? या

मुद्यावर तसेच प्रलंबित Quality Control तपासणी अहवाल यासंदर्भात माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते. या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना या प्रकरणी कराव्या लागलेल्या मानसिक व आर्थिक त्रासाबद्दल त्यांना एकूण रु. ५०००/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्याची, कार्यालयीन कामकाजात अनियमितता, भष्टाचाऱ्यांना पाठबळ दिल्याबद्दल उपजिल्हाधिकारी श्री. निशिकांत देशपांडे व सहायक माहिती अधिकारी यांच्यावर नागरी सेवा शिस्त व अपिल, १९७९(४) नुसार कार्यवाही, नियम २०(१) नुसार रु.२५०००/- दंड व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची अवहेलना केल्यामुळे फौजदारी कार्यवाही आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या दि. ०६.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती हवी आहे, त्या प्रकरणाशी त्यांचा कोणत्याही प्रकारे संबंध येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नगर परिषद, अंबाजोगाई यांच्याशी संबंधित असून अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. २३.०३.२००७ रोजी केलेल्या अर्जाची चौकशी पाटबंधारे विभागाच्या दक्षता व गुण नियंत्रण विभागाकडे प्रलंबित आहे व अपिलार्थीस आवश्यक असलेली आणि त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ३०.०८.२००७ रोजी पुरविली आहे. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये आदेशित केल्याप्रमाणे अपिलार्थीने प्रथम अपील सुनावणीच्या वेळी उपस्थित केलेल्या सर्व शंकांचे निरसन त्यांनी त्यांच्या दि.१७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.०३.२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित कार्यवाही होणे अपेक्षित असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पहावयाचे झाल्यास असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील तीनही मुद्यांची, जन माहिती अधिकारी यांनी

त्यांच्या दि. ३०.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. फक्त या माहितीमध्ये त्यांनी अपिलार्थीस स्वत: त्यांच्याकडील माहितीशी संबंधित कागदपत्रांच्या प्रती न देता अपिलार्थीने वेगवेगळया प्राधिकरणाने वेगवेगळया वेळी दिलेले संदर्भ नमूद करुन ती माहिती अपिलार्थीस वेगळया प्राधिकरणाकडून दिली गेली असल्याचे अनुमान काढले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती, जरी ती अर्जदाराकडे वेगळया संदर्भाद्वारे प्राप्त झाल्याचा त्यांच्याकडे पुरावा असला तरीही या अर्जासंदर्भात देणे त्यांना अनिवार्य आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले नसल्याबाबत आयोगाकडे आक्षेप नोंदविले आहेत. त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम ७(३) मधील तरतुदीप्रमाणे प्रथमत: कार्यवाही करावी. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या लेखी युक्तिवादामधील त्यांची नुकसान भरपाईची आणि जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती, आयोग आवश्यक त्या पुराव्याअभावी मान्य करीत नाही. तसेच अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असदूहेतूने माहिती लपविल्याचे अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली, संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, माहिती अधिकार मंच, जेल कॉर्नर, अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२३२
निर्णय दिनांक: ०४-०९-२००९

१. श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
मु.जानापूरी, पो. वडेपुरी, ता.लोहा,
जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.),नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येते, तसेच या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१७.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातून भोकर तालुक्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत केल्या गेलेल्या सर्व कामांच्या मस्टर्सच्या प्रती, प्रत्येक कामाचा खर्च, इत्यादी सन २००३-२००७ या कालावधीशी संबंधित संपूर्ण माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन संबंधित ग्रामसेवकाच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत जोडली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०१.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण अनुदान रु. २७,३२०/- इतके त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडून मागविले असून हे अनुदान उपलब्ध होताच अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आश्वासित केले व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, अनुदान उपलब्ध होताच विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपील अर्जावर निर्णय दिला असतानाही अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याचे असत्य विधान करुन वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे तथापि ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी येणारा एकूण खर्च रु. २७,३२०/- करण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक ते अनुदान उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध असल्याचे कळविले. त्यामुळे या अपील प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असद्हेतूने माहिती देण्याचे टाळले असल्याचे या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दिसून येत नाही. तथापि

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी येणाऱ्या खर्चाइतके अनुदान जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांच्या कार्यालयातर्फे तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली आहे. हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत जाऊन ती स्वतः तपासावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस तपासणीसाठी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व तदनंतर आवश्यक ते अनुदान उपलब्ध झाल्यास, ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांपर्यंत तपासणीसाठी व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो.वडेपूरी, एस.आर.टी., ता.लोहा, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर,जि.नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२३३
निर्णय दिनांकः ०४-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार,<br>मु.पो.निलेगाव, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | +ह्य{ह्मफ्ह्मह्म1ह्म |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग,<br>ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | \|ह्मह्यiह्मम्ह्मह्मnड्ढ |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना परिपूर्ण माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने व विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने आणि माहितीच्या कायद्याचे उल्लंघन झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली होती. तथापि ही माहिती संबंधितांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व तदनंतर राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या |ह्मEन्नणाची सुनावणी +ह्मVह्म ह्मnङ्गxह्मह्महE ०४.०९.२००९ ऱ्ह्मुVह्म्र औरंगाबाद द्यह्मुlह्मु Pह्मुhद्यह्मह्मांह्म +ह्मफ्ह्म्र. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी उपस्थित नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि.२५.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि.२२.०४.२००८ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत आयोगास सादर केली. यावरुन असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते.

अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्जासोबत त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज आयोगास सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली किंवा कसे, हे कळण्यास आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २२.०४.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये बदल करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन आढळून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार,मु.पो.निलेगाव, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७५१
निर्णय दिनांक: ०४-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक संचालक,<br>नगर रचना विभाग,महानगरपालिका,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपअभियंता,
नगररचना विभाग,
महानगरपालिका,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक संचालक,
नगर रचना विभाग,
महानगरपालिका,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना दि. ०५.०९.२००७ रोजी प्राप्त झाला त्याद्वारे, "नारळीबाग भुखंड घोटाळा व

गैरव्यवहाराची माहिती व कागदपत्रे मिळणेबाबत" या विषयावर एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीस कुठलाही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीचे व स्वरुपाचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या दि. १०.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १०.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

क्र.मा.प.३...

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१०.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे,रा.२१,चैतन्य गुरुनगर, सिडको-एन-८,एफ-४,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगररचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १२३४/२००८ व १२३५/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२३४ व १२३५

निर्णय दिनांक ०५-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख नईम शेख लाल,<br>नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली,<br>जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : अपील क्रमांक १२३४/२००८ : श्री. सुरेश नामदेवराव अंबुलगेकर

त्रयस्थ पक्ष : अपील क्रमांक १२३५/२००८ : श्री. नंदकिशोर वसंतराव नाईनवाड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०८-२००८ व दिनांक २६-०८-२००८ रोजी नोंदणी केलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या

विचाराधीन आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक १२३४/२००८ व १२३५/२००८ व्दारे अनुक्रमे त्रयस्थ पक्ष श्री. सुरेश नामदेवराव अंबुलगेकर व श्री. नंदकिशोर वसंतराव नाईनवाड यांच्यासंदर्भात काही वैयक्तीक स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संबंधित त्रयस्थ पक्षाला मन्नेरवारलू या अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक १६-१०-१९८२ व दिनांक २८-०५-७९ रोजी निर्गमित केले होते. हे जातीचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या अर्जाच्या व त्यासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जांस जन माहिती अधिकारी यांनी अनुक्रमे दि. ०९-०५-२००८, १३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन श्री. सुरेश नामदेवराव अंबुलगेकर यांच्या जात प्रमाणपत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांना सादर केल्यास त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना पुरविता येईल असे अपिलार्थीस अवगत केले व श्री. नंदकिशोर वसंतराव नाईनवाड यांच्या संदर्भात केलेल्या अर्जाबाबत अपिलार्थीने मागणी केलेली माहिती लखिना पॅटर्नमध्ये नष्ट करण्यात आली असल्याचे दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. या माहितीने समाधान न झ ााल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड यांच्याकडे अपील क्रमांक १२३४/२००८, १२३५/२००८ च्या संदर्भात अनुक्रमे दिनांक ०९-०६-२००८ व दिनांक २५-०६-२००८ रोजी प्रथम अपिले केली. तथापि या अपील अर्जांवर कोणतेही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०६-२००८ व दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०६-२००८ व दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली विचाराधीन दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १२३४/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १२३५/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

३. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०६-२००८ व दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १२३६/०८ व १२३७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२३६ व १२३७

निर्णय दिनांक ०५-०९-२००९

१ श्री. रामचंद्र मारुती कांबळे, अपिलार्थी

वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ अपील क्रमांक १२३६/०८

जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अणदूर,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ अपील क्रमांक १२३७/०८

जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहापूर,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

३ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व अपील क्रमांक १२३७/२००८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेली त्यांची दिनांक ०५-०९-२००९ रोजीची दोन पत्रे सादर केली असून या पत्रांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना उपरोक्त दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे आयोगाकडे दाखल केलेली त्यांची विचाराधीन अपिले क्रमांक १२३६/२००८ व १२३७/२००८ ही ते स्वखुषीने मागे घेत आहेत. त्यामुळे अपिलार्थीची विचाराधीन अपिले रद्द करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थी, त्यांची राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली विचाराधीन अपिले क्रमांक १२३६/२००८ व १२३७/२००८ ते स्वखुषीने मागे घेत असल्याने, त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १२३६/२००८, दिनांक ३०-०९-२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १२३७/२००८, दिनांक ३०-०९-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०९-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामचंद्र मारुती कांबळे, वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा

उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अणदूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२३८

निर्णय दिनांक ०५-०९-२००९

१ श्री. विठ्ठल दिगंबर गरड, अपिलार्थी
रा. चिंचपूर (खु.), तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचपूर (खु.),
तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, तालुका
परंडा, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे व असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी तीस दिवसात माहिती द्यावी असे आदेश देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही माहिती न दिल्यामुळे नाराजीने ते आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज सादर करीत आहेत.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जावर दिनांकाचा कोणताही उलेख केलेला नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी श्री. गरड दत्तात्रय रोहिदास यांच्यातर्फे आयोगास अपिलार्थीचे दिनांक १५-०८-२००९ रोजीचे एक निवेदन सादर करण्यात आले असून या निवेदनामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती दिनांक १५-०८-२००९ रोजी मिळाली असल्याचा कबूली जबाब दिलेला आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, हे पाहता व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १५-०८-२००९ रोजी मिळाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १२३८/२००८, दिनांक १५-०९-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०९-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विठ्ठल दिगंबर गरड, रा. चिंचपूर (खु.), तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचपूर (खु.), तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२४२
निर्णय दिनांक ०५-०९-२००९

१. श्री. मनोहर माधवराव थोरात, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (तेंदु पाने)
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००८ रोजी माहिती मागविली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे सहायक वनसंरक्षक (तेंदू पाने), नांदेड यांच्याकडे दि.०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन नियमबाहय निर्णय दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील आर्थिक वर्ष २००१ ते मार्च २००८ या कालावधीमध्ये केल्या गेलेल्या रोजगार हमी योजनेच्या व इतर योजनांच्या कामाची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - झालेल्या कामाची गावनिहाय यादी, एलबीसी,सीटीएस या कामाची संपूर्ण यादी, अंदाजपत्रक, कामाच्या मोजमापपुस्तिकेच्या सत्यप्रती, उपस्थित मजूरांचे

मस्टर व पेशिटच्या सत्यप्रती, रो.ह.यो.कामाशिवाय राबविण्यात आलेल्या इतर योजना, यासाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीची रक्कम, कामावरील खर्चाचा लेखी तपशील, काम केलेल्या संस्था व एजंसीची नावे, त्यांना अदा केलेल्या देयकाच्या सत्यप्रती तसेच नमुना नं.४ च्या तपशीलवार सत्यपती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.३०.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३०,०००/- इतके अपिलार्थीस चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. २१.०५.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचा तपशील कळवून त्यानंतर तीन दिवसांच्या आत अपिलार्थीने या रकमेच्या भरणा केल्यानंतर अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. सदर निर्णयाचे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी दि.३०.०४.२००८ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्राद्वारे कळविले, सदर पत्र त्यांनी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा

भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्यामुळे ते अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती पुरवू शकले नाही.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि.०१.०४.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या दि. ०१.०४.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३०,०००/- इतके शुल्क चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कलम ७(३)(क) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळविताना त्यांचा संपूर्ण तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अशाप्रकारचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ३०.०४.२००८ रोजीच्या पत्रामध्ये दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागणाऱ्य खर्चाइतकी रक्कम त्यांच्या कार्यालयाकडे सध्या उपलब्ध नाही. वरिष्ठ कार्यालयाकडून असे अनुदान प्राप्त झाल्यानंतर ते अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत. ही माहिती प्रत्यक्षतः हातात पडण्यापूर्वी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या या माहितीच्या अभिलेख्याचे निरीक्षण करु शकतात व त्यामधून त्यांना अत्यावश्यक असलेली माहिती विनामूल्य प्राप्त करुन घेऊ शकतात. जन माहिती अधिकारी यांनी सूचविलेल्या या पर्यायाला अपिलार्थीने आयोगासमोर सहमती दर्शविली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस याच कालावधीत उपलब्ध द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस याच कालावधीत उपलब्ध द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनोहर माधवराव थोरात,रा.देगावचाळ, घर नं. २-२-१२४, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदु पाने)नांदेड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १२३९/०८ , १२४०/०८ व १२४१/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२३९,१२४० व १२४१
निर्णय दिनांक ०५-०९-२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ १. अपील क्र. १२३९/०८
जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर, जि.नांदेड
२. अपील क्र. १२४०/०८
जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी, जि.नांदेड
३. अपील क्र. १२४१/०८
जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट, जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (जंकास),किनवट, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेली एकूण तीन स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र.१२३९/०८, १२४०/०८ व १२४१/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ११.०४.२००८ रोजीच्या तीन स्वतंत्र अर्जाद्वारे माहितीची मागणी केली असता, संबंधितांनी मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दि. १३.०५, १२.०५व

१२.०५.२००८ रोजी तीन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपील क्र. १२३९/०८ शी संबंधित प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व अपील क्र १२४०/०८ व १२४१/०८ शी संबंधित प्रथम अपिलांवर दि.१०.०६.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेऊन नियमबाहय निर्णय दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०४.२००८ या एकाच दिवशी माहिती अधिकार अधिनियमान्वये तीन स्वतंत्र प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, माहूर, मांडवी व किनवट यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी आर्थिक वर्ष २००१ ते दि. ३१.०३. २००८ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाअंतर्गत झालेल्या रोहयोतील कामाच्या गावनिहाय याद्या, एल.बी.सी., सी.टी.एस. या कामाच्या पूर्ण याद्या, अंदाजपत्रक, कामाच्या मोजमाप पुस्तिकांच्या प्रती आणि झालेल्या कामावर उपस्थित असलेल्या मजूरांचे मस्टर्स तसेच पेशिटच्या सत्यप्रती, रोहयोशिवाय संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे ज्या योजना राबविण्यात आल्या, त्याकरिता शासनाकडून प्राप्त झालेला निधी, कामनिहाय खर्च याचा लेखी तपशील, काम केलेल्या संस्था आणि एजन्सीची नावे व त्यांना देण्यात आलेल्या देयकांच्या प्रती, तसेच नमुना नं.४ च्या तपशीलवार सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांनी दि.०१.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना पुरविली व वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी त्यांच्याकडील दि.०५.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४८,२९२/- इतके चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर यांच्या आदेशाविरुध्द दि. १३.०५.२००८ व वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी व वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट यांच्या निर्णयाविरुध्द दि.१२.०५.२००८ रोजी, अशी एकुण तीन स्वतंत्र प्रथम अपिले केली. या अपिलांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०६.२००८ व दि. ३०.०५.२००८ रोजी निर्णय देऊन वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर व मांडवी यांच्याकडून अपिलार्थीस विनामूल्य व वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांच्याकडून सशुल्क माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयांनी व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०८.२००८ रोजी विचाराधीन तीन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दि. ०५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तीनही प्रकरणातील जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि.२०.०९.२००८ रोजी संपूर्ण माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीचे त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याबद्दलचे दि.२०.०९.२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. अशाचप्रकारचे अपिलार्थीचे दि.१२.१२.२००८ रोजीचे पत्र वनपरिक्षेत्र, मांडवी यांनी देखील आयोगास सादर केले आहे.

वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरविली नाही. यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीचे दि.२७.०५.२००८ रोजीचे एक निवेदन आयोगास सादर केले असून या निवेदनामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४८,२९२/- इतके त्यांनी चलनाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले नाही. कारण त्यांना दिलेली माहिती बरोबर

नाही. त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यांना देण्यात यावी. अपिलार्थीच्या, वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी आयोगास सादर केलेल्या त्यांच्या जबाबाद्वारे त्यांना निश्चितपणे काय म्हणावयाचे आहे, याचा अर्थबोध होत नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेली अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलांशी संबंधित मूळ अर्जाच्या संदर्भातील सद्यस्थिती लक्षात घेता, असे आढळून येते की, अपिलार्थीस वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर यांनी दि. २०.०९.२००८ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांनी दि.०१.०५.२००८ व दि. १२.१२.२००८ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे व वनपरिक्षेत्र, किनवट यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या महितीपोटीचे शुल्क विहित मुदतीत कळवूनही अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांच्याकडे सादर केलेल्या दि. २७.०५.२००८ रोजीच्या त्यांच्या जबाबावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त करुन न घेता, त्यांनी दिलेली माहिती बरोबर नाही, असे त्यांनी या जबाबामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती अंदाजे २४,००० इतक्या पृष्ठांची आहे. अपिलार्थीस ही माहिती बरोबर नसल्याचे वाटत आहे. मात्र त्यांच्या या अभिप्रायाच्या समर्थनार्थ कोणतेही समर्पक कारण अथवा उदाहरण त्यांच्या जबाबात त्यांनी दिलेले नाही व त्यांच्या या जबाबाचे समर्थन करण्यासाठी ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे सर्व पाहता या प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली होती. तथापि आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस ही माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांच्याकडून प्राप्त झालेली नाही, हे येथे सप्रमाण सिध्द होत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस माहूर व मांडवी येथील वन परिक्षेत्र अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती दिलेली आहे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट

यांच्याकडील माहिती अपिलार्थीस त्यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे न भरल्यामुळे त्यांना ती प्राप्त होऊ शकली नाही, असे दिसून येते. अपिलार्थीस वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार आहेत, कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्याप्रमाणे अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतूदीनुसार देणे अभिप्रेत आहे, त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना अर्जदाराने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचीही तयारी दर्शविली पाहिजे किंबहुना ते त्यांचे देखील कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याचे त्यांचे उत्तरदायित्त्व पार न पाडल्यामुळे अपिलार्थीचे वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांच्या संदर्भातील आयोगाकडील विचाराधीन अपील क्र.१२४१/०८ फेटाळण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीची वन परिक्षेत्र अधिकारी, माहूर व किनवट यांच्या संदर्भातील द्वितीय अपिले अनुक्रमे अपील क्र.१२३९/०८ व १२४०/०८ च्या संदर्भातील अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाल्यामुळे ही दोनही अपिले खारीज करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या विचाराधीन तीनही अपिलांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.१२३९/०८, १२४०/०८ व १२४१/०८ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँण्ड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास),किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १२४३/०८ , १२४४/०८ व २७५२/०७**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२४३,१२४४/०८ व २७५२/०७
निर्णय दिनांक ०५-०९-२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
रुग्णालय, नांदेड

विद्यमान जन माहिती अधिकारी : अधिव्याख्याता,
जीवरसायनशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय,नांदेड

जन अपिलीय अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेली एकूण दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र.१२४३/०८ व १२४४/०८ व दि. ०३.१२.२००७ रोजी नोंदविलेले एक द्वितीय अपील क्र. २७५२/०७ अशी तीन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचे दि. ०८.०४.२००८ व दि.०७.०६.२००७ रोजी एकूण तीन अर्ज केले असता, मुदतीत माहिती प्राप्त न

झाल्याने त्यांनी दि. १२.०५.२००८ व १६.०७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे एकूण तीन स्वतंत्र प्रथम अपिले केली. तथापि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता एका प्रकरणात (अपील क्र. १२४३/०८ च्या संदर्भात) अर्धवट माहिती घेऊन जाण्याकरिता पत्र दिले. अपील क्र. १२४४/०८ या प्रकरणी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवले व अपील क्र. २७५२/०७ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन तीनही अपिले आयोगाकडे सादर केली आहेत व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देणात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०४.२००८ रोजीच्या दोन अर्जाद्वारे व दि.०७.०६.२००७ रोजीच्या एका अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रामुख्याने जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या खरेदीच्या संदर्भात व त्यांच्या कार्यालयातील टेलीफोन व इंटरकॉम आणि कुलर दुरुस्तीच्या कामासंदर्भात असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे वरील तीनही प्रकरणी अनुक्रमे दि.१३.०५.२००८,१२.०५.२००८ व १६.०७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केली. परंतु या तीनही प्रथम अपील अर्ज प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. तीन पैकी अपील क्र.१२४३/०८ च्या संदर्भात अपिलार्थीस अर्धवट माहिती घेऊन जाण्याचे सूचविले व अपिलार्थीच्या अपील क्र. १२४४/०८ व २७५२/०७ च्या प्रथम अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमानुसार कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०८.२००८ रोजी विचाराधीन तीन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दि. ०५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तीनही प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाने विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यांचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास आवश्यक तो प्रतिसाद विहित मुदतीत दिल्याचे आढळून येत नाही व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस ते सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार असल्याचे आयोगास अवगत केले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने उपरोक्त तीनही प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी येथून पुढे आयोगाकडे सुनावणीसाठी त्यांच्या महाविद्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांना पाठविताना त्या अधिकाऱ्यांना सुनावणीशी संबंधित प्रकरणाची तपशीलवार माहिती आहे किंवा कसे, हे प्रथमतः त्यांच्या स्तरावर तपासून पहावे व तदनंतर अपील प्रकरणाची ज्या कर्मचाऱ्यांना सखोल माहिती आहे, अशाच कर्मचाऱ्यांना आयोगाकडे सुनावणीसाठी पाठविण्याची इतःपर दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.१२४३/०८,१२४४/०८ व २७५२/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त तीनही प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता,जीवरसायनशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १३१५/०८,१३१६/०८,१३१७/०८,१३१८/०८ व १३१९/०८**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ १३१५ते १३१९ /०८
निर्णय दिनांक ०७-०९-२००९

**१** श्रीमती नसरीन बेगम बुऱ्हागुदीन व इतर चार : अपिलार्थी
(सोबतच्या यादीप्रमाणे)
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव,
तलत शिक्षण संस्था सेवकाची सहकारी पत संस्था मर्या.
कबाडीपुरा, औरंगाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०३.२००८ रोजी नोंदविलेली पाच स्वतंत्र व्दितीय अपिले आज दिनांक ०७.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक १८.१२.२००७ रोजीच्या पाच स्वतंत्र अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकाची सहकारी पतसंस्था मर्या. कबाडीपुरा, औरंगाबाद कडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २४.०१.२००८ रोजी चार व २१.०१.२००८ रोजी एक अशी पाच स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी

दि. १३.०२.२००८, १४.०२.२००८ व १५.०२.२००८ रोजी अपिलार्थींची पाचही अपील मान्य करुन अपिलार्थींना १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे पतसंस्थेस सूचित केले. तथापि, यानंतरही अपिलार्थींना संबंधित पतसंस्थेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थींनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली पाच व्दितीय अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीचेवेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. सर्व अपिलार्थींनी ते या पतसंस्थेचे सभासद असल्याचे आयोगास अवगत केले.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नियंत्रण व वित्तिय सहाय्य या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतू अपिलार्थींना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार या सर्व पाच अपिलार्थींनी आयोगाकडे केलेली त्यांची स्वतंत्र व्दितीय अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालील

प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र. १३१५/०८, १३१६/०८, १३१७/०८, १३१८/०८ व १३१९/०८, खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रतः

१. श्रीमती नसरीन बेगम बुऱ्हागुदीन, शम्श नगर, शाहनुरवाडी, औरंगाबाद. (अपील क्र. १३१५/०८)

२. श्रीमती नजमुन्निसा बेगम अब्दुल हमीद खान, पाटणी कॉम्पलेक्स, फ्लॅट नं. बी-५, कबाडीपुरा, रऊफ कॉलनी, औरंगाबाद (अपील क्र. १३१६/०८)

३. श्रीमती नसीम बेगम अब्दुल मुनाक, टाऊन हॉल, लाल मस्जीद, घर नं. १-१४-१२, औरंगाबाद (अपील क्र. १३१७/०८)

४. श्री. सगीर म. शब्बीर सोदागर, प्लॉट नं. ३५, गणेश कॉलनी, सोहेल गार्डन, औरंगाबाद (अपील क्र. १३१८/०८)

५. श्रीमती शहनाज बेगम मो. युसूफ खान, घर नं. ५-२-३७, उस्मानपुरा, औरंगाबाद (अपील क्र १३१९/०८)

६. जन माहिती अधिकारी तथा सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पत संस्था मर्यादित, कबाडीपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १३२०/०८,१३२१/०८,१३२२/०८,१३२३/०८,१३२४/०८ व १३२५/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ १३२० ते १३२५
निर्णय दिनांक ०७-०९-२००९

**१** श्रीमती फौजिया बेगम सय्यद बद्रोद्दिन व इतर पाच : अपिलार्थी
(सोबतच्या यादीप्रमाणे)
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव,
तलत शिक्षण संस्था सेवकाची सहकारी पत संस्था मर्या.
कबाडीपुरा, औरंगाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०३.२००८ रोजी नोंदविलेली सहा स्वतंत्र व्दितीय अपिले आज दिनांक ०७.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक १७.१२.२००७ व १८.१२.२००७ रोजीच्या सहा स्वतंत्र अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकाची सहकारी पतसंस्था मर्या. कबाडीपुरा, औरंगाबाद कडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २४.०१.२००८ रोजी पाच व २१.०१.२००८ रोजी एक अशी सहा स्वतंत्र प्रथम अपिले दाखल

केली. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी दि. १३.०२.२००८, १४.०२.२००८ व १५.०२.२००८ रोजी अपिलार्थींची सहाही अपिले मान्य करुन अपिलार्थींना १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे पतसंस्थेस सूचित केले. तथापि, यानंतरही अपिलार्थींना संबंधित पतसंस्थेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थींनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली व्दितीय अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. सर्व अपिलार्थींनी ते या पतसंस्थेचे सभासद असल्याचे आयोगास अवगत केले.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नियंत्रण व वित्तिय सहाय्य या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतू अपिलार्थींना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार या सर्व सहा अपिलार्थींनी आयोगाकडे केलेली त्यांची स्वतंत्र व्दितीय अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालील

प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र . १३२०/०८, १३२१/०८, १३२२/०८, १३२३/०८, १३२४/०८ व १३२५/०८ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रतः

१. श्रीमती फौजिया बेगम सय्यद बद्रोद्दिन, आरेफ कॉलनी, प.नं.१५६, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद (अपील क्र. १३२०/०८)

२. श्रीमती शेख लईका यासमीन अब्दुल वहीद, मंजुरपुरा, मुर्गीनाला, घर नं.१-१८-२७, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद (अपील क्र. १३२१/०८)

३. श्रीमती ईरफाना बेगम अलियोद्दिन फारुकी, रशीदपुरा,घर नं.२-७१-९१,औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद (अपील क्र. १३२२/०८)

४. श्रीमती खॉन रुखसाना बेगम हैदरयार खॉन, प्लॉट नं.१४, रशीद मामु कॉलनी, गरम पानी, बसस्टँड, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद (अपील क्र. १३२३/०८)

५. श्रीमती सय्यदा रुखसाना जहाँ सय्यद सलीमउद्दिन, आरेफ कॉलनी, प..नं. ८९, फैजान मस्जिद, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद (अपील क्र. १३२४/०८)

६. श्रीमती सय्यदा शबाना सय्यद मुनीर अली, अलकरीम कॉम्पलेक्स, फ्लॅट नं. ३, डायमंड हॉलच्या बाजूला, बुढ्ढीलेन, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद (अपील क्र. १३२५/०८)

७. जन माहिती अधिकारी तथा सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पत संस्था मर्यादित, कबाडीपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १३४३/०८, १४१३/०८ व २७५४/०७**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४३/०८, १४१३/०८ व २७५४/०७
निर्णय दिनांक ०७-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| **१** श्री. धर्मा रामा सलामपुरे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ<br>शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या,<br>ओरंगाबाद.<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना रोड,<br>क्रांती चौक, औरंगाबाद. | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०५.२००८, १७.०७.२००८ व २७.०७.२००७ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज दिनांक ०७.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधिन आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने एकाच पतसंस्थेकडे वेगळया अर्जाद्वारे माहिती मागविली असल्याने व या प्रकरणांशी संबंधित तीन स्वतंत्र अपिले एकाच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली असल्याने या तीनही अपिलांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी अनुक्रमे दिनांक ३०.११.२००७, ०५.०१.२००८ व ०५.०१.२००७ रोजीच्या तीन अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या. औरंगाबाद कडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध

करुन दिली नसल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२.०१.२००८, ०३.०३.२००८ व १५.०३.२००७ रोजी प्रथम अपिले दाखल केली. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी संबंधित पतसंस्थेने अपिलार्थीस १५ व १० दिवसात माहिती द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगास सादर केले आहे.

आजरोजी सुनावणीचेवेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत. अपिलार्थीनी असा युक्तिवाद केला की, संबंधित पतसंस्थेने त्यांना विहित मुदतीनंतर अपूर्ण व सशुल्क माहिती दिली आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नियंत्रण व वित्तिय सहाय्य या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखिल लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखिल शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिती संदर्भात त्यांना असे सुचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार संबंधित पतसंस्थेकडून त्यांना या प्रकरणी आवश्यक असलेली माहिती स्वतंत्रपणे प्राप्त करुन घ्यावी.

सबब या अधिनियमानुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपिल क्र. १४४३/०८, १४१३/०८ व २७५४/०७ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रतः

**१)** श्री.धर्मा रामा सलामपुरे, राज्यशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद.

२) जन माहिती अधिकारी तथा सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या, औरंगाबाद.

३) जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २७५९/०७, २७६०/०७,२७६१/०७,२७६२/०७, २७६३/०७ व २७६४/०७**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७५९ ते २७६४ /०७
निर्णय दिनांक ०७-०९-२००९

**१** श्री. महेंद्र कन्हैयालाल जैन, : अपिलार्थी
रा.जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
महावीर अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि.
जळगांव

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.१२.२००७ रोजी नोंदविलेली वर उल्लेखिलेली सहा स्वतंत्र व्दितीय अपिले आज दिनांक ०७.०९.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधिन आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१०.२००७ व ०६.१०.२००७ रोजीच्या सहा स्वतंत्र अर्जांद्वारे जन माहिती अधिकारी तथा महावीर अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. जळगांव कडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १३.११.२००७ रोजी सहा स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. सदर अपिलांवर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी

संस्था, जळगांव यांनी कोणतेही आदेश पारीत केले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली द्वितीय अपिले आयोगास सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीचे वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.०९.१०.२००७ व ०६.१०.२००७ रोजीच्या सहा स्वतंत्र अर्जांद्वारे महावीर अर्बन को.ऑप.क्रेडीट सोसायटीकडे त्यांच्या कार्याक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नियंत्रण व वित्तिय सहाय्य या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखिल लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखिल शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही.

सबब या अधिनियमानुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेली विचाराधीन सहाही व्दितीय अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपिल क्र. २७५९/०७, २७६०/०७, २७६१/०७, २७६२/०७, २७६३/०७ व २७६४/०७ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रतः

१. श्री. महेंद्र कन्हैयालाल जैन, १७६, पोलनपेठ, जळगांव, ता.जि.जळगांव

२. जन माहिती अधिकारी तथा श्री महावीर अर्बन को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि, जळगांव, जि.जळगांव.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव, जि.जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सीआर/१२६२

निर्णय दिनांक ०८-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हरिभाऊ लिंबाजी बडे<br>ता. धारुर जि. बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>श्री. पंडीत गुरु पार्डीकर<br>महाविद्यालय सिरसाळा<br>ता. परळी जि. बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>शिक्षणाधिकारी (उच्च माध्यमिक),<br>शिक्षण विभाग जि. प. बीड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहीलेला त्यांचा दिनांक २८-०८-२००९ रोजीचा एक अर्ज सादर केला .

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी श्री. साबळे डी. बी. यांच्याकडून दिनांक ०१-०७-२००८ रोजी व्यक्तिशः संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याने या महाविद्यालयांच्या संदर्भात त्यांनी आयोगाकडे दाखल केलेली सर्व अपीले ते परत घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १२६२/२००८, दिनांक २७-०८-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांक: ०८.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरीभाऊ लिंबाजी बडे ता. धारुर जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी श्री. पंडीत गुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा ता. परळी जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (उच्च माध्यमिक), शिक्षण विभाग जि.प. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२५८
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

१. श्री. उत्तमराव किशनराव जाधव, : अपिलार्थी
औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
लेखाधिकारी,
विभागीय कार्यालय, रा.प.म.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : आगार लेखापाल,आगार क्र.१,
महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : गणेश उत्तमराव जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्देश द्यावयाच्या ऐवजी जन माहिती अधिकारी यांनी निर्देश देऊन त्यांना आवश्यक ती माहिती नाकारली आहे. त्यांना दि. २२.०५.२००८ व २३.०६.२००८ रोजी प्राप्त झालेल्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी विसंगत भूमिका घेतली असून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर निर्णय देताना त्यांची बाजू मांडण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना संधी दिलेली नाही. जन माहिती अधिकाऱ्याच्या लापरवाहीमुळे गणेश जाधव या वाहकाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्यामुळे त्याची भरपाई मिळण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. गणेश उत्तमराव जाधव,वाहनचालक क्र.१९६३६, राज्य मोटार आगार १ यांच्या देयकाविषयी दि. १ डिसेंबर, २००४ ते ३१ डिसेंबर, २००६ या कालावधीतील काही माहिती एकूण १२ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने सदर अर्ज लेखाधिकारी, राज्य परिवहन विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना उद्देशून केला होता. लेखाधिकारी यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज दि.२२.०५.२००८ रोजी आगार लेखापाल यांच्याकडे पाठविला. तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर दि. १८.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८(छ) नुसार माहिती देण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाकडे सुनावणीसाठी पुढील तारखेची विनंती केली होती, परंतु आयोगाने सदर विनंती अमान्य केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे व अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली असताना देखील अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदींचा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दि. १८.०६.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये विचार केलेला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागविताना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील कार्यवाहीच्या टप्प्यावर त्रयस्थ पक्षाचे म्हणणे विचारात घेणे गरजेचे आहे. तथापि या प्रकरणी

अशाप्रकारचा संपर्क जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाशी साधला गेला असल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी देण्याच्या दृष्टीने, जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर (अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी विचारात घेऊन ) हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपले अंतिम निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१२.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले ि- नर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उत्तमराव किशनराव जाधव, ६१५, अरुणोदय कॉलनी, सिडको,एन-५, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा आगार लेखापाल,आगार क्र.१,महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ,औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७५८
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी
उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,
भूम,जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, भूम,जि.उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी,
भूम,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०३.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवासतीसच अपिलार्थीने तहसीलदार, भूम यांना उद्देशून लिहिलेले दि.०२.०९.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. १८.०१.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे तहसीलदार, भूम यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आता प्राप्त झाल्यामुळे त्यांचा अर्ज निकाली काढण्यास अपिलार्थीची कोणतीही हरकत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर हजर नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि.०२.०९.२००९ रोजी त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याचा कबूली जबाब आयोगासमोर सादर केला आहे. अशा परिस्थितीत अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २७५८/०७, दि. १०.०३.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,२७/५२५,माणिक चौक, माणिकनगर,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम,जि.उस्मानाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२५७
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. कैलास तुकाराम तंबारे,<br>रा.खुलताबाद, जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>वन परिक्षेत्र कार्यालय, औरंगाबाद वन विभाग,<br>खुलताबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप वनसंरक्षक, वन विभाग,<br>औरंगाबाद | | |
| प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | वनपरिक्षेत्र अधिकारी,<br>खुलताबाद,जि.औरंगाबाद |
| जन अपिलीय अधिकारी | : | सहायक वनसंरक्षक,<br>औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करुन जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती अर्जदारास दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलताबाद तालुक्यातील गट क्रमांक २ येथील जमिनीच्या मालकी हक्काबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"गट क्र.२ खुलताबाद वन विभागाच्या मालकीचा आहे काय, असल्यास सदरील गटावर ताबा कोणाचा असून त्या गटात खाजगी बांधकामे सुरु आहेत. बांधकामे सुरु असल्यास संबंधित दोषी अधिकाऱ्यावर नियमानुसार कारवाई झाली का?"

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशःअपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि.१०.०६.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित करुन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झ ाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असूनही ते त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयातील शिपाई दि. १७.०६.२००८ रोजी आवश्यक ती माहिती घेऊन अपिलार्थीच्या निवासस्थानी गेला असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. अपिलार्थीने माहिती स्वीकृत करण्याचे का नाकारले, याच्या कारणांचा त्यांनी अनौपचारिरित्या शोध घेतला असता, त्यांना असे सांगण्यात आले की, अपिलार्थीस ग.नं. २ मधील कथित अतिक्रमणधारकावर वन विभागाकडून कारवाई करुन हवी आहे आणि ही कारवाई पूर्ण झाल्यानंतरच अपिलार्थी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती स्वीकृत करतील. त्यांनी

आयोगास पुढे असेही अवगत केले की, खुलताबाद येथील गट क्र. २ च्या वन हद्दी अद्यापपावेतो निश्‍चित झालेल्या नाहीत आणि अपिलार्थीने या प्रकरणी ज्या कथित खाजगी बांधकामाच्या संदर्भात माहिती विचारली आहे, त्या बांधकामाची त्यांच्या कार्यालयातर्फे सध्या चौकशी चालू आहे व ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १७.०६.२००८ रोजीच्या पत्रान्वये देऊ केली होती. परंतु अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासेवजा माहिती अपेक्षिली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशाप्रकारच्या माहितीची मागणी अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे करणे हे त्यांना अनुज्ञेय नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, माहितीसाठीचा मूळ अर्ज दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी, कधीही व्यक्तिशः उपस्थित राहिले नाहीत, याची या प्रकरणी नोंद घेणे आयोगास अगत्याचे वाटते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०६.२००८ रोजी पुरविलेली माहिती स्वीकारण्यास देखील अपिलार्थीने नकार दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता, जरी अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नव्हती तरीही वस्तुस्थितीवर आधारीत असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस देऊ केली आहे. जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर झालेल्या सुनावणीच्या वेळी दोन वेळा अपिलार्थीस संधी देऊनही अपिलार्थी सुनावणीस गैरहजर राहिले. आज रोजीच्या द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीस देखील अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस कधीही माहिती देण्याचे नाकारले किंवा टाळाटाळ केली असल्याचे दिसून येत नाही. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य नसावे, असे अनुमान आयोग काढत आहे. अपिलार्थीस जर अद्यापही त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः (यासाठी अपिलार्थीचा कोणताही प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे अपिलार्थीस अनुज्ञेय असणार नाही.) हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देय होत नसल्याने त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कैलास तुकाराम तंबारे, मोठी कुणबी आळी, मु.पो. ता.खुलताबाद,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२५९
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शाम रामचंद्र बोरावके,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, जालना. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, जालना. | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : न.प.अभियंता (सा.बां.वि.),
नगर परिषद,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रलंबित देयकाबाबत दि.२१.११.२००५ ते दि.०७.०७.२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये, 'माहितीचा विषय'या सदरासमोर - "आर्कीटेक्चर फीस प्रलंबित पेमेंटबाबत", तर 'आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन' या सदरासमोर - "वरील पत्रांचे उत्तर का दिले नाही? पेमेंट अद्याप का

केले नाही?"- अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याचे व त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याचे मान्य केले व आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीची जालना नगर परिषदेमार्फत मूळात नियुक्ती केली नसल्याने त्यांची देयके जालना नगर परिषदेने अदा केली नाहीत. अपिलार्थीशी त्यांनी फक्त दि.०८.०८.२००० रोजी करारनामा केला होता. परंतु या करारनाम्यानंतर जालना नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा दि. २८.०२.२००१ ठराव क्र.(३) अन्वये अपिलार्थीकडे नेमून दिलेले काम दत्तासुत असोसिएटस् यांना देण्यात आले.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि.१८.०९.२००७

रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींशी सुसंगत नाही. या अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतची व निर्णयाबाबतची कारणे विचारलेली आहेत. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये आवश्यक ते स्पष्टीकरण आयोगास दिले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास, जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या स्वरुपात त्यांच्याकडे माहिती आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीबद्दलची कारणे अथवा त्यांच्या एखाद्या निर्णयाबद्दलचा खुलासा किंवा स्पष्टीकरण त्यांना अर्जदारास माहिती अधिकार कायद्यानुसार देणे हे मूळातच या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचा अपील अर्ज फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. या प्रकरणी आयोगास असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची व त्यावरील प्रथम अपील अर्जाची संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अक्षम्य उपेक्षा करुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवले आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मूळातच देय नसल्याने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस, त्यांचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांचे आत प्रथम प्रतिसाद देणे, जन माहिती अधिकारी यांना आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारचा प्रतिसाद अपिलार्थीस दिला नाही. परिणामी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे स्वतंत्र प्रथम व द्वितीय अपील सादर करावे लागले. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. प्रशांत खाडकीकर सध्या नगर परिषद, देवळाली -प्रवरा,जि.अहमदनगर येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देण्याच्या त्यांच्या या प्रकरणातील कृतीद्वारे

त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब संचालक, नगर पालिका प्रशासन यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. प्रशांत खाडकीकर सध्या नगर परिषद, देवळाली-प्रवरा,जि.अहमदनगर येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. संचालक, नगर पालिका प्रशासन,यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. प्रशांत खाडकीकर सध्या नगर परिषद, देवळाली - प्रवरा,जि.अहमदनगर येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात आहे

**औरंगाबाद**
**दिनांक : ०८-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शाम रामचंद्र बोरावके,५-६-१, न्यु उस्मानपूरा, धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, पो.बॉ.क्र.५६१,औरंगाबाद-४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा नगरपरिषद अभियंता (सा.बां.वि.),नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगरपालिका संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६०

निर्णय दिनांक ०८-०९-२००९

१. श्री. धर्मराज अप्पाराव पट्टे, बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड : प्रतिवादी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०८.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी केलेल्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नगरपरिषद बीड व सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांच्याकडून मागणी केलेली माहिती त्यांना पाठविली, ही माहिती चुकीची आहे. त्यांनी 'तलाठी भवन' या महसूल प्रशासनाच्या ताब्यात असलेल्या बांधकामाविषयी माहिती मागितली होती व या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले होते. परंतु जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी अद्यापपर्यंत घेतली नाही. त्यामुळे या प्रकरणी संबंधित माहिती अधिकारी दोषी आहेत, त्यांना विलंबाच्या दिनांक ०९.०४.२००८ पासून पुढे शास्ती लावावी आणि त्यांचेवर

शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे ती करण्यात यावी व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १०.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे बीड तहसील कार्यालयातील तलाठी निवासस्थाने व कार्यालय, वाचनालय रोड, नवी भाजी मंडई बीड या बांधकामासंदर्भात एकूण ५ मुद्याद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सदरच्या जागेचा पी.टी.आर., जागेचे बांधकाम किती आहे त्याबाबतचा खुलासा, सदर बांधकामाच्या मागे पत्राचे जे मोठे शेड आहे ते कोणाचे व कोणास भाडयाने दिले असल्यास सदर भाडयाचा खुलासा, शासकीय जागा भाडयाने देण्याची जी पध्दत आहे त्या जागेबाबत काय केले त्याचा खुलासा व बांधकाम विभागाने सदर क्वॉर्टर बांधून आपल्या कार्यालयास ताबा कधी दिला - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०३.०५.२००८ रोजी तहसीलदार यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील काही माहिती नगरपरिषदेशी व काही माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्याशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस दिनांक ०९.०७.२००८ रोजी पुरविली आहे. तथापि या माहितीने अपिलार्थी समाधानी नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १०.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात प्रत्यक्षात उपलब्ध नव्हती. अशा प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रती नगरपरिषद, बीड व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्याकडे, अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती पाहता, अपिलार्थीस अद्यापपावेतो त्यांनी मूळ अर्जातील बांधकामाच्या मागे पत्र्याचे शेड कोणाचे व ती जागा भाडयाने देण्यासंदर्भातील माहिती व जन माहिती अधिकारी यांनी या बांधकामाचा ताबा कधी घेतला ही माहिती अद्यापपावेतो अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे दिसून येते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा मागितला आहे. अशा प्रकारचा खुलासा अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एन.डी.मोरे तत्कालीन नायब तहसीलदार, बीड हे आता सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धर्मराज अप्पाराव पट्टे, सहयोग नगर, डी.पी.रोड, जिजामाता चौक, बीड ता. जि. बीड-४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सीआर/१२६१
निर्णय दिनांकः ०८-०९-२००९

१. श्री. कल्याण राजाभाऊ कुलकर्णी, : अपिलार्थी
मु. लोणगांव, पो. आनंदगाव,
ता.माजलगाव,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव,
जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती न देता अपूर्ण व खोटी माहिती पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१६.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील वंजारवाडी तांडा या रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - काम सुरु झाल्यापासून दिनांक १६.०१.२००८ पर्यंत कामावरील अकुशल व कुशल भाग, झालेला खर्च, कामावरील मजूराच्या हजेरी पत्रकाच्या प्रती, कुशल काम केलेल्या

संस्थेचे नाव, कुशल कामाच्या मोजमापपुस्तिकेच्या प्रती, रस्त्याचे एकूण काम, लोकेशन प्लॅन आणि संबंधित शेतकऱ्यांच्या दानपत्राच्या फोटोप्रती, किंवा जमीन अधिग्रहीत केल्या असल्यास त्याच्या फोटो प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिनांक १७.०५.२००८ रोजी पारित केला. या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. या सुनावणीच्या दिवशीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील विनंतीप्रमाणे काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२.०५.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे माहिती पुरविली आहे व त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, ही माहिती अपीलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी त्यांना देण्यात आली त्यावेळी अपिलार्थीने प्राप्त माहितीवर समाधान व्यक्त केले व याबाबतची नोंद जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये नमूद केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी

सुसंगत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२.०५.२००८ रोजी अपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्रमांक २ शी संबंधित -'अकुशल कामाची हजेरीपत्रके' ही माहिती अपिलार्थीस देताना जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, "माहिती क्लिष्ट स्वरुपाची व विस्तीर्ण स्वरुपाची असल्याने देता येत नाही". यावर असे स्पष्ट करण्यात येते की, हजेरीपत्रकाच्या प्रती ही क्लिष्ट स्वरुपाची माहिती असू शकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी फक्त त्यांच्याकडील हजेरीपत्रकाच्या प्रती काढून घेऊन त्या अपिलार्थीस विहित मुदतीत सशुल्क पुरविणे, एवढेच त्यांचे काम होते. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद तर दिला नाहीच परंतु विहित मुदतीत अशाप्रकारची साध्या व सरळ स्वरुपाची माहिती, “क्लिष्ट स्वरुपाची माहिती” या कारणास्तव ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींना निश्चितपणे पोषक स्वरुपाची नाही. अपिलार्थीने या माहितीद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना सहज देण्यासारखी आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ द्वारे अपिलार्थीने झालेल्या कामाच्या जमिनीच्या दानपत्रकाची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२.०५.२००८ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस, "या दानपत्राच्या प्रती मूळ अंदाजपत्रकासोबत जिल्हाधिकारी बीड यांना सादर केल्याचे" कळविले आहे व या कारणास्तव अपिलार्थीस ही माहिती देण्याचे टाळले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, मूळात वंजारवाडी - तांडा रस्त्याचे काम करताना सदर रस्ता ज्या शेतमालकाच्या जमिनीतून जातो, त्यापैकी कोणत्याही शेतमालकाची संमती त्यांनी घेतली नव्हती अथवा ही जमीन संपादित/अधिग्रहणही केली नव्हती त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती त्यांना आता अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येणार नाही. जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस दिनांक १२..०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे या मुद्यावरील पुरविलेली माहिती व वस्तुस्थिती यामध्ये अशाप्रकारे आयोगास पूर्णपणे विसंगती आढळून आली आहे. प्रथमतः अपिलार्थीस दानपत्राच्या प्रती जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे सादर केल्या असल्याचे नमूद केले. तथापि मूळात जन माहिती अधिकारी यांनी विचाराधीन काम करताना जमीन संपादित/अधिग्रहनही केली नव्हती किंवा कोणत्याही जमिनीचे मालकाकडून दानपत्र प्राप्त करुन घेतले नव्हते. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वस्तुस्थितीची कल्पना देणे आवश्यक होते. तथापि या मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे खोटी माहिती पुरविली आहे. या वस्तुस्थितीची कल्पना आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती तपासून पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व खोटी माहिती दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन व विलंबाने अपूर्ण व खोटी माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (श्री. साळवे), यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील स्पष्ट केलेल्या कर्तव्यपरायणतेच्या व नितांत सचोटीच्या अभावाबद्दल सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबंधित उपविभागीय अभियंता श्री. साळवे यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ६ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः ०८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कल्याण राजाभाऊ कुलकर्णी, मु. लोणगांव, पो. आनंदगांव, ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६३
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

१. श्री. रमेश दत्तात्रय राऊत, : अपिलार्थी
बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
विभागीय जात पडताळणी समिती,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी,
विभागीय जात पडताळणी समिती,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. शेख शाकेर शे. फकिर महंमद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना न देता, नस्ती शोधणे शक्य नाही या कारणास्तव माहिती देण्याचे टाळले, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळून लावल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत माहे डिसेंबर, २००६ या महिन्यामध्ये किंवा या पूर्वीच्या महिन्यामध्ये श्री. शेख शाकेर शेख फकिर महंमद रा. जुनी भाजीमंडी, बीड यांना त्यांचे ओ.बी.सी. या जातीच्या प्रमाणपत्र खरे असल्याचे व्हॅलिडीटी प्रमाणपत्र दिले आहे यासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाच्या जातीची पडताळणी करुन त्यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत, हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्रयस्थ पक्ष श्री. शेख शाकेर शेख फकिर महंमद यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दिलेल्या पुराव्यासंदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे दरवर्षी १० ते १५ हजार अर्ज प्राप्त होत असल्यामुळे नुसत्या नावावरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या नस्तीचा शोध घेणे त्यांना शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले व त्रयस्थ पक्ष श्री. शेख शाकेर शेख फकिर रा.जुनी भाजीमंडी,बीड यांच्यासंदर्भातील अतिरिक्त माहिती अपिलार्थीकडे मागितली व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्रूटींची पूर्तता केल्यानंतर, माहिती देण्याचे आश्वासित केले. तथापि या त्रूटींची पूर्तता अपिलार्थीने न केल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. १८.०६.२००८,२५.०६.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. सदर दोनही सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी दि.३१.०७.२००८ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीकडून त्रूटींची पूर्तता झाल्यानंतर अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या निर्णयाने समाधान न

झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी आयोगासमोर जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे जात प्रमाणपत्र पडताळणीकरिता येणाऱ्या प्रचंड संख्येची कल्पना आयोगास दिली व आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे नोव्हे.-डिसे.२००६ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या प्रकरणांचा कसोशीने शोध घेतला असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणाची नस्ती त्यांच्या कार्यालयात आढळून आली नाही.

वरील घटनाक्रम,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अत्यंत मोघम स्वरुपात माहिती मागितली आहे. अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागविली आहे, तो पक्ष मूळात अस्तित्वात आहे किंवा कसे अथवा या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील इतर कोणताही संदर्भ, जो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून अपेक्षिला होता तो, देखील अपिलार्थीने जन माहिती अधिकाऱ्यास पुरविला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीशी संबंधित आहे. ही माहिती उघड केल्याने अपिलार्थी कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहे, याचा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये खुलासा केलेला नाही. अपिलार्थीस त्यांच्या माहितीशी संबंधित इतर संदर्भ देण्याकरिता त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दोनवेळा सुनावणी ठेवून आवश्यक ती संधी देखील दिली होती, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेली संधी अपिलार्थीने अवहेरली व आता देखील आयोगाकडील सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील त्यांना आवश्यक

असलेल्या माहितीचा इतर कोणताही संदर्भ अथवा आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०८-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश दत्तात्रय राऊत, राऊत सदन, जुनी भाजी मंडई, बीड-४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६४
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

१. श्री. दशरथ आच्युतराव होळे, : अपिलार्थी
रा. अष्टामोड, पो. गांजूर, ता.चाकूर,जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,अहमदपूर, जि. लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, अहमदपूर,जि.लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूरी माहिती दिली, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील अनिर्णित ठेवले. त्यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दप्तर दिरंगाई व गैरवर्तणूक केल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व अपिलार्थीचे झालेले नुकसान रु. ५०००/- इतके त्यांना देण्यात यावे व अपिलार्थीस उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन देण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - मौ. जठाळा येथील सर्वे नं. ७२ आ३, ७२ ई७ मधील फेरक्रमांक १३८ ची नक्कल व पोटहिस्सा मोजणी फेरफार रजिस्टरची सत्यप्रत, या दोन्ही गटाच्या इ.स.१९६३ ते १९७१ या कालावधीतील पिकपेऱ्याच्या ७/१२ च्या प्रती - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेले रजिस्टर व ७/१२ च्या प्रती मौ. जढाळा येथील तलाठी श्री. एच.व्ही. बोधनकर हे त्यांच्या कार्यालयातून घेऊन गेले असल्याने अपिलार्थीने संबंधित तलाठयाकडून ही माहिती घ्यावी, असे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर यांच्याकडे दि. ३१.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी  उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी तहसीलदार, चाकूर यांच्याकडील त्यांचे दि. २५.०८.२००९ रोजीचे प्राप्त झालेले पत्र आयोगास दाखविले. या पत्रासोबतच्या निवेदनामध्ये अपिलार्थीने त्यांचा असा कबूली जबाब दिला आहे की, त्यांना दि. २६.०६.२००९ रोजी सकाळी ११ वा. तहसीलदार यांनी बोलाविले असता, त्यांची व तहसीलदार यांची संबंधित विषयावर चर्चा झाली. या चर्चेमुळे त्यांच्या गैरसमजुती मिटल्या असून आता त्यांची या प्रकरणात कोणत्याही प्रकारची तक्रार नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीस आवश्यक ती माहिती, राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०७.२००८ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर तहसीलदार, चाकूर यांचेकडून दि. २६.०६.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे, त्यांच्या कबूली जबाबावरुन दिसून येते. यावरुन अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १२६४/०८, दि.३१.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०८-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दशरथ अच्युतराव होळे, रा.अष्टामोड,पो.गांजूर,ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६५
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी
रा.नांदगाव,पो.गांजूर, ता.चाकूर,जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती, चाकूर,
जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, चाकूर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, त्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- किंवा शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील विविध विषयावरील काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या, त्यांची नावे, जानेवारी,२००५ पासून अपिलार्थीने अर्ज करेपर्यंत कार्यरत ग्रामसेवकांची नावे, सन २००४-०५, २००५-०६ व २००६-०७

या कालावधीमध्ये ग्रामपंचायत स्तरावर झालेल्या लेखा परीक्षणाचा दिनांक व लेखा परीक्षण न झालेल्या ग्रामपंचायतींची नावे, दि.०१ जानेवारी २००७ ते दि.३१ डिसेंबर,२००७ या कालावधीमध्ये गट विकास अधिकारी वापरत असलेल्या वाहनाबाबत सर्व सविस्तर माहिती, वाहनाच्या लॉगबुकच्या प्रती, या कालावधीमध्ये ग्रामपंचायत स्तरावरील जन्म आणि मृत्यूच्या नोंदीबाबत गट विकास अधिकारी यांना सादर केलेल्या अहवालाच्या प्रती, दि.१ ऑक्टोबर, २००७ ते दि.३० ऑक्टोबर,२००७ या कालावधीतील गट विकास अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाच्या नोंदी ज्या नोंदवहीवर घेतलेल्या आहेत त्या नोंदवहीच्या/दैनंदिनीच्या प्रती- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या दि.२०.०२.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती दिली. या माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि.०५.०६.२००८ रोजी निर्णय देऊन या निर्णयामध्ये अपिलार्थीस मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दि. १५.०३.२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य दिल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती

पुरविल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावरुन दिसून येत आहे. सबब या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांना करण्यात येत आहे. मात्र अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे , त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे, हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये सिध्द केलेले नाही. तसेच हे सिध्द करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या दि. ०५.०६.२००८ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती दिली आहे किंवा कसे याची विचारणा आयोगाने आज सुनावणीच्या वेळी केली असता, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी (श्री. आर.व्ही. पट्टेवाड, विस्तार अधिकारी (पं.)) यांना या प्रकरणी आयोगासमोर कोणताही खुलासा करता आला नाही. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व तसेच इतःपर आयोगाकडे सुनावणीसाठी जिल्हा परिषदेकडील अधिकारी/कर्मचारी यांना पाठविताना किमान संबंधितांना त्या प्रकरणाची संपूर्ण माहिती आहे, याची त्यांनी स्वतः खात्री करुन घ्यावी व येथून पुढे आज रोजी आयोगाकडे पाठविलेल्या, प्रकरणाशी पूर्ण अनिभिज्ञ असणाऱ्या या अधिकाऱ्यासारख्या इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांना आयोगाकडे सुनावणीस पाठविले जाणार नाही, याची देखील दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.५ च्या संदर्भातील माहिती, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०८-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव,रा.नांदगाव,पो.गांजूर, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६६
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

१. सौ. शालीनीबाई बापूराव रणदिवे, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : राजेंद्र फुलचंद बनसोडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांचा निर्णय विहित वेळेत प्राप्त झाला नाही व अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. राजेंद्र फुलचंद बनसोडे यांनी उस्मानाबाद गावठाण क्र. ९/५०, ९/५१ वर घराचे बांधकाम परवानगी संदर्भात फाईल नं. १९७/०६ मधील कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. राजेंद्र फुलचंद बनसोडे यांचा अर्ज दि. ०५.१२.२००६ ची प्रत, अर्जासोबतचा बांधकाम नकाशा, जाहीर प्रगटन दि. ०८.१२.२००६ ची प्रत,

सौ.शालीनी रणदिवे यांच्या दि. ०४.०१.२००७ च्या आक्षेप अर्जाची प्रत व श्री. राजेंद्र बनसोडे यांना कोर्टातील दावा क्र.२१५/०६ मधील अंतिम निर्णय झाल्याशिवाय बांधकाम परवानगी देता येत नाही, असे कळविल्याच्या पत्राची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ३१.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सध्याचे जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहिती मागतेवेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री. रवी पवार (सध्या पुणे महानगरपालिका येथे उपआयुक्त या पदावर कार्यरत) नावाचे अधिकारी मुख्याधिकारी या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे आता त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस त्यांना माहिती पुरविता येणे शक्य नाही.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तर सोडाच परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१२.२००७ रोजी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही व आज उस्मानाबाद नगर परिषदेचे संबंधित जन माहिती अधिकारी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्याचे आयोगासमोर सांगत आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेले त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकामासंदर्भातील कागदपत्रे महत्त्वाची आहेत. तथापि सदर अभिलेखे उस्मानाबाद नगर परिषद कार्यालयाकडून आता गहाळ झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. याचा परिणाम, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असूनही ती त्यांना प्राप्त होऊ शकत नाही, यामध्ये झाला आहे. सबब मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी प्रथम अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घ्यावा व ही माहिती जर सापडली नाही तर, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर आहे, त्यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत या प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करावा व या कालावधीत जर ही माहिती सापडली तर ती अपिलार्थीस याच कालावधीत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दि. ११.१०.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील

कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. सबब संचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. रवी पवार सध्या पुणे महानगरपालिका येथे उपआयुक्त या पदावर कार्यरत) व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्यासाठी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत करुन संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय,मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: ०८-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. शालीनीबाई बापूराव रणदिवे,९/४९, नालंदा निवास,भिमनगर,उस्मानाबाद-४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगर परिषद, संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस, वरळी, मुंबई- ४०० ०३०.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६७
निर्णय दिनांक ०८-०९-२००९

१. श्री. जगन्नाथ प्रभाकर सरवदे, : अपिलार्थी
रा.अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय वन अधिकारी, बीड,
जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय वन अधिकारी, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्य लेखापाल,
उपवनविभाग,बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील मातीनालाबांध, सीसीटी, वनीकरण व योजनांतर्गत इतर कामाच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आर्थिक वर्ष २००७-२००८ च्या कालावधीत बीड, आष्टी,पाटोदा,धारुर आणि परळी मध्ये मातीनाला बांध, सी.सी.टी., वनीकरण व इतर कामे ज्या गावात झाली, त्या गावांची नावे, कामावर झालेला खर्च, वरील पाच रेंजमधील मागील वर्षाच्या रोख लेखा अभिलेखाची छायांकित प्रत, व्हावचर आणि प्रमाणके यांच्या छायांकित प्रती, वरील पाच रेंजमधील कार्यालयांतर्गत माती नाला बांध, सी.सी.टी.वनीकरण कामावरील हजेरीपत्रक व नमुना नं.३२ ची छायाप्रत, दि.३१ मार्च २००८ च्या बंद होणाऱ्या रोख लेखाच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय पारित न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना सहज देता आली असती. परंतु त्यांच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी गांभीर्याने विचार केला नाही, त्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणी मानसिक व आर्थिक ताण पडला आहे व त्यांच्या वेळेचाही अपव्यय झाला आहे. त्यामुळे सर्व संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी त्यांनी त्यांच्या लेखी युक्तिवादाद्वारे आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत, असे आयोगासमोर सांगितले. तसेच त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, बीड वन उपविभागामध्ये माहिती अधिकारी म्हणून सहायक वनसंरक्षक यांची नेमणूक करण्यात आली होती. परंतु शासन पत्र क्रमांक एमएफएस-१००७/१६०६/प्रक्र.-२०/फ-८, दिनांक ०६.०७.२००७ अन्वये सहायक वनसंरक्षकाचे पद परभणी विभागामध्ये कायमस्वरुपी स्थानांतरित करण्यात आले. त्यामुळे माहिती अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार वनपरिक्षेत्र अधिकारी, बीड यांना देण्यात आला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोठया प्रमाणात असून त्यांच्या कार्यालयात अपुरा कर्मचारी असल्यामुळे अपिलार्थीच्या अर्जावर विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ प्रमाणे प्रतिसाद देणे सहज शक्य होते. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची त्यांनी उपेक्षा करुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जा तसाच अनुत्तरीत ठेवला. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य वनसंरक्षक, वनवृत्त, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०८-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगन्नाथ प्रभाकर सरवदे, रा.रमाई चौक,अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल,उपवनविभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य वनसंरक्षक, वनवृत्त, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५२

निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१ श्री. चंगेडे शशीकांत पेमराज, अपिलार्थी

रा. ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी

तथा उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नगर रचनाकार, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतांना त्यांनी दिलेला लेखी युक्तिवाद जन अपिलीय अधिकारी यांनी दुर्लक्षित करुन दोषी माहिती अधिका-याला संरक्षण दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन १९८० ते अपिलार्थीने अर्ज करण्यापर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीमध्ये - अहमदनगर शहरातील खिस्ती गल्ली पिराची या ठिकाणच्या जागेकरिता किती एफएसआय ला मंजूरी दिली जाते व ज्या अधिनियमाच्या आधारे मंजुरी दिली जाते त्या अधिनियमाची सत्यप्रत सदर गल्लीमध्ये नगरपालिका असतांना गेल्या वीस वर्षात मंजूरी देण्यात आलेल्या बांधकामाकरिता किती एफएसआय ची मंजूरी देण्यात आली, शहरातील सिटी सर्व्हे नंबर ५२४२/अ येथील बांधकामासाठी किती एफएसआय ची परवानगी दिली व ५२४२/अ जागेवरील साईट प्लॅनची प्रमाणित सत्यप्रत, महानगरपालिका निवडणूक २००८ मध्ये जी ४ वाहने वापरण्यात आली त्या वाहनांच्या लॉगबुकची सत्यप्रत व निवडणूक कालावधीमध्ये या वाहनावर इंधनापोटी झालेला खर्च - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील चार मुद्दयांपैकी तीन मुद्दयांशी संबंधित माहिती विनामूल्य पुरविली व अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही तसेच अपिलार्थीस आवश्यक असलेल्या साईट प्लॅनच्या प्रमाणित नकलेबाबत अपिलार्थीस साईट प्लॅनच्या नकलेकरिता रुपये २५० इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०३-०२-२००९ रोजी त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील साईट प्लॅन प्रती करिता रुपये २५० इतक्या रक्कमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करुन साईट प्लॅनची प्रत यांच्याकडून हस्तगत करुन घेतली. तथापि यापूर्वीच, प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत. अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०१-२००९ रोजी व मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात ती माहिती दि. १२-०१-२००९ रोजी पुरविली असल्याचेही आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक १२-०१-२००९ रोजी मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भातील उर्वरित माहिती व तदनंतर दिनांक २८-०१-२००९ रोजी पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ती अर्जबरहुकूम असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एकव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना महानगरपालिका कोणत्या नियम व ठरावाव्दारे एफएसआयला मंजूरी दिली जाते ही माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, सध्या लागू असलेल्या अ वर्ग नगरपरिषद बांधकाम नियमावलीनुसार एफएसआयला मंजूरी दिली जाते. आज रोजी युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अ वर्गीय महानगरपालिकासाठी प्रचलीत असलेल्या बांधकाम परवानगीची प्रत आयोगास दाखविली. या अधिनियमातील विकास नियंत्रण नियम क्रमांक १५ पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे. तथापि अपिलार्थीस या कलमाची पूर्णपणे माहिती प्राप्त होण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमातील पृष्ठ क्रमांक २२ व २३ च्या छायांकीत प्रती अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे मागितलेली माहिती त्यांना प्राप्त होऊ शकते, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस 'ही माहिती उपलब्ध नाही', असे कळविले. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती का देता येणार नाही याची कारणे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (८) नुसार अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि माहिती

नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कारणे त्यांच्या दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या पत्रात उद्धृत केली नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीनशी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील मोटार व्हेईकल विभागामार्फत दिनांक १२-०१-२००९ रोजी माहिती पुरविल्याचे दिसून येते. या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वाहनाच्या लॉगबुकच्या प्रती दिलेल्या नाहीत. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे इंधन खर्चाची माहिती मागविली असता अपिलार्थीस या वाहनाच्या इंधनाचे परिमाण दिले आहे. खर्चाचा कोणताही तपशील त्यामध्ये समाविष्ट नाही. या वाहनावरील खर्च जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे केला गेला असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस प्रत्यक्षात देण्यात आलेली माहिती याच्यातील तफावत व वरील परिच्छेदामध्ये केलेले विवेचन लक्षात घेऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतूने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडविल्याचे अथवा अपिलार्थीस माहिती देण्याचे दुष्ट हेतूने टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०९-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंगेडे शशीकांत पेमराज, रा. ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२४८

निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१ श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार, अपिलार्थी

कृष्णा गारमेंटस, मेन रोड, किनवट, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे किनवट येथील सर्व्हे नंबर २५३ मथुरानगर येथील प्लॉटच्या एन. ए. टॅक्सच्या

संदर्भात दिनांक १०-१०-२००२ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांनी विक्री केलेल्या प्लॉटधारकाकडून एन ए टॅक्स वसूल करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सुध्दा जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीकडे एन ए टॅक्सची मागणी करीत आहेत. अशा अर्थाच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कारवाई केली - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात संबंधितांना कोणती कार्यवाही करावयाची याचे आदेश दिले. परंतु अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश दिले नाहीत व परिणामी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही, म्हणून व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२००८ रोजी माहिती दिली, असे आयोगास अवगत केले. अपिलार्थीस त्यांनी कोणती माहिती दिली हे आयोगाने विचारले असता त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०२-०७-२००८ रोजीच्या निर्णयाची प्रत आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जरी सकृतदर्शनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असली तरीही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाचा दिनांक किंवा इतर कोणताही संदर्भ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये दिलेला नाही व त्यांना त्यांच्या ज्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांचेकडून कार्यवाही अपेक्षित होती त्या अर्जाची प्रत देखील त्यांनी त्यांच्या माहिती-साठीच्या मूळ अर्जासोबत जोडली नाही. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले होते. या निर्णयामध्ये अपिलार्थीस जी माहिती आवश्यक होती ती पुरविण्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश दिले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील विनंतीवर जरी सर्व संबंधितांनी कार्यवाही केली असली तरीही अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना अपेक्षित असलेले माहिती मात्र त्यांना अद्यापही अप्राप्त आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे केलेल्या विनंतीनुसार आता त्यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीने ज्या व्यक्तीस प्लॉट विकले आहेत त्या व्यक्तीकडून एन ए टॅक्स वसूल केला जातो. अपिलार्थीच्या विनंतीची दखल घेऊन त्यांच्या कार्यालयाने आवश्यक ती कार्यवाही केली आहे. अपिलार्थीच्या अर्जावर त्यांनी संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयाला आदेश पारीत केले असून अपिलार्थीच्या विनंतीवर आता अंतीम कार्यवाही करण्यात आली आहे. यावरुन असे दिसून येते की, जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ विनंती अर्जावर कार्यवाही केली असली तरीही अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित अर्जामध्ये त्यांनी केलेल्या विनंती अर्जाचा शोध घ्यावा व त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज प्राप्तीनंतर वेगवेगळ्या प्राधिकरणाशी दि. ०१-०३-२००८ पर्यंत केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या व आदेशाच्या प्रती त्यांनी

अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात जेणेंकरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकेल.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देणारे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डुकरे हे आता नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून ती वरील कालावधीत हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार, कृष्णा गारमेंटस, मेन रोड, किनवट, तालुका

किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२५३

निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१ श्री. महेमुद म. उमर हाजी, अपिलार्थी

रा. तलाठी ऑफिस जवळ, आग्रारोड, देवपूर, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा व्यवस्थापक, धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप निबंधक,

सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे, जिल्हा धुळे

त्रयस्थ पक्ष : १. श्रीमती खातुनबी म. उमर

२. श्रीमती रुखसाना म. उमर

३. श्री. मुर्तजा महंमद उमर

४. श्री. अकबर महमद उमर

५. श्रीमती मुनवर बी महमद उमर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. धुळे यांच्याकडे त्यांनी मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेऊन धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. धुळे बँकेच्या संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करण्याची व अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. धुळे बँकेकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती खातुनबी म. उमर, श्रीमती रुखसाना म. उमर, श्री. मुर्तजा महंमद उमर, श्री. अकबर महमद उमर व श्रीमती मुनवर बी महमद उमर यांच्या संदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ त्यांच्या बँकेला लागू होत नसल्याचे कारण दर्शवून माहिती देण्याचे नाकारले. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था धुळे यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांनी दिनांक १३-०८-२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. धुळे यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याची सूचना केली. यानंतरही अपिलार्थीस बँकेकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, त्यांच्या वकिलांसह व त्रयस्थ पक्ष श्रीमती खातुनबी उमर यांचे प्रतिनिधी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व इतर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी हे अपूर्ण माहिती देऊ करत होते त्यामुळे त्यांनी बँकेकडून माहिती स्वीकारली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने दिनांक ११-०३-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे बँकेकडे केला त्यावेळी अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती घेऊन जाण्यासाठी बँकेकडून सूचित करण्यात आले होते.

तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने त्यांच्या बँकेशी व्यक्तिशः कधीही संपर्क साधला नाही व ही वस्तुस्थिती त्यांनी जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांना दिनांक १९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविली होती. अपिलार्थीस इतर वेगवेगळ्या संदर्भात त्यांनी वेळोवेळी माहिती पुरविली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, बँकेकडून अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा जास्तीत जास्त आठ वर्षे इतकाच असतो. आठ वर्षाच्या पलिकडील संबंधित कागदपत्रे जतन करुन ठेवण्याचे बँकेवर कोणतेही बंधन नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे ती संस्था म्हणजे धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक ही होय. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर या निर्णयामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकेला लागू होत नाही असे स्पष्ट केले आहे. हे आदेश दिनांक १३-०१-२००९ रोजी दिले आहेत. हे पाहता या प्रकरणी देखील धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. धुळे यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेमुद म. उमर हाजी, रा. तलाठी ऑफिस जवळ, आग्रारोड, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, तथा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७४

निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१ श्री. माधव भिवाजी बनसोडे, अपिलार्थी

मु. पो. गौतमनगर, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,

जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती मिळावी म्हणून दंडात्मक कार्यवाहीसाठी त्यांनी सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे तहसीलदार, मुखेड यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०७-०५-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास

सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आजच्या विचाराधीन अपील प्रकरणाची संबंधित सर्व माहिती मिळाल्याचे व यासंदर्भात त्यांचे कोणतेही आक्षेप नसल्याचे तहसीलदार यांना कळविले आहे व त्याप्रमाणे राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद यांना कळवून त्यांचा अर्ज निकाली काढण्याची विनंती तहसीलदार, मुखेड यांना अपिलार्थीने या पत्रामध्ये केलेली आहे.

अपिलार्थीच्या तहसीलदार, मुखेड यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०७-०५-२००९ रोजी म्हणजेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०५-२००९ रोजी अपिलार्थीस पूर्ण माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खाललप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १२७४/२००८, दिनांक २४-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माधव भिवाजी बनसोडे, मु. पो. गौतमनगर, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७५

निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१ श्री. नागनाथ देवबा गायकवाड, अपिलार्थी
मु. पो. गायकवाड गल्ली, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती मिळावी म्हणून दंडात्मक कार्यवाहीसाठी त्यांनी सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुखेड तालुक्यातील किरकोळ रॉकेल व हॉकर्स परवानाधारकांबाबत दिनांक

०१-०१-२००६ ते ३१-०३-२००७ या कालावधीशी संबंधीत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत, तसेच त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाबरोबर त्यांच्या दारिद्ररेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबतचा कोणताही पुरावा जोडला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस कधीही देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुनही त्यांनी याबाबतचा कोणताही वैध पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेला नाही. तसेच

व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही उपस्थित झालेले नाही. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार एखाद्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असलेल्या अर्जदाराने जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली तर त्या अर्जासोबत अर्जदाराने त्यांचा दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्यासंदर्भात सबळ पुरावा सादर करणे हे अर्जदारास शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना क्र. आर.टी. आय.२००५/सिआर ३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ नुसार अनिवार्य आहे. त्याचबरोबर अपिलार्थीच्या व्यक्तिशः माहिती मागण्याच्या विनंतीबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अर्जदारावर असते. याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित न राहून अपिलार्थीने त्यांचे या प्रकरणाशी संबंधित उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडल्याचे आयोगास दिसून येत नाही. त्यामुळे आता अद्यापही जर त्यांना या प्रकरणाची संबंधित माहिती हवी असेल तर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देतांना अपिलार्थीच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणापत्राची वैधता प्रथम तपासावी, जर ते वैध नसेल तर अपिलार्थीस ही माहिती याच कालावधीत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नागनाथ देवबा गायकवाड, मु. पो. गायकवाड गल्ली, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७६

निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयातील उप अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, मार्ग लिपीक यांच्या प्रवासाच्या दैनंदिनीची कामाच्या नावासह माहिती, प्रवासाच्या दैनंदिनीची उचल केलेली रक्कम, तसेच गँगमनांनी दरवर्षी केलेल्या कामाचा अहवाल - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये माहिती घेऊन जाण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत, मात्र त्यांनी यासंदर्भात अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत व अंतीमतः दिनांक २५-०७-२००९ रोजी त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक २५-०७-२००९ रोजी त्यांना विनामूल्य प्राप्त झाल्याने व तसा सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आता आयोगास उरलेले नाही. सबब

अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७७

निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१ श्री. अमृत नरंगलकर, अपिलार्थी
द्वारा, एन डी ४२, जे ३ घर नं. २८/५ फिल्टर पाण्याच्या
टाकीजवळ, वैभवनगर, हडको, पो. सिडको,
तालुका जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय (प्रा),
बोधडी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जानेवारी २००५ ते डिसेंबर २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि याही मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १२-०७-२००८ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोठ्या प्रमाणात माहिती मागविली होती. या माहितीची त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून दिनांक १२-०७-२००८ रोजी पाहणी केली व पाहणीमध्ये त्यांना कोणत्याही त्रुटी आढळलेल्या नाहीत व त्यांची आता या प्रकरणी कोणतीही तक्रार नाही.

अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्राचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध झाली आहे व अपिलार्थीची पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीवरुन कोणतीही तक्रार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या अंदाजे ४००० इतकी आहे. त्याच्या छायांकीत प्रती काढून देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कार्यालयीन खर्चाचे आवश्यक ते अनुदान उपलब्ध नाही, हे पाहता व विशेषतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाहण्यासाठी माहिती उपलब्ध करुन दिली आहे हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलातील त्यांनी आयोगाकडे केलेल्या विनंतीची पुर्तता जन माहिती अधिकारी यांच्याकडून झाली आहे, त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर आता आयोगास कार्यवाही करण्याचे कोणतेही प्रयोजन उरलेले दिसून येत नाही. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अमृत नरंगलकर, द्वारा, एन डी ४२, जे ३ घर नं. २८/५,फिल्टर पाण्याच्या टाकीजवळ, वैभवनगर, हडको, पो. सिडको, तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय (प्रा), बोधडी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७१
निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१. श्री. धोंडिराम विश्वनाथ काडवादे, : अपिलार्थी
मु.पो.जानवळ,ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर

२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना आवश्यक असलेली माहिती, संबंधित शासकीय माहिती अधिकारी यांनी बुध्दीपूर्वक उपलब्ध करुन दिलेली नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या निधीतून शेततळयाचे खोदकाम जी.सी.बी.मशीनद्वारे करवून घेऊन "

"संबंधित संपुर्ण खोदकाम मजुरामार्फत केलेले असल्याची शंभर टक्के बनावट (खोटी) दस्तऐवज शासनास सादर करुन करण्यात आलेला भ्रष्टाचार उघडकीस येऊ नये ? "

"यासाठी सक्रिय कार्यरत असलेल्या संबंधीत अधिकाऱ्यावर विनाविलंब कठोर कार्यवाही होण्यायोग्य मी मुंबई उच्च न्यायालयात विशेष जनहितार्थ याचिका सादर करणार आहे. "

"त्यामुळे दि. २६ डिसेंबर २००७ पासून सदर योजनेतील भ्रष्टाचार निर्मुलनार्थ, जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीने लिखीत केलेल्या संपुर्ण कार्यवाहीची सत्य प्रतीत माहित मला न्यायालयात सादर करण्यास अत्यंत आवश्यक आहे. "

"करिता मे. साहेबांनी मला आवश्यक असलेली संपुर्ण माहिती सत्य प्रतीत उपलब्ध करुन देण्याची कृपा करावी. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याचे सूचित केले. या आदेशानंतर अपिलार्थीस प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर यांनी दि.२१.०४.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण यंत्रणा, लातूर यांच्यामार्फत त्यांनी याच माहितीसाठी केलेल्या दुसऱ्या अर्जाच्या संदर्भाने दि. २१.०४.२००९ रोजी सशुल्क पुरविली गेली आहे व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती आता प्राप्त झालेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती बव्हंशी मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीच्या, वर्णनावरुन फक्त एवढाच बोध होतो की, "दि.२६.१२.२००७ पासून संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार निर्मुलनार्थ, जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीने केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती", ही माहिती त्यांना आवश्यक आहे. या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर यांच्याकडून दि. २१.०४.२००९ रोजी दिली गेली आहे. अपिलार्थीस ही माहिती संबंधितांकडून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली आहे व आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर गैरहजर आहेत. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधितांच्याकडून प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.१२७१/०८, दि.२६.०५.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धोंडिराम विश्वनाथ काडवादे,मु.पो.जानवळ,ता.चाकूर, जि.लातूर-४१३ ५२९.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७२
निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१. श्री. किरण माणिकराव यादव, : अपिलार्थी
रा.आराधवाडी ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
बी. जे. माध्यमिक विद्यालय देवसिंगा (तुळ),
ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने आणि या प्रकरणी त्यांनी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित एकूण आठ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाच्या चुकीमुळे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना सादर केला गेला नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय घेता आला नाही. आयोगाने आदेशित केल्यास संबंधित जन अपिलीय अधिकारी हे या अपील अर्जावर निर्णय घेण्यास तयार आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे इष्ट राहील. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच

क्र.मा.प.३...

रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमि

संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव,रा.आराधवाडी ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,बी. जे. माध्यमिक विद्यालय देवसिंगा (तुळ),ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७३
निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१. श्री. ज्ञानदेव विश्वनाथ क्षिरसागर, : अपिलार्थी
रा.आडगाव,ता.लोहा,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,लोहा, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, लोहा,जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार,लोहा, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०६.२००८ रोजी नोंदविलेले केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी आवश्यक असलेली माहिती त्यांना दि.०७.०२.२००९ रोजी विनामूल्य पुरविली असल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, "सन २००७-०८ पर्यंत वाटप झालेल्या मालाच्या पावतीच्या झेरॉक्स" संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, संबंधित स्वस्त धान्य दुकानदार हे अशाप्रकारच्या मालाच्या पावत्यांच्या स्थळप्रती त्यांच्याकडे ठेवत नाहीत व अशाप्रकारची कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसते. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक माहिती ते अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. परंतु संबंधित स्वस्त धान्य दुकानदारांच्या विक्री

रजिस्टरच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दि. ३०.०६.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी देऊ केल्या होत्या. तथापि अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडून स्वीकारली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत अथवा यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये आपले कोणतेही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाल्याचे अनुमान काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १२७३/०८, दि. २३.०६.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ज्ञानदेव विश्वनाथ क्षिरसागर,मु.पो.आडगाव, ता.लोहा,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६८
निर्णय दिनांक ०९-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर,<br>रा.पैठण, जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, पैठण,जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही, संबंधितांनी अद्यापपावेतो त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०२.२००८ ( प्रत्यक्षात दि.०५.०२.२००८ रोजी प्राप्त)रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००४ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण दोन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नगर परिषदेकडे वेगवेगळया अनुदानातून केल्या गेलेल्या कामांच्या दि.०१.०१.२००४ ते ३१.०८.२००७ पर्यंतच्या क्वॉलिटी कंट्रोल रिपोर्टच्या नकला व नगर पालिका नवीन इमारतीच्या बांधकामाच्या जाहीर प्रगटनाची नक्कल, निविदा घेतलेल्या

ठेकेदाराची नावे, टेंडर पास झालेल्या ठेकेदाराचे नाव, तुलनात्मक तक्ते, इमारतीच्या कामाचे अंदाजपत्रक, नकाशा व स्ट्रक्चरल डिझाईनची नक्कल, इमारत बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या एकूण जागेचे क्षेत्रफळ - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि.१२.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर दि. २१.०५.२००८ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.०५.२००८ रोजी पुरविलेली माहिती अपूर्ण असून या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील, 'टेंडरचा प्राप्त झालेला तुलनात्मक तक्ता व इमारतीच्या नकाशाची स्ट्रक्चरल डिझाईनची नक्कल' या मुद्यावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये समाविष्ट नाही. मूळ अर्जात व्यक्तिशः माहितीची मागणी करुन अपिलार्थी हे, ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केव्हा गेले, यासंदर्भातील काही पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध आहे काय, अशी आयोगाने अपिलार्थीस विचारणा केल्यानंतर अपिलार्थीने ते दि.०१.०६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असल्याचा परंतु यानंतरही माहिती न मिळाल्याचा पुरावा त्यांनी

आयोगास सादर केला. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले होते, हे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांना दि.२१.०५.२००८ रोजी त्यांनी संपूर्ण माहिती दिली आहे. तसेच अपिलार्थीस नक्की जन माहिती अधिकारी यांनी कोणती माहिती दिली याची विचारणा आयोगाने केली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती ते आयोगास दाखवू शकले नाहीत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना त्यांच्या कार्यालयातील सहायकांवर व कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत असते.त्यांच्या सहायकांकडून जशी माहिती त्यांच्याकडे प्राप्त होईल, तशी ते अपिलार्थीस ती पुरवित असतात. या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील लेखापाल, इंजिनिअर व संबंधित वरिष्ठ लिपीक हे सर्वजण जबाबदार आहेत.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये देय होत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.०५.०२.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करेपर्यंतही कोणतीही माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०७.०५.२००८ रोजी अपिलार्थीस दोन दिवसांच्या आत माहिती देण्याचे कबूल करुनही अंतिमतः दि. २१.०५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती पुरविली. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना दि. ०४.०३.२००८ रोजी देय असलेली माहिती दि.२१.०५.२००८ रोजी पुरवून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण ६७ दिवसांचा विलंब लावला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती देण्यासाठी जन माहिती

अधिकारी यांना फारसे कष्ट घ्यावे लागले असते किंवा त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागला असता,अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांच्या वर निर्देशित केलेल्या सहायकांनी, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत पुरविली नाही. परिणामी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून ६७ दिवसांच्या विलंबाने व अपूर्ण स्वरुपात प्राप्त झाली आहे. अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक हे अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे सहायक आयोगासमोर उपस्थित नाहीत, तेंव्हा या प्रकरणी त्यांचे म्हणणे मांडण्याची त्यांना संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या एकूण ६७ दिवसांच्या विलंबाबद्दल त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.१६,७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास ते जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ मधील टेंडरचे तुलनात्मक तक्ते व इमारतीच्या स्ट्रकचरल डिझाइनची प्रत ही उर्वरित माहिती सात दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील वर निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. तसेच अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी याच कालावधीमध्ये ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ च्या संदर्भातील, निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांच्या सहायकांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून ६७ दिवस इतका विलंब लावल्याबद्दल त्यांना एकूण रु.१६,७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु.पो.स्वयंभू निवास, जैनपुरा,पैठण, ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण,जि.औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६९
निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१. श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, : अपिलार्थी
परळी (वै.), जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,
बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. २१.०२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी स्वत: न देता ही माहिती देण्यासाठी जिल्हयातील सर्व तहसीलदारांना आदेशित केले. तथापि बीड जिल्हयातील एकाही तहसीलदाराने अपिलार्थीस माहिती पुरविण्याची तसदी घेतली नाही. यासंदर्भात त्यांनी वेळोवेळी जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना समक्ष भेटून माहिती देण्याची विनंती केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी ती न दिल्यामुळे त्यांनी, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दि.१०.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई आदेशित करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. २८.०५.२००८ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये बीड जिल्हयातील सन २००४ ते दि.२१.०२.२००८ या कालावधीमधील बोगस शिधापत्रिकेच्या संदर्भात काही माहिती नोंदणीकृत शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने हा अर्ज जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयास उद्देशून केला होता. तथापि सदर माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्याकडे नसल्याने त्यांनी दि. ०४.०३.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या दि.२१.०२.२००८ रोजीच्या अर्जाच्या छायाप्रती संबंधित तहसीलदार यांच्याकडे पाठवून सर्व तहसीलदार यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. यानंतरच्या कालावधीमध्ये अपिलार्थी व तहसीलदार यांच्यात बराच पत्रव्यवहार होत राहिला परंतु अपिलार्थीस आवश्यक ती माहिती कोणत्याही तहसीलदाराकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर दि. १२.०५.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. सदर आदेश पारित करीत असताना, जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तालुकास्तरावरील असल्याने, अपिलार्थीने तहसीलदार यांच्याकडे अर्ज करुन माहिती घेण्याचे त्यांना बंधनकारक असल्याच्या मुद्यावर व प्रत्यक्षपणे तालुका स्तरावरील जन अपिलीय अधिकारी ते नसल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळून लावल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उभयतांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अर्जातील त्यांच्या निवेदनाशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दि.२३.०८.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, या पत्राद्वारे त्यांना पुरविलेली माहिती ही, त्यांच्या दुसऱ्या अर्जाशी संबंधित आहे. या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी चार मुद्यांची माहिती पाठविली आहे. मात्र अपिलार्थीने विचाराधीन अपील प्रकरणी माहितीसाठीचा अर्ज फक्त दोन मुद्यावरील माहितीकरिताच केलेला आहे.यामुळे जन माहिती अधिकारी यांचा त्यांनी अपिलार्थीस दि. २३.०८.२००८ रोजी माहिती दिली हा युक्तिवाद चुकीचा आहे, असे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यातील जिल्हास्तरावरील माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे हे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाची कार्यपध्दती पाहता, अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जिल्हास्तरावरील माहिती अपिलार्थीस उपलब्ध न करुन देता अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी तहसीलदार यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कार्यपध्दतीशी संबंधित माहिती अवगत करुन घेतली असता, आयोगास असे आढळून आले आहे की, दरवर्षी शासनातर्फे शिधापत्रिका तपासणी करण्याची मोहिम जिल्हयातील प्रत्येक गाव व तालुकापातळीवर तसेच जिल्हास्तरावर राबविली जाते व वर्षातून एकदा या मोहिमेचे निष्कर्ष शासनाला कळविले जातात. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हास्तरावर उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहितीतील बहुतांश माहिती ही तालुका स्तरावर असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२१.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भात अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे व मुद्दा क्र. २ च्या संदर्भात सर्व माहिती तहसीलदार यांच्याकडून संकलीत करुन घेऊन तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वर स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती सर्व संबंधितांच्याकडून प्राप्त करुन घेऊन, ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील निर्णयात स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते,दिवाणी न्यायालय,क.स्तर,परळी (वै.), जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७०
निर्णय दिनांक ०९-०९-२००९

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख : अपिलार्थी
रा.अंबावेस, ता.परळी,जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
यु.जी.सी.(सेट विभाग),
पुणे विद्यापीठ,पुणे

२. जन अपिलीय अधिकारी,
यु.जी.सी.(सेट विभाग),
पुणे विद्यापीठ,पुणे

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : माहिती अधिकारी,
पुणे विद्यापीठ,पुणे.

जन अपिलीय अधिकारी : प्रबंधक,
पुणे विद्यापीठ,पुणे.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०४.२००८ रोजी फेर सादर झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०२.२००७ रोजीच्या पत्रानुसार दिलेली माहिती अपूर्ण, त्रोटक, दिशाभूल करणारी अशी देऊन कायद्याची क्रुर चेष्टा केलेली आहे. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, सुनावणीसाठी अपिलार्थीस न बोलाविता, एकतर्फी निर्णय देऊन अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवले. त्यामुळे संबंधितांच्यावर शास्ती व दंड करावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या विषयी एकूण सहा मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०२.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले.तथापि त्यांनीही अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे प्रथम दि.१०.०५.२००७ रोजी व तदनंतर वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील फेरसादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १४.०२.२००७ रोजी त्यांच्याकडील संपूर्ण माहिती विनामूल्य दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ०५.०२.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. तथापि प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झालेले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती ही अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील काही माहिती, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे, असे या माहितीचे अवलोकन करता आढळून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, यासंदर्भात

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणताही लेखी युक्तिवाद अथवा तत्सम पुरावा सादर केला नाही किंवा त्यांचा हा मुद्दा पटवून देण्यासाठी आज रोजी सुनावणीसाठी ते आयोगासमोरही उपस्थित नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१४.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे लक्षात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,द्वारा कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, ता.परळी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी,पुणे विद्यापीठ,गणेशखिंड,पुणे-४११ ००७ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक,पुणे विद्यापीठ,गणेशखिंड,पुणे-४११ ००७ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८५

निर्णय दिनांक १०-०९-२००९

१ श्री. शब्बीर बेग शौकत बेग, : अपिलार्थी

रा. रुई, तालुका माहूर जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, रुई, तालुका माहूर

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर,

तालुका माहूर जिल्हा नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मुळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मु.पो. रुई, ता. माहुर जिल्हा नांदेड येथे सुनेराबी शरफोद्दीन काझी यांच्या गट नंबर १७ या शेतामध्ये ग्रामपंचायतीमार्फत बांधल्या गेलेल्या मातीनाला बंधा-याच्या संदर्भात व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - म.रो.ग्रा.यो. अंतर्गत गट नंबर १७ मध्ये झालेल्या माती बंधा-याच्या कामाचे अंदाजपत्रक, कामावरील मजुरांचे

हजेरीपत्रक, बंधा-याचा नकाशा, झालेला खर्च, मजुरांना वाटलेल्या पगार पत्रकांची माहिती, ग्रामपंचायत रुईने बंधारा बांधण्यासाठी दिलेली परवानगी व ठरावाची नक्कल, नुतन ग्रामपंचायतीने घेतलेल्या ग्रामसभेच्या ठरावाची व मासिक सभेच्या अहवालाची नक्कल, ग्रामसभा व मासिक सभेत कोणत्या विषयांवर चर्चा झाली व कोणकोणत्या विषयांवर ग्रामसभेने व मासिक सभेने मंजुरी दिली, म.ग्रा.रो.यो. अंतर्गत आतापर्यंत किती कामांना मंजुरी दिली व खर्च किती केला व मजुरांची यादी या माहितीचा समावेश होतो.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी केलेले अपील मुदतीत सादर केले नसल्याच्या कारणावरुन अपील स्विकारण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलर्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत या परिस्थितीमध्ये अपिलार्थीस मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही, त्यामुळे अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही असे गृहीत धरुन या प्रकरणाची सुनावणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन पुढे घेण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती

अधिकारी यांच्याकडून ती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे उत्तरदायित्व अपिलार्थीवर आहे. तथापि ते अपिलार्थीने योग्यरित्या पार पाडले आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिका-यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करीत नाही मात्र जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शब्बीर बेग शौकत बेग, रा. रुई, तालुका माहूर जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, रुई, तालुका माहूर जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८६

निर्णय दिनांक १०-०९-२००९

१ श्री. मलंग अब्दुल रहेमान पि. मो. इस्माईल, अपिलार्थी
रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प
विभाग क्रमांक २, उमरखेड, तालुका उमरखेड,
जिल्हा यवतमाळ

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ,
नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देण्यात येणा-या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५ हे जादा आकारले आहे. अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती एका पृष्ठाची असून स्पीड पोस्टाने हे पत्र पाठविण्यासाठी

त्यांना २५ रुपये अधिक द्यावे लागत आहे असे असूनही त्यांनी अपिलार्थीस एका पृष्ठासाठी एकूण ३५ रुपयाची आकारणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात २७ रुपये इतका खर्च करावा लागत असल्याने त्यांनी अपिलार्थीकडून घेतलेले जादाचे शुल्क रुपये आठ हे त्यांना परत करावयास हवे होते. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना दंडात्मक शिक्षा केली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आयोगास अशी विनंती केली आहे की, या प्रकरणी त्यांच्या आर्थिक नुकसानीची भरपाई त्यांना आयोगाने मिळवून द्यावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांना जास्तीत जास्त दंडाची शिक्षा आयोगाने आदेशित करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. मलंग निहाल अहमद मो. इस्माईल यांच्यासंदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे त्यांच्या जून २००५, नोव्हेबर २००६ व मार्च २००८ या तीन महिन्यातील संपूर्ण वर्कशीटची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे अथवा शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ३५ रुपयांची मनीऑर्डर पाठविली. ही मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना दिनांक २७-०५-२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर दिनांक ३०-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक माहिती पुरविली. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे एक पृष्ठ व त्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी स्पीड पोस्टाव्दारे पाठविलेल्या पत्रावरील तिकीटे हे सर्व एकत्रपणे केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फक्त २७ रुपये इतका खर्च आला आहे, परंतु त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून एकूण ३५ रुपये इतक्या शुल्काची आकारणी केली गेली आहे असे आढळून आले. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगा-समोर कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे व ती सार्वजनिक स्वरुपाची आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५ इतके अपिलार्थीस मनीऑर्डरने पाठविण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीची मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना दिनांक २७-०५-२००८ रोजी प्राप्त झाली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी शुल्क भरण्यासाठी पाठविलेल्या पत्राचा दिनांक व जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः मनीऑर्डर प्राप्त झाल्याचा दिनांक व अधिनियमातील कलम ७ (३) (क) ची तरतूद विचारात घेतल्यास अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २८-०५-२००८ रोजी अगर तत्पूर्वी देय होत आहे. परंतु अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०५-२००८ रोजी म्हणजेच अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा अनुज्ञेय कालावधी व्यपगत झाल्यानंतर पुरविली असल्याचे आयोगास आढळून येत आहे, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. परिणामी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून या

प्रकरणी त्यांनी माहितीपोटीचे स्वीकृत केलेले संपूर्ण शुल्क रुपये ३५ इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांना माहिती देण्यापोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३५ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाचे आत परत करावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये असे मुद्दे उपस्थित केले आहेत की, त्यांना माहिती अधिकारी यांनी मुद्दयाप्रमाणे माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दंडात्मक शिक्षा केली नाही. यासंदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिका-यावर दंडात्मक अथवा कोणत्याही प्रकारची शिक्षा करण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली मूळ माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुसंगत माहिती दिल्याचे सिध्द होत आहे, त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३५ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाचे आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मलंग अब्दुल रहेमान पि. मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, उदगीर घर क्रमांक १-३-५८, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक २, उमरखेड, तालुका उमरखेड, जिल्हा यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८८

निर्णय दिनांक १०-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. खादरी महंमद इरफान महंमद सोहेल,<br>नांदेड जिल्हा प्रतिनिधी, दैनिक ऊर्दू टाईम्स (मुंबई),<br>रा. उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू पाने), नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी नियमबाह्य शुल्क आकारल्यामुळे व अपिलार्थीची दिशाभूल केल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेऊन नियमबाह्य निर्णय दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित आर्थिक वर्षे २००१ ते मार्च २००८ या कालावधीमधील मोठ्या प्रमाणात व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीतील रोजगार हमी योजनेअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत केल्या गेलेल्या कामांची यादी, अंदाजपत्रक, मोजमापपुस्तिकांची सत्यप्रत व मजुराच्या हजेरी मस्टर्सच्या तसेच पे शीटच्या सत्यप्रती, प्रत्येक आर्थिक वर्षात रोजगार हमी योजनेशिवाय कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या, त्याकरिता प्राप्त निधी आणि हा निधी कोणकोणत्या कामावर खर्च करण्यात आला याचा लेखी तपशील, कामे केलेल्या संस्थेची व एजन्सीची नांवे व त्यांना अदा केलेल्या देयकाच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०४-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५००० इतके शासकीय कोषागारात भरुन चलनाची एक प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस हे शुल्क जास्त वाटल्याने अपिलार्थीने दिनांक २९-०४-२००८ रोजी या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला. परंतु हा तपशील त्यांना प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२००८ रोजी आपले लेखी आदेश पारीत करुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील त्यांना कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीने शुल्काची रक्कम भरल्यानंतर तीन दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरल्यास अपिलार्थीस त्वरीत माहिती देण्याचे आयोगास आश्वासीत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तथापि या माहितीची व्याप्ती अधिक मोठ्या प्रमाणात आहे. ही माहिती देण्यासाठी अपिलार्थीस तात्काळ १७५०० इतक्या पृष्ठ्यांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील. अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक ते अनुदान उपलब्ध नाही, त्यामुळे आज रोजी दोनही पक्षांनी असे मान्य केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व या माहितीमधून अपिलार्थीस ज्या कागदपत्रांची आवश्यकता वाटेल ती कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या अनुदानाच्या उपलब्धतेनुसार विनामूल्य पुरवावीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. खादरी महंमद इरफान महंमद सोहेल, नांदेड जिल्हा प्रतिनिधी, दैनिक ऊर्दू टाईम्स (मुंबई), रा. उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू पाने), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८९

निर्णय दिनांक १०-०९-२००९

१ श्री. पठाण अब्दुल्ला खाँ मन्नान खाँ, : अपिलार्थी
रा. नुरी मोहल्ला, कळमनुरी, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, कळमनुरी,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.) व मुद्रांक
जिल्हाधिकारी, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कळमनुरी नगरपरिषद हद्दीतील खरेदीखत क्रमांक ७२३, ७२४ व ७४५ च्या

संदर्भात काही माहिती मागितली होती व त्याचबरोबर खरेदीखत ७४५ अन्वये आदिवासीच्या जमिनी खरेदीबाबत देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थी-च्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय पारीत केला असल्याचे आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. प्रस्तावित सुनावणीचे पत्र अपिलार्थीस किमान दहा दिवस अगोदर प्राप्त होईल याची त्यांनी दक्षता घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, परभणी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पठाण अब्दुल्ला खाँ मन्नान खाँ, रा. नुरी मोहल्ला, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.) व मुद्रांक जिल्हाधिकारी, प्रशासकीय इमारत, हॉल क्रमांक ३, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२९०

निर्णय दिनांक १०-०९-२००९

१ श्री. शेख नईम शेख लाल, : अपिलार्थी
नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. गणेश अरविंद कोरेवाड, रा. ता. हदगांव, जिल्हा नांदेड यांचे मन्नेरवारलू या अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र क्रमांक ९४/अे/कास्ट/सीआर-५५६५, दिनांक

१७-१२-१९९४ यांचे जातीचे प्रमाणपत्राची व त्यांनी सादर केलल्या अर्जाची व सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्राची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अभिलेख शाखेकडून मागविण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. परंतु विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागविली आहे व प्रथम सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात असल्यामुळे अधिनियमातील कलम ११ ची तरतूद लक्षात घेऊन जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगांव यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे योग्य राहील असे आयोगास वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त

झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार हदगांव यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८२
निर्णय दिनांक १०-०९-२००९

१. श्री. राधाकिशन ज्ञानेश्वरराव गित्ते, : अपिलार्थी
मु.वागबेट,पो.बेलंबा,ता.परळी वै.,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जावर अपिलार्थीने दि. १५.०७.२००८ असा तारखेचा उल्लेख केलेला आहे.

आज रोजी सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.सहायक जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच सहायक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ०५.०९.२००९ रोजीचे पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०७.२००८ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली असल्याने त्यांचे समाधान झाले आहे व आता त्यांची कोणतीही तक्रार उरलेली नाही. यामुळे ते आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील अशाप्रकारे त्यांच्या दि.०५.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मागे घेतले असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १२८२/०८, दि. २३.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राधाकिशन ज्ञानेश्वरराव गित्ते,मु.वागबेट,पो.बेलंबा,ता.परळी वै.,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७९
निर्णय दिनांक १०-०९-२००९

१. श्री. रंगराव रामराव मुळे, : अपिलार्थी
रा.सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
लाभक्षेत्र विकास, जलसंपदा कार्यालय,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी,
मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक,
लाभक्षेत्र विकास कार्यालय,औरंगाबाद

प्रत्यक्षतः तत्कालीन जन माहिती अधिकारी : सहायक मुख्य प्रशासक, कडा कार्यालय

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास कार्यालय, औरंगाबाद

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी : मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास,औरंगाबाद

विद्यमान जन अपिलीय अधिकारी : सहायक मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासक लाभक्षेत्र विकास कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी

संबंधित काही माहिती व्यक्तिशः व जन माहिती अधिकारी यांच्याकार्यालयामार्फत मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सचिव, लाभक्षेत्र विकास श्री. ए.बा.पाटील, कक्ष अधिकारी, श्री. ज.ल.ठाणकर, मुख्य अभियंता तथा मुख्य प्रशासक श्री. चं.ई.संबुतवाड, सहायक मुख्य अभियंता, श्री. अ.ल.पाठक, महालेखापाल AG II, नागपूर या सर्वांचे संपूर्ण नाव, कायमचा पत्ता, निवृत्तीचा दिनांक व मंत्रालयीन स्तरावर अपिलार्थीच्या सर्व न्यायालयीन प्रकरणाची व इतर प्रकरणाच्या कार्यालयीन टिपणीच्या प्रती - याचा समावेश होता.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी व मंत्रालय यांच्याकडे उपलब्ध होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.०५.२००८ रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची प्रत दि. ०७.०५.२००८ रोजी मंत्रालयास पाठवून दिली व अपिलार्थीने मागणी केलेली, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दि. ३०.०५.२००८ रोजी सशुल्क पुरविली. अपिलार्थीच्या मंत्रालयाकडील प्राप्त झालेल्या अर्जावर मंत्रालयातील कक्ष अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०६.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५३/- इतके त्यांना चलनाद्वारे कोषागारात भरण्याचे सूचित केले. तसेच दि. ०६.०८.२००८ रोजीच्या या पत्रामध्ये मुख्य अभियंता, यांच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या पत्राचा संदर्भ दिला आहे. त्याचे अवलोकन करता मुख्य अभियंता यांनी अपिलार्थीस अशाप्रकारचे शुल्क भरण्याचे कळविले नव्हते, असे दिसून येते. मंत्रालयाच्या दि.०६.०८.२००८ रोजीच्या पत्रातील संदर्भ क्र.२ मध्ये शासनाच्या समक्रमांकाच्या दि. २२.०५.२००८ रोजीच्या पत्राचा संदर्भ दिला आहे. तथापि हे पत्र या प्रकरणाशी संबंधित मुख्य अभियंता व अपिलार्थी यांना प्राप्त झाले नाही, असे त्यांनी आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगाच्या निदर्शनास आणले. मंत्रालयाचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दि. ०६.०८.२००८ रोजीचे पत्रदेखील अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थीने आज आयोगाच्या निदर्शनास आणले.

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात संबंधितांकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या

तरतुदीनुसार परत मुख्य अभियंता तथा मुख्य प्रशासक,कडा, औरंगाबाद यांच्याकडे दि.०५.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास प्रशासक कडा यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस यासंदर्भात जलसंपदा विभाग,मुंबई व महालेखापाल,नागपूर यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संबंधितांकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतला असता, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेली वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आणली. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर माहिती न देण्याचे ठरविले असल्याचे व आता त्यांना मूळ अर्जातील संपूर्ण माहिती आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांच्याकडे उपलब्ध नव्हती. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार दि. ०७.०५.२००८ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत जलसंपदा विभागाकडे पाठवून त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडल्याचे दिसून येते. मात्र जलसंपदा विभागाच्या मंत्रालयीन स्तरावर अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची प्रत त्यांना प्राप्त झाल्यानंतर, या अर्जावर अधिनियमानुसार आवश्यक असलेली प्रक्रिया योग्य प्रकारे पार पाडली गेली नाही, असे दिसून येते. अपिलार्थीस त्यांनी, 'जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरण्याचे कळविले

आहे', असे अपिलार्थीस चुकीचे कळविले आहे. कारण मुख्य अभियंता यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि.०७.०५.२००८ रोजीच्या पत्रामध्ये अशाप्रकारच्या शुल्काचा उल्लेख नाही. मंत्रालयीन स्तरावर बहुतेक अपिलार्थीस दि. २२.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे शुल्काचा भरणा करण्यासंदर्भात पत्र लिहिले गेले असावे, असे आयोगास वाटते. तथापि जलसंपदा विभागाचे दि.२२.०५.२००८ रोजीचे पत्र खुद्द मुख्य अभियंता यांच्या कार्यालयासही प्राप्त झाले नाही व अपिलार्थीसही प्राप्त झाले नाही. यावरुन अपिलार्थीचा दि.०३.०५.२००८ रोजीचा अर्ज जलसंपदा विभागास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) मधील विहित तरतुदीप्रमाणे प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते. याही उपर दुसरे असे महत्त्वाचे आहे की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित शुल्क भरण्याची कल्पना जलसंपदा विभागाच्या दि. ०६.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे आली आहे. या पत्रामध्ये जलसंपदा विभागाने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना, अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे, या शुल्काचा सविस्तर तपशील अपिलार्थीस कळविला नाही. त्यामुळे जलसंपदा विभागाचे दि.०६.०८.२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. परिणामी अपिलार्थीस त्यांच्या दि.०३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील जलसंपदा विभागाच्या मंत्रालयीन स्तरावरील माहिती विनामूल्य देय होत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व मुख्य अभियंता यांच्या कार्यालयामार्फत मागविली आहे. यापैकी मुख्य अभियंता कार्यालयाने अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती दि. ३०.०५.२००८ रोजी सशुल्क पुरवली आहे. मंत्रालयीन स्तरावरील माहितीच्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.११.१०.२००५ रोजी पारित केलेल्या अधिसूचना क्रमांक आर.टी.आय. २००५/सिआर ३१५/०५/५ मध्ये प्रपत्र 'अ' चे अवलोकन करता असे आढळून येते की, माहिती मागविण्यासाठी विहित केलेल्या प्रपत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती व्यक्तिशः हवी आहे की पोस्टाद्वारे हवी आहे यापैकी फक्त एका विकल्पावर अर्जदाराकडून स्पष्ट उल्लेख अपेक्षित आहे. या दोन माध्यमाव्यतिरिक्त तिसऱ्या

माध्यमाव्दारे अथवा विचाराधीन प्रथम अर्जामध्ये अपिलार्थीने नमूद केल्याप्रमाणे वेगळ्या प्रकारे अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागता येत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जरी त्यांनी मंत्रायलयाशी संबंधित माहिती मुख्य अभियंता कार्यालयामार्फत हवी असल्याचे म्हटले असले तरी त्यांना मंत्रालयातील जलसंपदा विभागातील माहिती, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून मंत्रालयामध्ये कार्यालयीन दिवशी (सुटीचे दिवस वगळून) पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जलसंपदा विभागाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी लागेल, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रंगराव रामराव मुळे, प्लॉट नं. ई-१९, टाऊन सेंटर, सेंट लॉरेन्स स्कूलजवळ, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८०
निर्णय दिनांक १०-०९-२००९

१. श्री. विवेक उत्तमराव निंबाळकर, : अपिलार्थी
रा.शिरजगाव,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
नांदूर मधमेश्वर कालवा, वैजापूर,जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
पाटबंधारे महामंडळ,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने व त्यांनी माहितीची मागणी केलेल्या प्रकरणातील गैरव्यवहार बाहेर येण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे व आयोगाकडे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून, "नं.१०१ ते ११० मध्ये वनीकरण करण्यात आले का? असल्यास संपूर्ण तपशील मिळणेबाबत, या कामास वरिष्ठांची मंजूरी होती का?" ही माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित जानेवारी, २००८ ते एप्रिल, २००८ या कालावधीची, "नं.१०१ ते ११० पर्यंत करण्यात आलेल्या प्लांटेशनचा संपूर्ण तपशील

मिळणेबाबत"ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०६.२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस पाठविली. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०६.२००८ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली, तथापि माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि.२८.०६.२००८ रोजी संपूर्ण माहिती दिली आहे व अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठयर्थ त्यांच्याकडील दि. २८.०६.२००८ रोजीच्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "नं.१०१ व ११० पर्यंत करण्यात आलेल्या प्लांटेशनचा संपूर्ण तपशील मिळणेबाबत" ही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीवरुन अपिलार्थीस " संपूर्ण तपशील "म्हणजे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या मुद्यावर माहिती अपेक्षित आहे, हे त्यांनी या अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. या मुद्यांसंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील, 'मुद्दा क्र. ३ (एक) माहितीचा विषय' या सदरासमोर, "नं.१०१ ते ११० येथे प्लांटेशनचे काम करण्यात आले आहे काय? असेल

तर यासंबंधीची संपूर्ण माहिती मिळाणेबाबत"असे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपाची माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. अशास्वरुपाची माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत नाही. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या कथित प्लांटेशनसंदर्भात माहिती मागविली आहे, ती कामेच मूळात झ ााली नसल्याने अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या केलेल्या अर्जातील माहिती ही "निरंक" अशी दिली असल्याचे दिसून येते. याही उपर दुसरे महत्त्वाचे असे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अर्जामध्ये त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जापेक्षा वेगळे मुद्दे उपस्थित करुन त्याच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढविली आहे. याही मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती देय नसताना ती विनामूल्य दिल्याचे दिसून येते. अशाप्रकारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देय नसताना देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे असे आयोगास आढळून येत आहे व अपिलार्थीच्या मूळ आणि व्दितीय अपील अर्जातील त्यांना अपेक्षित माहिती ही मूळात अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विवेक उत्तमराव निंबाळकर,रा.शिरजगाव,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,नांदूर मधमेश्वर कालवा, वैजापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे महामंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८१
निर्णय दिनांक   १०-०९-२००९

१. श्री. दामोधर तुकाराम मंत्रे, : अपिलार्थी
रा.पाहडी पारगाव, ता.धारुर,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,किल्ले धारुर, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,किल्लेधारुर, जि.बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. अर्जुन गणपतराव अंडील,
स्वस्त धान्य दुकानदार, पाहडी पारगाव,
ता.धारुर,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती त्यांनी आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष,स्वस्तधान्य दुकानदार, मु.पो.पाहडी पारगाव, ता.धारुर,जि.बीड यांच्यासंदर्भात एकूण सात मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, तहसीलदार, किल्ल धारुर, जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच, त्यांनी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि- नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दामोधर तुकाराम मंत्रे,मु.पो.पाहडी पारगाव, ता.धारुर,जि.बीड-४३१ १२४.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,किल्ले धारुर, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किल्लेधारुर, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८३
निर्णय दिनांक १०-०९-२००९

१. श्री. शेख तनवीर मो.हनिफ, रा.अहमदनगर : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न पुरविल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश पारित न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे. या अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आयडीयल एज्युकेशन सोसायटी व्दारा संचलित बिलोली उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाशी संबंधित सन १९८३ ते २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण १८ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने सदर अर्ज शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, नांदेड यांना उद्देशून केला होता. शिक्षण विभागाच्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे त्यांनी या अर्जाची प्रत मुख्याध्यापक, बिलोली ऊर्दू हायस्कूल यांच्याकडे दि. २६.०३.२००८ रोजी पाठवून

अपिलार्थीस माहिती देण्याचे मुख्याध्यापक यांना सूचित केले. विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.१०.२००८ रोजी निर्णय घेऊन, "अपिलार्थीने माहितीची फी भरुन माहिती अधिकाऱ्याकडून माहिती घ्यावी", असे अपिलार्थीस सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने त्यांना संबंधितांकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी मुख्याध्यापक, बिलोली उर्दू हायस्कूल व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, मुख्याध्यापक, बिलोली ऊर्दू हायस्कूल यांनी दि. १५.१०.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. त्यामुळे मुख्याध्यापक यांनी दि. १६.१०.२००८ रोजी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहिती पुरविली.

वरील घटनाक्रम,जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १८ मुद्यांद्वारे सन १९८३ ते २००८ या कालावधीतील माहिती मागविली आहे. यापैकी मुद्दा क्र. ५,६,७,८,११,१४,१५,१७ व १८ या नऊ मुद्यांशी संबंधित माहिती ही बिलोली ऊर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाशी संबंधित आहे. उर्वरित ९ मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे व मुद्दा क्र. ९ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.९ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विचारणा केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुख्याध्यापक,

बिलोली ऊर्दू माध्यमिक विद्यालय यांनी अपिलार्थीस माहिती देताना सन १९९३ ते २००८ या कालावधीतील माहिती नांदेड येथे आलेल्या महापूराने नष्ट झाली असल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. मात्र जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.नांदेड यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील कोणतीही माहिती आजतागायत अपिलार्थीस पुरविली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित अशाप्रकारची माहिती अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितली होती. परंतु त्यांनी स्वतःच्या कार्यालयाशी संबंधित माहिती देखील संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.नांदेड यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित असलेल्या एकूण ८ मुद्यावरील (मुद्दा क्र.१,२,३,४,१०,१२,१३ व १६) माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. २३.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.११.२००८ रोजी निर्णय दिला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६) मधील तरतुदीद्वारे निश्चित केलेल्या कालावधीमध्ये निर्णय न घेऊन आपली बेजबाबदार कार्यशैली स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब शिक्षण संचालक,म.रा.पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित शिक्षणाधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्य नोंद घेण्याचे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित असलेल्या एकूण ८ मुद्यावरील (मुद्दा क्र.१,२,३,४,१०,१२,१३ व १६) संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तनवीर शेख मो.हनिफ, १८३०, सुभेदार गल्ली, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,१७,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८४
निर्णय दिनांक १०-०९-२००९

१. श्री. सय्यद वजीर सय्यद अहमद, : अपिलार्थी
रा. अर्धापूर, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, ता.अर्धापूर,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अर्धापूर,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत अर्धापूर अंतर्गत अर्धापूर शहरामध्ये पहिला, दुसरा व तिसरा मजला अशी आर.सी.सी.चे बांधकाम केलेल्या घरांची संख्या, घरमालकाचे नाव,क्रमांक, कर आकारणीची माहिती,१९९५ पासून वाढीव कर आकारण्यात आला काय, कर आकारणीत वाढ ज्या ठरावाद्वारे केली गेली, त्या ठरावाची प्रत, इतिवृत्ताची प्रत व ज्या घरांना वाढीव कर आकारणी केली, त्या घराचा क्रमांक, नाव, क्षेत्रफळ तसेच दुकाने, विटमातीची घरे, विटसिमेंट, टीन शेड, झोपडी, रिकामी जागा अशा वेगवेगळया मिळकतीला कर आकारणी करण्यासंदर्भातील शासन परिपत्रकाची प्रत, सन १९९५ पासून घर करात केव्हा वाढ करण्यात आली, त्या ठरावाची व

परिपत्रकाची प्रत वगैरे स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०६.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दि. २२.०७.२००८ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार आहे. त्यांच्याकडे तयार असलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी प्रथमतः ते स्वतः व तदनंतर ग्रामपंचायतीचा शिपाई गेला असता, त्यांच्याकडून माहिती घेण्याचे अपिलार्थीने दोनही वेळा नाकारले.अपिलार्थीने माहितीची मागणी व्यक्तिशः करुनही ते त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास, त्या अर्जाच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते कधीही उपस्थित राहिले नाहीत. एवढेच नव्हे तर खुद्द जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील शिपाई अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर गेले असता, अपिलार्थीने ती माहिती घेण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्यास त्यांना, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे १५ दिवसांचे आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. हा कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय असणार नाही व तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थीस स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, कार्यालयीन दिवशी पूर्व नियोजित वेळी उपस्थित राहावे लागेल, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्यास त्यांना ती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत ती विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद वजीर सय्यद अहेमद,रा. बरकतपुरा अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, ता.अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक १२९७/२००८ व १२९८/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२९७ व १२९८

निर्णय दिनांक ११-०९-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, तालुका
किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक १२९७/२००८</u>**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, किनवट
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**<u>अपील क्रमांक १२९८/२००८</u>**

१. जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, किनवट
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**<u>अपील क्रमांक १२९७/२००८ व १२९८/२००८</u>** : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
भोकर, जिल्हा नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाव्दारे सहायक जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, किनवट क्रमांक १ व २ यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांची नांवे, पत्ते, प्रवास दैनंदिनीसाठी उचल केलेली रकमेची माहिती व गँगमनने दरवर्षी केलेल्या कामाचा अहवाल - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जांस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०३-२००८ रोजीच्या दोन साध्या पत्राव्दारे अपिलार्थीस किनवट क्रमांक १ च्या संदर्भात आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७३६ व किनवट क्रमांक २ च्या संदर्भात रु. २५६ इतके शुल्क त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०४-२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे संबंधित दोनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या पत्रांद्वारे त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित माहिती पाठवली. ही माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०६-२००८ रोजी प्राप्त झाली. यासंदर्भातील आवश्यक तो सबळ पुरावा सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या अधिका-यांनी आयोगाकडे सादर केला. तथापि माहिती प्राप्त

होऊनही अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही अपील प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे विनामूल्य पुरविल्याचे आयोगास अवगत केले व ही माहिती दिनांक १८-०६-२००८ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाल्याची पोस्टाची पावती आयोगास दाखविली. आवश्यक ती माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने परत त्याच माहितीकरिता राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर कोणतेही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १२९७/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १२९८/२००८ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, किनवट तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, किनवट तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२९९

निर्णय दिनांक ११-०९-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगा-समोर कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने याच माहितीकरिता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी व्दितीय अपील नोंदविले होते. या अपिलास आयोगातर्फे १२७६/२००८ असा क्रमांक देण्यात आला आहे व या अपिलाची सुनावणी आयोगातर्फे दिनांक ०९-०९-२००९ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश आयोगाने पारीत केले आहेत, त्यामुळे आयोगास अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर आदेश देण्याचे कोणतेही प्रयोजन आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३००

निर्णय दिनांक ११-०९-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. जयप्रकाश शिवलाल सोनी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०४-२००८ रोजी अर्ज दाखल केला असता या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखदेड यंच्याकडे दिनांक ०७-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर दिनांक १२-०६-२००८ रोजी सुनावणी घेऊनही

प्रकरण प्रलंबीत ठेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष तथा मुदखेड तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. जयप्रकाश सोनी यांना सलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानाधारक व हॉकर्स यांच्या नावाची व परवाने क्रमांकाची यादी तसेच किरकोळ परवानेधारक व हॉकर्स यांच्या स्टॉक रजिस्टर, विक्री रजिस्टर व बील बुकाची सत्यप्रत, किरकोळ रॉकेल परवानेधारक व हॉकर्स यांच्या डाय-याच्या सत्यप्रती आणि अर्धघाऊक रॉकेल विक्रेते यांना शासनाकडून देण्यात आलेले रॉकेल नियतन यांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचा कालावधी १९९५ ते दि. ३१-०३-२००८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ०५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य दिली व तदनंतर त्यांच्या दिनांक २४-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस संबंधित किरकोळ रॉकेल विक्रेते परवानेधारक यांच्याकडील माहितीच्या संदर्भात एकूण शुल्क रुपये ६७४४ इतके शासकीय कोषागारात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थपक्ष यांचे, प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य अपेक्षित असल्याचा युक्तिवाद केला. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २४-०४-२००८ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्याकडील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक ०५-०४-२००८ रोजी विनामूल्य पुरविली व तदनंतर दिनांक २४-०४-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६७४४ इतके शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते ती अपिलार्थीस सशुल्क पुरवण्यासाठी तयार आहेत.

त्रयस्थ पक्षाच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे वेगवेगळे हस्तक जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकाराखाली अर्ज करुन त्यांच्याविषयी व्यापक स्वरुपाची माहिती मागवित असतात व हे अर्ज मागे घेण्यासाठी पैशाची मागणी करत असतात. अपिलार्थीच्या प्रतिनिधींनी त्रयस्थ पक्षाच्या प्रतिनिधीचा हा युक्तिवाद अमान्य केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथमतः दिनांक ०५-०४-२००८ व तदनंतर दिनांक २४-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक २४-०४-२००८ रोजीचे पत्र अपिलार्थीस दिनांक २९-०४-२००८ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविले आहे व तसा पुरावाही आयोगाकडे सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २४-०४-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटींच्या शुल्काचा तपशील अपिलार्थीस कळविलेला आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर बरोबर कृती केली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यावरुन अपिलार्थीस विहित मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवूनही अपिलार्थीने सदरचे पत्र त्यांना मिळाले नसल्याचे कारण पुढे करुन आयोगाकडे अपील केले आहे, हे पाहता, अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीस त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच सशुल्क प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३०१

निर्णय दिनांक ११-०९-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. शिरुरे जीवन पिराजीराव
२. श्री. मुदगुरे दिगांबर लक्ष्मणराव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) यांच्याकडे रितसर अर्ज दिनांक ०६-०२-२००८ रोजी पाठवून दिला असता माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०३-२००८ रोजी

प्रथम अपील केले असता संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाच्या संदर्भात कोणताही निर्णय न देऊन प्रकरण प्रलंबीत ठेवल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३०-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष श्री. शिरुरे जीवन पिराजीराव रा. नायगांव (ब.) यांना बिलोली तहसील कार्यालयामार्फत दिनांक २२-०३-१९९५ रोजी दिलेल्या कुंभार जातीच्या प्रमाणपत्राच्या वेळी संबंधित त्रयस्थ पक्षाने हे प्रमाणपत्र मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रती व तसेच दुसरे त्रयस्थ पक्ष श्री. मुदगुरे दिगांबर लक्ष्मणराव, रा. बन्नाळी यांना दिनांक ०५-०८-१९९७ रोजी धनगर जातीचे प्रमाणपत्र देण्यात आले त्यासंदर्भात अर्जदाराच्या मूळ अर्जासोबतच्या सर्व प्रमाणपत्राच्या प्रती - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जावर जरी ३०-०१-२००८ अशी तारीख नमूद केली असली तरी अपिलार्थीने हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०२-२००८ रोजी सादर केल्याची कबुली दिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर जानेवारी २००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीचा या प्रकरणाशी संबंधित दिनांक ३०-०१-२००८ रोजीचा मूळ अर्ज व दिनांक ३०-०३-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नाही, त्यामुळे त्यांना या प्रकरणी काही माहिती नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात संबंधित प्राधिकरणाकडे त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज सादर केला होता किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीचे प्रतिनिधी आज आयोगाकडील यापूर्वीच्या अपील क्रमांक १३००/२००८ च्या संदर्भातील सुनावणीसाठी हजर होते. परंतु विचाराधीन अपिलाच्या सुनावणीसाठी ते उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील आहे. ही माहिती त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीशी संबंधित आहे आणि ती उघड केल्याने अपिलार्थी कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत हे त्यांच्या आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी नमूद केलेले नाही. तसेच आजही आयोगास ते स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे अपील अधिनियमातील कलम ८ (क) (ञ) च्या तरतुदीनुसार फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३०२

निर्णय दिनांक ११-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,<br>मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),<br>उपविभागीय कार्यालय, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०४-२००८ रोजी अर्ज दाखल केला असता त्यांना मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडून दिनांक ३१-१२-२००७ रोजी सीआर क्रमांक २४३३, २५३५, २५३६, ३६३७, २५३८, २५३९, २५४०, २५४१ व २५४२ या क्रमांकाने दिलेली मन्नेरवारलू जातीची प्रमाणपत्रे मिळण्याकरिता जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांच्याकडे संचिका दाखल केली असता हे अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्या नियमान्वये पाठविण्यात आले, तसेच त्याच्या शासकीय परिपत्रकाच्या सत्यप्रती व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या नावाने केलेल्या अर्जावर निर्णय घेण्याचा व त्यांच्या नावाने दिलेल्या अर्जाआधारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत कोणत्या नियमानुसार जातीची प्रमाणपत्रे दिली त्याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीचा हा अर्ज तहसीलदार, नांदेड यांच्याकडे दिनांक १९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला व तहसीलदार, नांदेड यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आणि या पत्राची प्रत अपिलार्थीला देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी तहसीलदार, नांदेड यांच्याकडून हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तहसीलदार, नांदेड यांनी यानंतर त्यांच्या दिनांक २३-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे यापूर्वीच दिनांक २०-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे तहसीलदार, नांदेड यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय सुनावणी न घेता दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती देऊ केली होती, तथापि ही माहिती अपिलार्थी त्यांच्याकडून घेऊन गेले नाहीत असे आयोगास अवगत केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे असेही त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्यावेळी माहितीसाठीचा अर्ज केला होता त्यावेळी उपविभागीय अधिकारी, नांदेड यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली होती, त्यामुळे या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीचा अर्ज तहसीलदार, नांदेड यांच्याकडे पाठविण्याची त्यांची कृती सर्वथा गैर होती. अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रतिसाद देणे या अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ती देय आहे. आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली असतांना देखील अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले आहे, तहसीलदार, नांदेड यांची ही कृती या प्रकरणी सर्वथा चुकीची आहे. या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी तहसीलदार, नांदेड यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे हे अधिक उचित राहिले असते. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज ज्यावेळी केला होता त्यावेळी उपविभागीय अधिकारी, नांदेड यांची जन माहिती अधिकारी म्हणून

नेमणक झाली होती त्यामुळे आता जरी जन माहिती अधिकारी बदलले असले तरीही या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी देखील आपले कर्तव्य बरोबर पार पाडले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन त्यांच्या स्तरावर जन अपिलीय अधिकारी या नात्याने निर्णय देणे अधिक उचित राहिले असते, परंतु या प्रकरणी तशी कार्यवाही न करुन त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची नोंद सचिव (महसूल) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उपविभागीय कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १२९१/०८ , १२९२/०८,१२९३/०८,१२९४/०८,१२९५/०८ व १२९६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२९१ ते १२९६
निर्णय दिनांक ११-०९-२००९

१ श्री. किरण माणिकराव यादव, :अपिलार्थी
रा.आराधवाडी, ता.तुळजापूर, जि.
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ **१. अपील क्र. १२९१/०८** :प्रतिवादी

| जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं. मानेवाडी, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद. |

**२. अपील क्र. १२९२/०८**

| जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं. शिरगापूर, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद. |

**३. अपील क्र. १२९३/०८**

| जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं. निलेगाव, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद. |

**४. अपील क्र. १२९४/०८**

| जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं. ढेकरी, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद. |

**५. अपील क्र. १२९५/०८**

| जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं. मोर्डा, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद. |

**६. अपील क्र. १२९६/०८**

| जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं. सावरगाव, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पं.स.तुळजापूर,जि.उ.बाद **प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी :** विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद. |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०८.२००८ रोजी

दाखल केलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले (क्र.१२९१/०८, १२९३/०८ व १२९६/०८), दि.३१.०७.२००८ रोजी दाखल केलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, (क्र.१२९४/०८ व १२९५/०८) व दि. २२.०८.२००८ रोजी दाखल केलेले एक द्वितीय अपील (क्र.१२९२/०८), अशी सहा द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या या सहाही द्वितीय अपील अर्जांसंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या सहा स्वतंत्र मूळ अर्जांद्वारे तुळजापूर तालुक्यातील सहा ग्राम पंचायतीकडे एकाच प्रकारची माहिती मागितली असल्याने या सहाही प्रकरणांची एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने संबंधित माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपील क्र. १२९१/०८ व १२९६/०८ च्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची आयोगास उद्देशून लिहिलेली दि.०८.०९.२००९ व १०.०९.२००९ रोजीची दोन स्वतंत्र पत्रे आयोगास सादर केली असून, या पत्रांमध्ये अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर समाधानकारक माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांची अपील क्र.१२९१/०८ व १२९६/०८ ही दोन अपिले निकाली काढण्यात यावीत, अशी अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांची आयोगाच्या विचाराधीन असलेली अपिले निकाली काढण्याची आयोगास केलेली विनंती आयोग मान्य करीत असून त्यांची ही दोन अपिले, क्र.१२९१/०८ व १२९६/०८ खारीज करण्यात येत आहेत.

अपिलार्थीची उर्वरित चार अपिले क्र.१२९२/०८,१२९३/०८,१२९४/०८ व १२९५/०८ च्या संदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शिरगापूर,ता.तुळजापूर  यांच्याकडे, दि. २१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे ग्रामसेवक,

ग्रामपंचायत, निलेगाव,ता.तुळजापूर यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००० ते २००८ या कालावधीतील व दि. २२.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे ग्रामसेवक, ग्रामपंचायत, ढेकरी,ता.तुळजापूर यांच्याकडे व दि. २५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोर्डा,ता.तुळजापूर यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये झालेल्या कामांची संख्या, फंडाचे शीर्ष, त्यातील अपूर्ण कामांची यादी, पहाणी अहवालाच्या प्रती, कामे अंदाजपत्रकाप्रमाणे झाली आहेत का?, कामाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकांची टक्केवारी, सिमेंट कॉंक्रीट कामाचे टेस्ट रिपोर्ट, चालू वर्षात चालू असलेली कामे, इस्टीमेटची रक्कम, वर्क ऑर्डरच्या नकला व ग्रामपंचायतीमध्ये माहिती अधिकाराच्या प्राप्त झालेल्या अर्जांच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मानेवाडी व सावरगाव वगळता कोणीही प्रतिसाद दिलेला नाही. तथापि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०४.०५.२००८ ते ०८.०७.२००८ या कालावधीमध्ये वेगवेगळी सहा स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली. या अपील अर्जांवर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या सहा प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दि. ११.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. या सहा प्रकरणांपैकी अपील क्र.१२९१/०८ व १२९६/०८ या प्रकरणातील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्यासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीसाठी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मानेवाडी व सावरगाव वगळता इतर कोणतेही जन माहिती अधिकारी उपस्थित नाहीत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या संदर्भातील द्वितीय अपिले वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे खारीज करण्यात आली आहेत.

उर्वरित चारही अपील प्रकरणासंदर्भात उपस्थित जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, तुळजापूर यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत. यासाठी त्यांना साधारणतः तीस दिवसांचा कालावधी पुरेसा आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.३ अंशतः, - 'सदरील कामे अंदाजपत्रकाप्रमाणे झाली आहेत काय?' ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांची मते अपेक्षित करणारी आहे, अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तथापि अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती तीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, गट विकास अधिकारी, पंचायत समिती,तुळजापूर यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या परिच्छेदात वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ अंशतः वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती उपरोक्त चारही जन माहिती अधिकारी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवतील, याची त्यांनी दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या उपरोक्त सहा अपिलांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.१२९१/०८ व १२९६/०८, दि.०५.०८.२००८ ही दोन अपिले खारीज करण्यात येत आहेत.

२. अपील क्र.१२९२/०८,१२९३/०८,१२९४/०८ व १२९५ ही चार अपिले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

३. अपील क्र.१२९२/०८,१२९३/०८,१२९४/०८ व १२९५/०८ शी संबंधित चारही जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ अंशतः वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,तुळजापूर यांनी वरील आदेश क्र.३ चे अनुपालन विहित मुदतीत होईल याची दक्षता घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव,रा.आराधवाडी,ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मानेवाडी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शिरगापूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,निलेगाव, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,ढेकरी, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,मोर्डा, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,सावरगाव, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १३०३/०८ व १३०४/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३०३ व १३०४

निर्णय दिनांक १४-०९-२००९

१ श्री. शिवदास संभाजी ढवळे, : अपिलार्थी
रा. चोंडी, पो. डोंगरगांव, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ अपील क्रमांक १३०३/०८ : प्रतिवादी
जन माहिती अधिकारी
तथा उप वनसंरक्षक, वनसंरक्षक कार्यालय, नांदेड

२ अपील क्रमांक १३०४/०८
जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,मुखेड, जि. नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी
तथा सहायक वन संरक्षक (तेंदू) , नांदेड, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.) कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**निर्णय**

**<u>अपील क्रमांक १३०३/२००८</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे उप वनसंरक्षक, नांदेड यांच्याकडे काही मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या दिनांक २६-१२-२००६, ११-०६-२००७, २८-०९-२००७ व दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही व दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या अर्जामध्ये मुखेड रेंज अंतर्गत आरा मशिनच्या चौकशीची सत्यप्रत व शासनाकडून २८,४४२ रुपये किती तारखेला प्राप्त झाले व दिनांक २६-१२-२००६ या तारखेच्या माहितीची स्वाक्षरी किती तारखेला घेतली त्याची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०७-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले व अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित कले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०८-२००८ रोजी काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधींना आयोगासमोर कोणतीही कागदपत्रे दाखविता आली नाहीत. त्यांनी फक्त त्यांच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी आदेशाची प्रत अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीस ती माहिती प्राप्त झाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०७-२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर दिनांक ०७-०८-२००८ रोजी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविली. आयोगास दाखविण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील पूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत नाही.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्देनिहाय माहिती पूर्ण स्वरुपात कशी प्राप्त होईल हे पाहण्याची जबाबदारी सहायक वनसंरक्षक (तेंदू), नांदेड यांची राहील. उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबधीत जन माहिती अधिकारी

यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस उप वनसंरक्षक, नांदेड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३०३/२००८ हे अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उप वनसंरक्षक, नांदेड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्रमांक १३०४/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने केल्याचे या अपील अर्जामध्ये म्हटले आहे. तसेच त्यांना धमकी देऊन माहिती प्राप्त झाल्याचे त्यांच्याकडून संबंधितांनी लिहून घेतले आहे असाही उल्लेख या अपील अर्जामध्ये त्यांनी केला आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक १३-०२-२००८ पर्यंत माहिती देण्याचे त्यांनी सूचित केले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १९-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २६-१२-२००६, ११-०६-२००७ व २८-०९-२००७ या अर्जासंदर्भात प्रथम अपिलात आदेश होऊन १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले असूनही त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला, असे म्हटले आहे व यानंतर परत दिनांक १९-०६-२००८ रोजी या अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २२-०७-२००८ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि तदनंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामधील माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, ही माहिती त्यांनी सहायक वनसंरक्षक (तेंदू),

नांदेड यांच्या व इतर दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत अर्जदारास व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरीत करावी. सहायक वनसंरक्षक (तेंदू), नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या कालावधीत मुद्देनिहाय संपूर्ण माहिती प्राप्त होईल, असे त्यांनी पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सहायक वन संरक्षक (तेंदू) नांदेड व दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १४-०९-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवदास संभाजी ढवळे, रा. चोंडी, पो. डोंगरगांव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.) कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (तेंदू) नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप वनसंरक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १३०५/०८ व १३०६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३०५ व १३०६

निर्णय दिनांक १४-०९-२००९

१ श्री. सुर्यकांत जी. पटणे, : अपिलार्थी
भ्रष्टाचार निर्मूलन सदस्य, नांदेड,
संगिता प्रिंटर्स, विनायक नगर, नांदेड - ४३१ ६०२

**विरुध्द**

अपील क्रमांक १३०५/०८

१ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वन संरक्षक (जंकासस), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक १३०६/०८

१ जन माहिती अधिकारी तथा वनीकरण अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, बिलोली, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०८-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या दोन मूळ अर्जाव्दारे वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी व वनीकरण अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, बिलोली यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २००६ ते दि. ३१-०१-२००८ पर्यंत झालेल्या कामाची तपशीलवार माहिती, मस्टरच्या व पेशीटच्या सत्यप्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या दोनही अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या (अपील क्र. १३०५/०८ संदर्भातील) अपील अर्जावर सहायक वनसंरक्षक (जंकास), किनवट यांनी दिनांक ०६-०५-२००८ रोजी निर्णय पारीत करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्याचे सूचित केले. उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००८ पर्यंत माहिती द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

दोनही जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नसावी, त्यामुळे त्यांनी विचारीधीन दोन स्वतंत्र अपिले वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही अपील प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. सबब दोनही जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापही त्यांना दिली नसल्यास ती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३०५/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १३०६/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड व जन माहिती अधिकारी तथा वनीकरण अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड या दोनही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही दिली नसल्यास ती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यकांत जी. पटणे, भ्रष्टाचार निर्मूलन सदस्य, नांदेड, संगिता प्रिंटर्स, विनायक नगर, नांदेड - ४३१ ६०२.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी, तालुका किनवट, जिल्हा

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (जंकाससस), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा वनीकरण अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक १३०७/२००८ व १३११/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३०७ व १३११

निर्णय दिनांक  १४-०९-२००९

१ श्री. कांबळे चतुरंग रामदास, : अपिलार्थी
(संपादक) साप्ता. किनवटचा चतुरंग,
कार्यालय, जेतवन बौध्द विहाराजवळ, सिध्दार्थनगर,
किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक १३०७/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक १३११/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), कार्यालय, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक १३०७/०८ व १३११/०८ : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सहायक वनसंरक्षक (जंकासस), कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०८-२००८ व दिनांक ०७-०६-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले अनुक्रमे क्रमांक १३०७/२००८ व १३११/२००८ ही आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने अपील क्रमांक १३०७/२००८ च्या संदर्भात दिनांक १८-०६-२००८ व अपील क्रमांक १३११/२००८ च्या संदर्भात दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या आपल्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कार्यरत कर्मचा-यांची , कामाची व त्यांच्या कार्यालयाकडून  केल्या जाणा-या लिलावाच्या संदर्भात सन १९७८ सालापासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंत अशा प्रदीर्घ काळाची व व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), किनवट यांनी दिनांक २०-०६-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी ७४ रुपये इतके शुल्क लागणार असल्याचे व या शुल्काची मागणी  त्यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे केली असल्याचे अपिलार्थीस कळविले.  वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), माहूर यांनी उप वनसंरक्षक, नांदेड यांना एक पत्र लिहून अपिलार्थीस माहिती  देण्यासाठी १९०० रुपये अनुदान लागणार असल्याचे त्यांना अवगत केले व अपिलार्थीस अनुदान प्राप्त होताच माहिती उपलब्ध केली जाईल असे आश्वासीत केले.  वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), माहूर यांच्या या पत्रावरील दिनांक अस्पष्ट आहे.  दोनही जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक वनसंरक्षक (जंकासस), किनवट यांच्याकडे दिनांक २२-०७-२००८ व दिनांक ०३-०५-२००८ अशी दोन स्वतंत्र प्रथम  अपिले

दाखल केली. अपिलार्थीच्या १३०७/ २००८ या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व अपील क्रमांक १३११/२००८ च्या संदर्भातील प्रथम अपिलावर दिनांक ३१-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), माहूर यांच्या कार्यालयातून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. तथापि संबंधितांकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १४-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, आवश्यक ते अनुदान उपलब्ध झाल्यानंतर देण्यात येईल, असे त्यांनी अपिलार्थीस आश्वासीत केले आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून विनामूल्य प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आहे, हे पाहता, संबंधित दोनही जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची राहील तसेच सहायक वनसंरक्षक, किनवट यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस या कालावधीत देतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली दोनही व्दितीय अपिले (अपील क्रमांक १३०७/२००८ व १३११/२००८) मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३०७/२००८ मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १३११/२००८ मान्य करण्यात येत आहे.

३. वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), कार्यालय, किनवट व वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), कार्यालय, माहूर या दोनही जन माहिती अधिका-यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कांबळे चतुरंग रामदास, (संपादक) साप्ता. किनवटचा चतुरंग, कार्यालय, जेतवन बौध्द विहाराजवळ, सिध्दार्थनगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकासस), कार्यालय, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक**

**१३१३/०८ व १३१४/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३१३ व १३१४
निर्णय दिनांक : १४-०९-२००९

१. श्री. शेख अनवर शेख मन्नू, : अपिलार्थी
लेबर कॉलनी, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, नांदेड

त्रयस्थ पक्ष : अपील क्र. १३१३:
स्वस्त धान्य दुकानदार श्री. व्यंकटी केरबा
अपील क्र. १३१४:
स्वस्त धान्य दुकानदार श्री. बाबूराव व्यंकटराव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची आयोगास उद्देशून लिहिलेली दि. १२.०९.२००९ रोजीची दोन पत्रे आयोगास सादर केली असून या दोनही पत्रांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांची यासंदर्भात कोणतीही तक्रार राहिलेली नाही, म्हणून त्यांनी आयोगाकडे दाखल केलेली दोनही द्वितीय अपिले क्र.१३१३/०८ व १३१४/०८ ही ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये त्यांनी आयोगास विचाराधीन अपिले रद्द करण्यात यावीत, अशी विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे त्यांनी नोंदविलेली विचाराधीन दोनही अपिले मागे घेतली असल्याने ही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३१३/०८ व १३१४/०८, दि. १६.०९.२००८ ही दोन अपिले खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शे.अनवर पिता शे. मन्नु रा.लेबर कॉलनी,घर क्रमांक ४९, ब्लॉक नंबर ४, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड,जि.नांदेड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १३०८/०८, १३०९/०८ व १३१०/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३०८, १३०९ व १३१०
निर्णय दिनांक १४-०९-२००९

१. श्री. कांबळे चतुरंग रामदास, : अपिलार्थी
रा.किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), किनवट,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक, (जंकासस),किनवट,
जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०८.२००८ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले, ती एकाच प्राधिकरणाशी संबंधित असल्यामुळे एकत्रितपणे सुनावणीसाठी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र. १३०८/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे विविध योजनांतर्गत केलेल्या विकास कामांच्याबाबत सन २००० ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण १८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. विहित मुदतीत

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर दि. ०४.०८.२००८ रोजी निर्णय देऊन वनक्षेत्रपाल, किनवट यांच्याकडून विनामूल्य माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना अद्यापपावेतो माहिती न मिळाल्याचे प्रतिपादन करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी देखील आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आठ वर्षांच्या कालावधीशी संबंधित प्रचंड व्याप्ती असलेली माहिती मागविली होती. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड विनामूल्य पोस्टाने पुरवावी.

या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर असे भाष्य करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांच्याकडून निर्णय अथवा सूचना अपेक्षित आहेत. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीसच जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले आहे. अशाप्रकारे निर्णय देण्याची त्यांची कृती चुकीची आहे. येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जी कार्यवाही करणे अभिप्रेत आहे, ती कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी त्यांच्या निर्णयामध्ये द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**अपील क्र. १३०९/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही माहिती अधिकाऱ्याने कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयास दि. १९.०२.२००६ रोजी लागलेल्या आगीसंदर्भात एकूण ९ मुद्यांद्वारे वेगवेगळया प्रकारची माहिती मागविली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.०४.०६.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.९६/- इतक्या रकमेची उपवनसंरक्षक, नांदेड यांच्याकडून मागणी केल्याचे व सदरची रक्कम त्यांना प्राप्त होताच अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर

जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी आदेश पारित करुन अनुदान उपलब्ध झाल्यानंतर वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) किनवट यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि ही माहिती, यानंतरही न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर शास्तीची कारवाई आदेशित करण्याची विनंती आयोगास केली.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २१.०६.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील एकूण ९ मुद्यांपैकी, काही मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांची मते व स्पष्टीकरणे अपेक्षिल्याचे दिसून येते. मुद्दा क्र. ४ मध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, "त्या दिवशी आग लागण्यापूर्वी सदरील कार्यालयात नेमके काय होते" - ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे देय होत नाही. मात्र मुद्दा क्र.४ शी संबंधित माहितीचा उल्लेख त्यांच्याकडे, त्यांनी आगीचा अहवाल वरिष्ठांना पाठविला असल्यास, त्यामध्ये असण्याची शक्यता आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी वरिष्ठांच्याकडे या माहितीसंदर्भात पाठविलेल्या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्यास या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस प्राप्त होऊ शकेल. उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विभागीय कार्यालयास कळविले आहे. यावरुन अपिलार्थीस अभिप्रेत असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे अनुमान आयोग काढत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

**अपील क्र. १३१०/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१७.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सागी वृक्ष कटाईसंदर्भात मार्च, ८८ ते मार्च, २००८ या कालावधीशी संबंधित, एकूण १२ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ९,१०४/-इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व त्याचबरोबर या पत्राची प्रत उपवनसंरक्षक, नांदेड यांना देऊन रु.९,१०४/- इतके अनुदान त्यांच्या कार्यालयास देण्याची मागणी केली. तथापि अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०६.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस वनक्षेत्रपाल किनवट यांच्या कार्यालयातून अनुदान उपलब्ध झाल्यानंतर विनामूल्य माहिती घेण्याचे सूचित केले. परंतु या

आदेशानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास वेळोवेळी कार्यालयीन खर्चाबाबत अनुदान प्राप्त होऊनही अनुदान उपलब्ध नाही, असा बहाणा करुन संबंधित माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्याचे टाळत आहेत. तसेच मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी विशेष प्रयत्न करुन अपिलार्थीस माहिती देण्याकरिता आवश्यक असणारे अनुदान त्यांच्या वरिष्ठांकडून प्राप्त करुन घ्यावे व कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या उपरोक्त तीनही अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. १३०८/०८, १३०९/०८ व १३१०/०८ ही तीनही अपिले मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १३०८/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

३. अपील क्र. १३०९/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

४. अपील क्र. १३१०/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कांबळे चतुरंग रामदास, संपादक साप्ताहिक किनवटचा चतुरंग कार्यालय, जेतवन बौध्द विहाराजवळ, किनवट, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकासस),किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३१२
निर्णय दिनांक १४-०९-२००९

१. श्री. कांबळे चतुरंग रामदास, : अपिलार्थी
रा.किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ,
किनवट, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक व्यवस्थापक,
जाखाका व वनीकरण प्रदेश,नागपूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस उशिरा, अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली व त्याचे समर्थन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी करुन या प्रकरणी सुनावणी घेण्याचे टाळले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०४.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित कार्यरत कर्मचारी, कार्यक्षेत्रातील व त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या जाणाऱ्या लिलावाची सन १९७८ सालापासून दि.०४.०४.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती

अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०३.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस दि.२२.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पूर्णपणे माहिती दिली असल्याचे नमूद करुन अपिलार्थीस अतिरिक्त माहिती हवी असल्यास वेगळ्याने अर्ज सादर करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे वकील उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री.आर.बी.मुळे यांनी सुनावणीसाठी एक महिन्याच्या पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी देणे आयोगास गरजेचे वाटते. या मुद्यावर अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असून त्यांना सुनावणीसाठी नागपूर येथे जाणे परवडणारे  नाही. सबब जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, जाखाका व वनीकरण प्रदेश, नागपूर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन पंचेचाळीस दिवसांच्या आत किनवट, जिल्हा नांदेड येथे सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, जाखाका व वनीकरण प्रदेश, नागपूर यांनी अपिलार्थीच्या दि.०६.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, किनवट जि. नांदेड येथे हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कांबळे चतुरंग रामदास,रा.सिध्दार्थनगर,किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, जाखाका व वनीकरण प्रदेश, एफ.डी.सी.एम.लि.रॉवेल प्लाझा, प्लॉट नं.१२,कडबी चौक, कामठी रोड, नागपूर - ४४०००४ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.     निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १३४४/२००८ व १३४५/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४४ व १३४५

निर्णय दिनांक १५-०९-२००९

१ सौ. जिनत राजमोहम्मद शेख, : अपिलार्थी

घर नंबर बी-१३, जिल्हा परिषद क्वॉर्टर, पानचक्की रोड,

घाटी दवाखाना गेट समोर, औरंगाबाद

**विरुध्द**

अपील क्रमांक १३४४/२००८

१ जन माहिती अधिकारी

तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, ठाणे,

जिल्हा ठाणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,

प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, ठाणे,

जिल्हा ठाणे

अपील क्रमांक १३४५/२००८

१ जन माहिती अधिकारी

तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जळगांव,

जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जळगांव,

जिल्हा जळगांव

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०८-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०१-०१-१९८६ पासून माहिती देण्याऐवजी त्यांना ०१ जून २००७ पासूनची माहिती उपलब्ध असल्याचे कळविले आहे. त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव यांच्या संदर्भात केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२००८ रोजी त्यांच्या प्रथम अपिलावर एकतर्फी निर्णय घेऊन त्यांचे अपील निकाली काढले व त्यांना फक्त त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती प्राप्त झाली असून ती माहिती साक्षांकीत नाही, त्यामुळे उर्वरित माहिती प्राप्त होण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, विचाराधीन दोनही प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामधील मोटार वाहन निरीक्षक व मोटार वाहन उप निरीक्षक यांच्या आस्थापनाविषयक बाबीसंदर्भात दिनांक ०१-०१-१९८६ ते ३१-०३-२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण नऊ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज ठाणे येथील कार्यालयास दिनांक २१-०५-२००८ रोजी प्राप्त झाला तथापि तो जळगांव येथील कार्यालयाकडे कधी प्राप्त झाला हे आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या या अर्जास ठाणे कार्यालयाने दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व जळगांव येथील कार्यालयाने दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संकलीत करण्याचे काम चालू असून एक महिन्याच्या आत त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात येईल व त्यानुसार माहितीपोटीचे शुल्क कळविण्यात येईल असे अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादांनी समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. याबाबत अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांनी दिनांक २५-०९-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०२-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस काही माहिती दिली. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले होते.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक १३४४/२००८ शी संबंधित अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. अपील क्रमांक १३४५/२००८ शी संबंधित अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी ही माहिती मुंबई येथील परिवहन कार्यालयातून मागितली असता, आयुक्त कार्यालयातून

त्यांना ही माहिती प्राप्त झाली होती. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपेक्षित माहिती अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी १९८६ पासून माहिती मागितली असता २००७ ची माहिती ठाणे कार्यालयातून देण्यात आली व त्यांना देण्यात आलेली माहिती ही अपूर्ण आहे. जळगांव येथील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ वगळता इतर कोणत्याही मुद्दावर माहिती देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी, ठाणे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक ०२-०३-२००९ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती त्यांनी पोस्टाने पाठविली.

जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव हे अपिलार्थीच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे दोनही जन माहिती अधिका-याकडे मागणी केलेल्या माहितीमधील मुद्दा क्रमांक ५ मधील "...... तेथे मोटार वाहन उपनिरीक्षक यांना का पाठविण्यात येत नाही " हा भाग वगळता उर्वरित माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस देणे भाग आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला मूळ अर्ज व अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, ठाणे येथील कार्यालयाने अपिलार्थीस २००४ पासूनची माहिती देण्याचा प्रयत्न केला. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातर्फे सीमा तपासणी नाक्यावर नेमणूक करतांना त्यांच्याकडे एक रजिस्टर ठेवले जाते. याकरिता वेगळे स्वतंत्र असे कार्यालयीन आदेश निर्गमित केले जात नाहीत व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही २३ वर्षापुर्वीची असल्यामुळे आज त्यांच्या कार्यालयातील

होणा-या पत्रव्यवहाराची व्याप्ती पाहता अपिलार्थीस १९८६ पासूनची माहिती देणे त्यांना शक्य होणार नाही. मात्र त्यांच्याकडील २००४ पासूनची माहिती त्यांनी अपिलार्थीस कळविली आहे. मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस आज आयोगाच्या उपस्थितीत हस्तांतरीत केल्या. जन माहिती अधिकारी, ठाणे यांनी अपिलार्थीस माहिती देतांना त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भात माहिती देतांना, अपिलार्थीस मोटार वाहन कायदा, केंद्रीय मोटार वाहन नियम, कर कायदा आणि नियम, प्रवासी कर कायदा आणि नियम इत्यादी कायद्यांचा संदर्भ देऊन अपिलार्थीस कथित माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात ही माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस अवगत केले. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांना अशा प्रकारे वेगवेगळ्या कायद्याच्या संदर्भात, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भातील तरतुदीच्या झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविणे गरजेचे आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ व्दारे मोटार वाहन निरीक्षक यांना सीमा तपासणी नाका येथे पाठविण्यासाठी प्राप्त झालेल्या शिफारस पत्रांच्या प्रती मागितल्या आहेत. परंतु या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध नाही असे उत्तर दिले आहे. जन माहिती अधिकारी यांचे हे उत्तर बरोबर नाही. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची त्यांच्या कार्यालयास कोणतीही पत्रे प्राप्त झाली नाहीत असे आयोगास अवगत केले. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अशा प्रकारची माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक ५, ८ व ९ च्या संदर्भात, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस एक महिन्याच्या आत माहिती देण्याचे आश्वासित केले होते. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ वगळता त्यांना उर्वरित कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीत न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब परिवहन आयुक्त, मुंबई यांना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यालय, जळगांव या कार्यालयाचे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक १३४४/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १३४५/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ८ व ९ मध्ये संदर्भित केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

५. परिवहन आयुक्त, मुंबई यांना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यालय, जळगांव या कार्यालयाचे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. जिनत राजमोहम्मद शेख, घर नंबर बी-१३, जिल्हा परिषद क्वॉर्टर, पानचक्की रोड, घाटी दवाखाना गेट समोर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, ठाणे, जिल्हा ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, ठाणे, जिल्हा ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन

अधिकारी कार्यालय, जळगांव, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जळगांव, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला, डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४६

निर्णय दिनांक १५-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजय रामदास मोटे,<br>प्लॉट क्रमांक १२, पृथ्वी पार्क, वजन काट्याच्या मागे,<br>पडेगांव, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या अर्जावरील अपेक्षित कार्यवाहीची सद्यस्थिती व तसेच या प्रकरणात शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, सामान्य प्रशासन

विभाग, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या छायांकीत प्रती ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज विहित नमुन्यात केला नसल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०९-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांना स्वीपर या चतुर्थ श्रेणी पदावर नेमणूक देण्यासंदर्भात कार्यकारी अभियंता यांच्याकडे विनंती अर्ज केला होता. अपिलार्थीच्या सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीची त्यांच्याकडील दिनांक २२-०७-२००९ रोजीच्या आदेशाव्दारे औरंगाबाद येथे स्वीपर या पदावर नेमणूक केली आहे, त्यामुळे अपिलार्थीच्या विनंती अर्जावर केलेली कार्यवाही अपिलार्थीस अवगत झाली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीची नेमणुकीची विनंती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०७-२००९ रोजी मान्य केलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भित दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या अर्जाच्या

सद्यस्थिती विषयी माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन आता उरलेले नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजय रामदास मोटे, प्लॉट क्रमांक १२, पृथ्वी पार्क, वजन काट्याच्या मागे, पडेगांव, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४७

निर्णय दिनांक १५-०९-२००९

१ श्री. जेठेवाड राजेश्वर नागोजी, : अपिलार्थी
मु. पो. बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी नोंदविलेले व दि. १८.०८.२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २९-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुनही त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही. परंतु त्यांच्याकडील दिनांक १६-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांचा अपील अर्ज

निकाली काढल्याचे त्यांना कळविण्यात आले. या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती न देणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही होऊन अपिलार्थीस न्याय मिळण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत बरबडा, तालुका नायगांव (खै.) येथील नवीन नावांची नोंद केलेल्या नोंदबुकमधील ३६९ या क्रमांकाच्या कागदपत्राच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अनुक्रमांक ३६९ ची प्रमाणित प्रत, ही नोंद कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे केली त्या दस्तऐवजाची प्रमाणित प्रत, जयराम पांडुरंग बिचेवाड व जेटेवाड आनंदा माणिक यांना अनुक्रमांक ३६९ च्या घरात वैयक्तीक मीटर बसविण्यास ग्रामपंचायतीने दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची प्रत व नवीन नावे नोंदविण्याकरिता ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे केला होता. तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव हे अपिलीय अधिकारी असल्याचे कळविले व अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली

काढला.  जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आयोगाने विचारलेल्या कोणत्याही प्रश्नांना या दोनही अधिका-यांना कोणतीही उत्तरे देता आली नाहीत अथवा यासंदर्भात अपिलार्थीस माहिती दिल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांना आयोगास दाखविता आला नाही.  यावरुन अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या-कडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.  या संपूर्ण घटनाक्रमाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व तसेच यासंदर्भात त्यांनी अपिलीय अधिका-याकडे केलेल्या अपील अर्जावर कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला गेलेला नाही.  या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे जबाबदार असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे.  सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.  तसेच या प्रकरणाशी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची त्यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जेठेवाड राजेश्वर नागोजी, मु. पो. बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४८

निर्णय दिनांक १५-०९-२००९

१ श्री. साहेबराव देवराव पोटभरे, : अपिलार्थी
रा. जंम्बोदिप निवास, नवीन भाटवडगांव मांजरथ रोड,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पोलीस उपअधीक्षक, पोलीस मुख्यालय, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्यावर झालेल्या कथित अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने सदर अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे " आपल्या माजलगाव पोलीस ठाण्याचे पी. आय. श्री. शेजूळ साहेबांनी माझ्यावर केलेल्या अन्यायाची चौकशी करुण योगे न्याय देणेबाबत " या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००५ ते १६-०४-२००८ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

" माजलगांव पोलीस ठाण्याचे पी. आय. शेजूळ साहेब यांनी सोबत पुरावे न जोडता दिशाभूल करनारा खोटा व बनावटी व बोगस अव्हाल देऊण उपविभागीय पोलीस आधीकारी माजलगांव व साहेबराव पोटभरे बिराड थाटो आंदोलण कर्ते यांची आज पर्यत केलेली दिशाभुल-बाबत. सोबत नऊ मुद्दयांची चिरफाड केलेली आहे. "

अपिलार्थीने हा अर्ज पोलीस उप अधीक्षक, बीड यांना उद्देशून केला होता. सदर अर्ज दिनांक ०६-०५-२००८ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या अर्जास दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दिनांक ३१-०५-२००८ रोजी पुरविली असून केवळ पोलीस कार्यालयाला त्रास देण्याच्या उद्देशाने अपिलार्थी हे अशा प्रकारची माहिती वारंवार मागत असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चित कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीच्या बि-हाड थाटो आंदोलनाच्या संबंधाने वेळोवेळी केलेली कार्यवाही अपिलार्थीस दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस त्यांच्या वैयक्तीक गा-हाण्याचा निपटारा करुन घेण्यासाठी दुसरे सक्षम प्राधिकरण अस्तित्वात आहे. अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे व निर्णयाबद्दलचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी अशा प्रकारची माहिती अपेक्षित आहे, अशा प्रकारची माहिती, ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदींच्या व्याप्तीबाहेरची असल्याने, ती माहिती अधिकार अधिनियमाशी सुसंगत नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस संदर्भीय प्रकरणाशी संबंधीत सर्व कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या आहेत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. साहेबराव देवराव पोटभरे, रा. जंम्बोदिप निवास, नवीन भाटवडगांव मांजरथ रोड, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४९

निर्णय दिनांक १५-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी,<br>मु. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर,<br>जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या-कडे अपील केले असता, त्यांनी समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना पाठीशी घातले व अपिलार्थीस दिशाभूल करणारी उत्तरे दिली, त्यामुळे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शास्तीची कार्यवाही करण्यात

यावी व या प्रकरणी त्यांना झालेला खर्च जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून वसूल करुन देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित मार्च २००७ ते मार्च २००८ या कालावधीशी संबंधित एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जिल्हा परिषदेला दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत किती बजेट आले, या योजने अंतर्गत पाच लाखाचे बजेट देणे अनिवार्य असतांना ५ लाखापेक्षा अधिक बजेट कोणत्या नियमाने, कोणत्या आदेशाने देण्यात आले आहे व लातूर जिल्ह्यातील सध्या चालू असलेली कामे व अपूर्ण कामे यांची यादी - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील आदेशानंतर दिनांक २९-०८-२००८ रोजी संपूर्ण माहिती नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे व या संदर्भातील आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगास सादर केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली होती, तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्याप हा खुलासा अप्राप्त आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ही माहिती अपिलार्थीस दिनांक ११-०६-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत होते. मात्र या प्रकरणात अपिलार्थीस विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०८-२००८ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या या माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही अभिप्राय नाहीत. अपिलार्थी हे आज रोजी सुनावणीसाठी गैरहजर आहेत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असावे, असे अनुमान काढण्यास हरकत नसावी, त्यामुळे त्यांना माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे येथे दृष्टोत्पत्तीस येत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. वाघमारे, सध्या विशेष समाजकल्याण अधिकारी, यवतमाळ या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. वाघमारे, सध्या विशेष समाजकल्याण अधिकारी, यवतमाळ या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर/यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७१
निर्णय दिनांक १५-०९-२००९

१. श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, बीड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करावी आणि त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्याकडील मोजणी नोटीस दि.१२.०१.२००४ क्रमांक मोर नं.५२/अ.ता.०३ मधील श्री. नानाभाऊ तात्याबा बागलाने, श्री. सिताराम तात्याबा बागलाने, श्री.

सखाराम तात्याबा बागलाने, श्री. प्रकाश साहेबराव पिंगळे यांच्या जमिनीच्या संदर्भात काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे टपालाद्वारे मागितली होती. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती अधिकाऱ्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी आयोगासमोर सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाच्या दिनांकापर्यंत कोणतीही माहिती पुरविली नव्हती. जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०५.२००८ रोजी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि हा कालावधी व्यपगत होऊन देखील अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली गेली नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जानंतर अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती अद्यापपर्यंत दिली नसल्यास ती त्यांनी त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तर कोणतीही माहिती दिली नाही. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०५.२००८ रोजी आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना (यापूर्वी माहिती दिली नसल्यास), हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कचरुलाल बस्तीमल जैन,रा. शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १३५०/०८ व १३५१/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५० व १३५१
निर्णय दिनांक १५-०९-२००९

१. श्री. श्रीकांत सुधाकर डहाळे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.म.,सिल्लोड,
जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी,
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.म.,कन्नड,
जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००८ रोजी नोंदणी झालेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र.१३५०/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल तसेच त्यांना अपूर्ण,खोटी माहिती देऊन त्यांचा अर्ज निकाली काढल्याने, त्यांनी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज

केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अंतिमतः या प्रकरणाशी संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई अथवा दंड लावण्याचे आयोगाने आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - अपिलार्थीच्या दि. १५.०६.९५, २५.०८.९५,१०.०६.९५,०५.०८.९६ व ११.०९.९७ च्या अर्जांच्या नकला व या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही - अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्याच दिवशी दि.२५.०२.२००८ रोजी अपिलार्थीस सदरील अर्ज त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत व त्या अर्जावरील केलेली कार्यवाही त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महावितरण कार्यालय,कन्नड यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या मालकीच्या अकृषिक जमिनीवर नगररचनाकार, औरंगाबाद यांनी १९८६ मध्ये लेआऊट मंजूर केला होता. यानंतर १९९५ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळाकडून त्यांच्या मालकीच्या क्षेत्रामध्ये नवीन लाईन टाकण्याचे काम त्यांना आढळले. तेव्हापासून या प्रकाराबद्दल विद्युत

विभागाकडे त्यांनी वेळोवेळी तक्रारी नोंदविल्या आहेत. मंडळाच्या अध्यक्षांपर्यंत त्यांनी नोटीसा दिल्या होत्या, परंतु त्यांच्या एकाही अर्जावर संबंधित विभागाकडून कोणतेही उत्तर दिले गेले नाही व प्रत्येक वेळी त्यांना तोंडी, "चौकशी चालू आहे","बघतो","करतो" अशा अर्थाची मोघम उत्तरे दिली गेली. या प्रकरणी देखील अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होताच त्यांच्या लघुलेखकास बोलावून घेऊन "माहिती उपलब्ध नाही", असे तात्काळ उत्तर अपिलार्थीस दिले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेण्यासाठी त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून असा नकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने अपिलार्थीने  कार्यकारी अभियंता, यांच्याकडे प्रथम अपील केले होते तथापि त्यांनीही त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी, ते या पदावर नुकतेच बदलून आल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही,१२ ते १३ वर्षांपूर्वीची जुनी होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध न घेता अपिलार्थीने अर्ज केल्याच्या दिवशीच उत्तर दिले, या अपिलार्थीच्या आक्षेपामध्ये आयोगास तथ्यांश आढळत आहे. अपिलार्थीने प्रकरणासंदर्भात वेळोवेळी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळाकडे तक्रार अर्ज केले आहेत. तथापि त्या अर्जांवर विद्युत मंडळाने कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीवर अन्याय केला, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या आरोपात तथ्यांश आढळून येत आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जातील त्यांच्या संदर्भित तक्रार अर्जांवर चौकशी करुन अपिलार्थीच्या अर्जांच्यासंदर्भात संबंधितांनी वेळेत कार्यवाही का केली नाही अथवा अपिलार्थीस या संदर्भात वेळेत का कळविले गेले नाही, याचा तपास करुन घेऊन संबंधित दोषी अधिकाऱ्यावर,

आवश्यकतेप्रमाणे, नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २८.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधित कार्यकारी अभियंता यांनी कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची त्यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहितीसंदर्भात गतकालीन अर्जाविषयीची कोणतीही नक्कल त्यांना कार्यालयात उपलब्ध नाही, असे कळविले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अर्जांच्या प्रतींचे जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाल्याने त्या जर नष्ट केल्या असतील तर तसा पुरावा त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावा अन्यथा अपिलार्थीच्या विचाराधीन अर्जासंदर्भातील माहितीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर आहे त्या कर्मचाऱ्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य कारवाई करण्यात यावी व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अर्जातील त्यांच्या संदर्भित तक्रार अर्जांवर चौकशी करुन अपिलार्थीच्या अर्जांच्यासंदर्भात संबंधितांनी वेळेत कार्यवाही का केली नाही अथवा अपिलार्थीस त्यांच्या तक्रारी अर्जांवर

वेळेत का कळविले गेले नाही याचा तपास करुन घेऊन संबंधित दोषी अधिकाऱ्यावर आवश्यकतेप्रमाणे नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती ३० दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**<u>अपील क्र.१३५१/०८:</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व अपूर्ण माहिती देऊन त्यांना आवश्यक त्या माहितीपासून वंचित ठेवले व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने संबंधित अधिकाऱ्यावर शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिल्लोड येथील स.नं. १४/४ (समतानगर) मधील उच्च दाब लाईन हलवण्यासंदर्भातील, दि. ०१.०१.२००६ ते ०१.१२.२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - समतानगरमधील उच्च दाब लाईन हलविण्याबाबत संपूर्ण कागदपत्रांची नक्कल, जन माहिती अधिकारी यांनी या कामासाठी प्लॉट/जमीन मालकाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र, खर्चाचे अंदाजपत्रक, खर्च कोणी भरला त्यांचे नाव, पत्ता व चलनाची दिनांक, लाईन हलविणेबाबतची नियमावली - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१०.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ६८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा दि.

२५.०३.२००८ रोजी भरणा केल्यानंतर त्याच दिवशी अपिलार्थीस चार पृष्ठांची माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाद्वारे मांडलेल्या मुद्यांशी सुसंगत असा युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.०३.२००८ रोजी दिलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी पूर्णपणे सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात खर्चाचे अंदाजपत्रक, खर्च कोणी भरला त्याचे नाव,पत्ता व दिनांक, ही माहिती मागितली होती. तथापि या मुद्यावर माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही लाईन हलविण्यापोटी त्यांनी केलेल्या अंदाजपत्रकाची प्रत पुरविली. तथापि हा खर्च कोणी केला त्यांची नावे व पत्ते व इतर तपशील असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले आहे की, उच्च दाब लाईनच्या नियमित देखभाल-दुरुस्तीसाठी त्यांच्याकडे वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या निधीतून त्यांनी ही लाईन हलविली असून लाईन हलविण्यापोटी लागलेला खर्च त्यांनी स्वतःकडील या निधीतून केला आहे. तसेच ही लाईन हलविण्यासंदर्भात नगर परिषद कार्यालय, सिल्लोड यांच्याकडील त्यांच्या अशाप्रकारच्या दि.१९.०४.२००४ च्या विनंती वजा पत्राची त्यांना प्राप्त झालेली प्रत देखील त्यांनी अपिलार्थीस दिलेली

आहे. आयोगास असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादाप्रमाणे त्यांना अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात ही माहिती देणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशी माहिती अपिलार्थीस दि. २५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिली नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत उच्च दाब लाईन हलविण्याच्या कार्यवाहीत कोणकोणत्या प्रक्रिया अभिप्रेत आहेत, याची माहिती अपेक्षित होती. अपिलार्थीस या मुद्यावर माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी फक्त "मुद्दा क्र. १ च्या मंजूर आदेशाच्या अधीन राहून"अशी चुकीची माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. वास्तविक पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व मुद्दा क्र. १ चा कोणत्याही प्रकारे एकमेकांशी संबंध नाही. मुद्दा क्र. १ द्वारे अपिलार्थीने विशिष्ट स्वरुपाची माहिती मागितली आहे. तर मुद्दा क्र.४ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या लाईन हलविण्याच्या कार्यपध्दतीबाबत माहिती मागविली आहे. आज रोजी ही कार्यपध्दती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केली. तथापि ही माहिती लेखी स्वरुपात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात देणे आवश्यक आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील वर स्पष्ट केलेली उर्वरित माहिती व मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १०.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपूर्ण व चुकीची माहिती दिल्याचे वरीलप्रमाणे स्पष्ट होत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु. ६८/- इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब सदर शुल्क त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण व चुकीची माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक

कारवाई करण्याची शिफारस व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,मर्यादित, मुंबई यांना करण्यात येत आहे. तसेच त्यांना या प्रकरणी, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता दर्शविलेल्या त्यांच्या निष्क्रीय कार्यपद्धतीची नोंद यथायोग्यरित्या घेण्याचेही सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ मधील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित व मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ६८/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीकांत सुधाकर डहाळे,रा.७, रचनाकार कॉलनी, स्टेशनरोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.म., सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.म., कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगढ, बांद्रा (पूर्व), मुंबई -५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५२
निर्णय दिनांक १५-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मो. शहाबुद्दीन मो. अफजलुद्दीन,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक कार्यालय),<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),<br>औरंगाबाद. | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय वन अधिकारी (मुख्यालय व नियोजन),
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०८.२००८ रोजी नोंदविलेले केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन प्रकरणात समाधानकारक कारवाई न करण्यात आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या विशेष वेतन अदा करण्यासाठी दि. १७.०८.९५ ते

१६.०८.२००८ पर्यंत झालेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रतींची त्यांना आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"अतिरिक्त कार्यभार (मुख्य लिपीक औरंगाबाद वन विभाग) सांभाळल्याबद्दल विशेष वेतन मंजूर करणे. दि. १४-१२-१९९४ ते दि. ३१/०७/९५ या (७ महिने,१६ दिवस) कालावधीचे अतिरीक्त कार्यभारचे विशेष वेतन मंजूर करणे दि. १४-१२-१९९४ ते दि.३१/०७/९५ या कालावधीत मु.लि.पदाचा अतिरीक्त कार्यभारचा विशेष वेतन मंजूर करुन मिळणे. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत बसत नाही, त्यामुळे त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०९.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित वस्तुस्थिती अवगत करुन दिली. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांच्याकडे आता उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे त्या अपिलार्थीस पुरविता येणार नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपर्यंत वन विभागाकडून त्यांनी दि. १४.१२.९४ ते दि.३१.०७.९५ या कालावधीमध्ये धारण केलेल्या अतिरिक्त कार्यभाराचे विशेष वेतन, प्राप्त झालेले नाही, ते अदा करण्याचे राज्य माहिती आयोगाने आदेशित करावे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका त्यांच्याकडे उपलब्ध नाही व यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०२.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये या संचिकेचा शोध घेण्याचे काम सुरु असल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे. मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन) प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांनी त्यांच्याकडील मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले पत्र दि. ०१.०९.२००८ अन्वये अपिलार्थीच्या प्रकरणात झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांच्या कार्यालयास पुरविण्याबाबत कळविले आहे. परंतु अद्यापपावेतो या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांच्याकडे संबंधिताकडून प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येणार नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात कोणती "माहिती" अपेक्षित आहे, याचा त्यांच्या प्रथम अर्जावरुन बोध होत नाही. मात्र अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन त्यांना, त्यांनी शासकीय सेवेत कार्यरत असताना, त्यांनी धारण केलेल्या अतिरिक्त पदभाराचे विशेष वेतन जन माहिती अधिकारी यांच्याकडून मंजूर करुन हवे असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मागविली नसून, अशाप्रकारे अर्ज करुन अपिलार्थी हे अतिरिक्त पदभाराचे विशेष वेतनाचे

गाऱ्हाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून सोडवून घेऊ पाहत आहेत, असे आढळून येत आहे. अर्थात माहिती अधिकार अधिनियमामध्ये अशाप्रकारच्या वैयक्तिक निवेदनाचा विचार करणे अभिप्रेत नसल्याने अशाप्रकारच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.०६.२००८ रोजी दिलेले उत्तर बरोबर आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर आपल्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहाराची प्रत मागितली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करताना वाढीव व्याप्तीची माहिती मागणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही.याकरिता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे दुसरा स्वतंत्र अर्ज करावा लागेल. यासंदर्भात अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल दि. २६.०७.२००८ रोजी समर्पक उत्तर दिले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना अपेक्षित असलेली कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्याकडून होण्यासाठी अपिलार्थीस आता वन खात्याकडेच वेळोवेळी पाठपुरावा करावा लागेल. त्यांनी आयोगास केलेली विनंती ही पूर्णतया प्रशासकीय स्वरुपाची आहे, अशा प्रकारची कार्यवाही आयोगाच्या कार्यकक्षेच्या बाहेरची असल्याने, ती आयोगाकडून केली जात नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. शहाबुद्दीन मो. अफजलुद्दीन,सेवानिवृत्त मुख्यलेखापाल,घर नं.५-५-२, कोकणवाडी, काली मस्जीद, स्टेशनरोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (मुख्यालय व नियोजन), मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५३
निर्णय दिनांक १५-०९-२००९

१. श्री. जितेंद्र रघुनाथ भालेराव, : अपिलार्थी
रा.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,पुरवठा विभाग,गंगापूर,
जि.औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद

विद्यमान जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, गंगापूर,जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, गंगापूर,जि.औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : स्वस्त धान्य दुकान क्र.१२७
मौ. रामपूरीवडगावचे मालक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी नोंदविलेले केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), ता.गंगापूर, श्री. साहेबराव पांडुरंग थोरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिलार्थीचे तहसीलदार, गंगापूर यांना उद्देशून लिहिलेले दि. ०७.०९.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना त्रयस्थ पक्ष तथा स्वस्त धान्य दुकान क्र.१२७ मौ. रामपूरी वडगावचे मालक यांनी आवश्यक ती माहिती परस्पर पुरविली असल्यामुळे त्यांनी केलेले तक्रारी अपील ते परत घेत असल्याचे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने तहसीलदार,गंगापूर यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३५३/०८, दि. ११.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जितेंद्र रघुनाथ भालेराव,रा.समतानगर,गंगापूर,जि.औरंगाबाद

२. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. विद्यमान जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५४
निर्णय दिनांक १५-०९-२००९

१. श्री. रणखांब वसंत पांडुरंग, : अपिलार्थी
रा. मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुरुम, ता.उमरगा,
जि. उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १८ च्या पोटकलम १ व २ नुसार चौकशी करण्याची त्यांची विनंती अमान्य केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुरुम नगर परिषदेने १९९९-२००० मध्ये एकूण ६९० शौचालयाचे बांधकाम केले होते. त्यासंदर्भात सदर बांधकाम कोणत्या सेवाभावी संस्थेकडून करुन घेण्यात आले होते व

अनुदानित नागरिकाकडून दरवर्षी रु.२५०/- टॅक्स आकारण्यात आला काय? ही माहिती व्यक्तिश: मागितली होती. अपिलार्थीने व्यक्तिश: माहितीची मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले किंवा कसे हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र यासंदर्भात माहिती अधिकाऱ्याने माहिती नाकारली या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमाद्वारे कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ०८.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०९.०५.२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली. ही माहिती अपिलार्थीस दि. १०.०५.२००८ रोजी प्राप्त झाली. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १८ च्या तरतुदीनुसार या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी केलेली विनंती जन अपिलीय अधिकारी यांनी अमान्य केल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.०५.२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: माहितीची मागणी करुनही ते स्वत: जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा उपस्थित झाले, याचा कोणताही पुरावा त्यांनी

आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत दिलेला नाही. तसेच या प्रकरणी त्यांना अधिनियमातील कलम १८(१) व (२) प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीची आवश्यकता का वाटते, हे आयोगास स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. मूळात अधिनियमातील कलम १८ प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीचे अधिकार हे राज्य माहिती आयोगाला दिलेले आहेत, जन अपिलीय अधिकारी यांना नाहीत व तसे स्पष्टीकरण जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.०८.०५.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये दिलेले आहे. याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेल्या प्रकरणामध्ये चौकशी करण्यासाठी वाजवी कारणे असल्याचे आयोगास सकृतदर्शनी आढळून येत नाहीत व तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १०.०५.२००८ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रणखांब वसंत पांडुरंग,रा. शास्त्रीनगर,मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, मुरुम, ता.उमरगा,जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५५

निर्णय दिनांक १६-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. साळूंके कैलास प्रभाकरराव,<br>मु. पो. गोलटगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांच्या प्रथम अपिलावरही संबंधित अपिलीय अधिका-याने प्रतिसाद न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे १२-०२-२००८ ते १५-०३-२००८ या कालावधीशी संबधित त्यांच्या कार्यालयातील " मोटार सायकल परवाना " या विषयावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मोटार सायकलचा परवानाबाबत व दि. १२/०२/२००८ रोजी मोटार परिक्षा दिली असुन आजपर्यंत लायसन (परवाना) न दिल्याबाबत." अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही माहिती अथवा निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस निश्चितपणे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती हवी आहे याची आयोगाने विचारणा केली असता अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक १२-०२-२००८ रोजी मोटार सायकलच्या परवान्या करिता प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक ती फीस भरुन परवान्याकरिता लागणारी चाचणी परीक्षा देखील दिली होती. तथापि त्यांना अद्याप पावेतो मोटार सायकलचे लायसन्स संबंधितांकडून प्राप्त झाले नाही. या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता ते प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता त्यांना टोलवाटोलवीची उत्तरे देण्यात आली व त्यांच्या परवान्याबाबत निश्चितपणे काय कारवाई केली गेली हे त्यांना कोणीही कळविले नाही. तसेच या परवान्यासंदर्भात प्रादेशिक परिवहन अधिका-याने संबंधित अधिका-याला अपिलार्थीस एका दिवसाच्या आत परवाना देण्याची सूचना दिली असतांना देखील त्या अधिका-यांने

अपिलार्थीस " तुला आता दोन वर्षे लायसन्स मिळणार नाही याची व्यवस्था मी करतो " अशी धमकी दिली. त्यामुळे व त्यांना परवाना प्राप्त होण्याकरिता विचाराधीन अपील त्यांनी आयोगाकडे सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात अपिलार्थीचा माहितीसाठी-चा अर्ज सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. जायभाये यांनी त्यांच्याकडे न पाठविल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक १५-०५-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला असल्याचे आयोगास अवगत केले. तथापि आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज प्रादेशिक परिवहन कार्यालयास अनुक्रमे दिनांक १२-०३-२००८ व १५-०५-२००८ रोजी केलेला असून सदर अर्ज प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामध्ये प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाने अपिलार्थीस पोचसही दिली आहे. यावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज हा जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्याबाबत व त्यावर आवश्यक ती कारवाई करण्याबाबत पुरेशा गांभीर्याने कारवाई केली जात नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्ज गहाळ करणा-या संबधित कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही विशिष्ट कागदपत्रांची अथवा अभिलेख्याची मागणी केली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस या माहितीव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून लिखित स्वरुपातील अथवा अन्य इतर स्वरुपातील कोणती माहिती हवी आहे हे स्पष्ट होत नाही. अपिलार्थीने आज रोजी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडून मोटारसायकलचा परवाना हवा असल्याचे व त्याकरिता त्यांनी माहिती अधिकाराच्या मार्गाचा अवलंब केला असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी व्यवस्थित न केल्यामुळे व या माहितीला कोणतेही निश्चित स्वरुप नसल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मूळ माहितीच अशा प्रकारे अवैध ठरत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील जरी फेटाळले असले तरी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीचे पालन केले नाही हे सत्य अंतिमतः उरत आहे. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारणा केली असता त्यांनी असे अवगत केले की, अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. जायभाये यांच्याकडून अपिलार्थीचा अर्ज व यासंदर्भातील माहिती सादर न केली गेल्यामुळे ते अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करत असून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जाचे व त्यासंबंधातील कागदपत्राचे जतन सार्वजनिक प्राधिकरणातील

कर्मचा-यांनी करणे हे त्यांचे कर्तव्य आहे याची जाणीव त्यांना येथे करुन देण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व अपील अर्जाची प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय औरंगाबाद यांनी केलेल्या उपेक्षेची आयोगाने गांभीर्यापूर्वक नोंद घेतली आहे. अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे जे कर्मचारी जबाबदार असतात त्यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे हे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईसाठी पात्र ठरत आहेत. सबब प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्जाच्या संबंधात जबाबदार असलेले त्यांच्या कार्यालयातील सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधीत सर्व सहायकावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. साळूंके कैलास प्रभाकरराव, मु. पो. गोलटगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५६

निर्णय दिनांक १६-०९-२००९

१ श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपिलार्थी
एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी,
नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रशासकीय विभाग, महानगरपालिका,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी फेरनोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्यांनी सदर अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न देवून अधिनियमातील कलम ७ (२) प्रमाणे नाकारल्याच्या कारणास्तव आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनाधिकृत बांधकामासंदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मुख्याध्यापक, जागृती प्राथमिक शाळा सी. टी. एस. नंबर १९३६७ व १९३९६ बन्सीलालनगर, औरंगाबाद यांना महानगरपालिकेच्या प्रशासकीय विभागाकडून दिनांक १३-०३-२००६ रोजी दिलेल्या नोटीशीसंदर्भात मनपाने केलेली कारवाई, चेअरमन कल्पना को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, बन्सीलालनगर यांना या सर्व्हे नंबरवर असलेल्या बांधकामाबाबत उप आयुक्त (महसूल) यांनी दिलेल्या नोटीसीवर मनपा प्रशासनाने केलेली कारवाई, प्रशासकीय अधिकारी, मनपा, औरंगाबाद यांना उप आयुक्त (महसूल) यांनी दिनांक ०२-०५-२००६ रोजी दिलेल्या आदेशावर मनपाने केलेली कारवाई - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०६-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती न देता दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना असे कळविले की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे इमारत निरीक्षक श्री. एम. आर. राजपूत यांच्याकडे आहेत व यासंदर्भात त्यांनी राजपूत यांच्याकडे विचारणा केली असून ही माहिती प्राप्त होताच ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी, मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे मागितली आहे ते प्रकरण मनपाचे इमारत निरीक्षक श्री. एम. आर. राजपूत यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्याशी संबंधीत असून या प्रकरणी याबाबत त्यांनी राजपूत यांना लेखी पत्राने कळवून मनपाकडे माहिती सादर करण्याचे सूचित केले आहे. तथापि त्यांना आवश्यक ते अभिलेखे श्री. राजपूत यांच्याकडून मिळाले नसल्यामुळे ते अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एकूण तीन मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती ते आता अपिलार्थीस देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, कल्पना को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, बन्सीलालनगर या सहकारी गृहनिर्माण संस्थेने त्यांच्याकडील भूखंडावरील खुल्या जागे (open space) वर शाळेचे बांधकाम, मनपाची कोणतीही परवानगी न घेता, केलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ मधील शाळेकडून खुलासा उपलब्ध झाला का ? झाला असल्यास मनपाचे समाधान झाले का ? ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कडून देय होत नाही. कारण ही माहिती अधिनियमातील तरतुर्दीशी विसंगत आहे. मात्र मुद्दा क्रमांक १ मधील सदर प्रकरणात खुलासा मिळाला नसेल तर प्रशासकीय विभागाने काय कारवाई केलेली आहे याची छायांकीत प्रत ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती देखील ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना देणे भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जास

अधिनियमातील कलम ७ (१) व्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मूळात प्रतिसाद दिला तो दिनांक १३-०६-२००८ रोजी म्हणजे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०९-०६-२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर. हे पाहता या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाकडे पूर्णतः दुर्लक्ष करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाकडे पूर्णतः दूर्लक्ष करुन संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार त्यांना माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे हे सर्व जण अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आयोगास अमान्य आहे. केवळ संबंधित इमारत निरीक्षकाने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित नस्ती त्यांच्याकडे ठेवल्याने अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले ही बाब महानगरपालिकेस भूषणावह नाहीच नाही परंतु जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या स्पष्टीकरणाने कोणत्याही जनसामान्यांचे समाधान होईल असे आयोगास वाटत नाही. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी संबंधित इमारत निरीक्षकाकडून ही नस्ती त्वरित प्राप्त करुन घेण्याची कबूली जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दिली आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित इमारत निरीक्षकाकडून या प्रकरणाशी संबंधित नस्ती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत प्राप्त करुन घ्यावी. जर या प्रकरणाशी संबंधित

नस्ती त्यांना संबंधित इमारत निरीक्षकाकडून प्राप्त झाली नाही तर त्यांनी संबंधित इमारत निरीक्षक श्री. एम. आर. राजपूत यांच्यावर फौजदारी कारवाई करावी व तसे अपिलार्थीस कळवावे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबधित इमारत निरीक्षक श्री. एम. आर. राजपूत यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे आवश्यक ती कारवाई करण्याची सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक १ अंशतः वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५७

निर्णय दिनांक १६-०९-२००९

१ श्री. अनिल सावळाराम देशमुख, : अपिलार्थी
भुखंड क्रमांक ३२ अ, एकदंत, शहानुरवाडी दर्गा रोड,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रशासकीय अधिकारी (वाल्मी),
जल व भूमि व्यवस्थापन संस्था, पैठण रोड, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह संचालक (वाल्मी),
जल व भूमि व्यवस्थापन संस्था, पैठण रोड, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०६-२००९ रोजी फेर नोंदणी झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वाल्मीच्या ई. पी. एफ. क्रमांक एम. एच. /एबी/८०३७९/३५ ची गट वर्ष

२०००-२००१ ते २००७-२००८ या कालावधीमध्ये जमा केलेल्या रकमेच्या तपशिलाच्या प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन ई. पी. एफ. पर्ची देण्याचे काम वाल्मी संस्थेचे नसून सहायक आयुक्त, भविष्य निर्वाह निधी यांच्या कार्यालयाचे असल्याचे व त्यांच्याकडून अपिलार्थीस अपिलार्थीच्या १९९९-२००० पर्यंतच्या पर्ची दिल्या असून उर्वरित कोणत्याही वर्षाच्या पर्ची त्यांना प्राप्त झाल्या नसल्याचे कळविले व सहायक आयुक्त कार्यालयातून या पर्ची प्राप्त होताच त्या अपिलार्थीस प्रदान करण्यात येतील, असे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८-०१-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सन २००५ ते जानेवारी २००८ पर्यंतच्या हिशोबाची बिनचूक आकडेवारी सहायक आयुक्त, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, संघटन, औरंगाबाद यांना ३० जानेवारी २००८ पर्यंत देण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन त्यांना त्यांचा ई. पी. एफ. क्रमांक ८०३७९/३२०४ च्या २००८-२००९ पर्यंतच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले तसेच त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या ई. पी. एफ. क्रमांक ८०३७९ च्या स्लीप्स त्यांनी एका बँकेकडे सादर केल्या असता त्या बँकेने या स्लीप्स चुकीच्या असल्याचे कारण

देऊन अपिलार्थीस कर्ज नाकारले, त्यामुळे त्यांना अचूक हिशोबाच्या स्लीप्स जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस ज्या ई. पी. एफ. क्रमांक ८०३७९ च्या स्लीप्स आवश्यक आहेत त्या त्यांनी आता अपिलार्थीस दिल्या असून या स्लीप सहायक आयुक्त, भविष्य निर्वाह निधी यांच्याकडून त्यांना प्रतिवर्षी जसजशा प्राप्त होत असतात तसतशा त्या संबंधितांना दिल्या जातात. या प्रकरणी दिनांक २४-०९-२००८ रोजी त्यांनी अपिलार्थीला सन २००७ पर्यंतच्या सर्व स्लीपा दिल्या आहेत. सन २००७-२००८ ची स्लीप त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०९-२००८ रोजी म्हणजे अपिलार्थीने आयोगाकडे द्वितिय अपील केल्यानंतर पुरविली आहे. या स्लीप्स केंद्रीय भविष्य निर्वाह निधीच्या कार्यालयाकडून ज्या स्वरुपात प्राप्त होतात त्याच स्वरुपात त्यांच्याकडून त्या संबंधितांना दिल्या जातात. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस सर्व स्लीपा दिल्या आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस देय असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आता त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर पूर्णतः दिली आहे व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नव्हती. अपिलार्थीस ही माहिती देण्याकरिता त्यांना सहायक आयुक्त, भविष्य निर्वाह निधी, औरंगाबाद यांच्या कार्यालयावर अवलंबून राहावे लागणार होते. हे कार्यालय केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या माहितीकरिता या कार्यालयाचा पाठपुरावा करण्याव्यतिरिक्त दुसरा कोणताही उपाय नव्हता. त्याप्रमाणे त्यांनी सहा. आयुक्त भ.नि.नि. यांचा पाठपुरावा करुन त्यांनी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे, याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या द्वितिय अपील अर्जात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व अपूर्ण माहिती पुरविली असल्याचे म्हटले आहे, तथापि यासंदर्भात कोणताही ठोस पुरावा त्यांनी आज रोजी आयोगासमोर सादर केला नाही. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांना फक्त जीपीएफ स्लीप घेऊन देण्याचे त्यांच्या अखत्यारित असले तरी त्या जसजशा प्राप्त होतात तसतशा त्या अपिलार्थीस देण्याइतपतच त्यांचे कर्तव्य आहे. त्यांचे कर्तव्य या प्रकरणी त्यांनी योग्य प्रकारे पार पाडले आहे. अपिलार्थीस त्यांना प्राप्त झालेल्या स्लीपवर दर्शविलेल्या रकमेबाबत जर काही आक्षेप असतील तर त्यांनी याबाबत सहायक आयुक्त, भविष्य निर्वाह निधी, औरंगाबाद यांच्याकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिल सावळाराम देशमुख, भुखंड क्रमांक ३२ अ, एकदंत, शहानुरवाडी दर्गा रोड,
औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (वाल्मी), जल व भूमि व्यवस्थापन संस्था, पैठण रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (वाल्मी), जल व भूमि व्यवस्थापन संस्था, पैठण रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५८

निर्णय दिनांक १६-०९-२००९

१ श्री. विश्वेश विजयकुमार शेटे, : अपिलार्थी
रंगार गल्ली, किल्ले धारुर, तालुका किल्ले धारुर,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर,
तालुका किल्ले धारुर, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर,
तालुका किल्ले धारुर, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे मिळवून देण्याची कृपा करावी जेणेकरुन त्यांना न्याय मिळेल अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे रंगारगल्ली, मेनरोड पाटीलगल्ली सध्याचे आयोध्यानगर (जुने कुंभार गल्ली)

इत्यादी मालमत्तेचे पीटीआर रजिस्टर व नकाशा रजिस्टर तपासणीसाठी मागितले होते. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०४-२००८ रोजी निर्णय देऊन या निर्णयाची प्रत अपिलार्थीस दिनांक ०८-०५-२००८ रोजी पाठविली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्याच्या संदर्भात अभिप्राय व्यक्त केले आहेत. मात्र त्यांच्या या अभिप्रायांचे समर्थन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अपिलार्थीच्या ज्या मूळ अर्जावर आधारीत आहे त्या अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अभिलेख्याची तपासणी करण्याची विनंती केली आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०४-२००८ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस आवश्यक असलेले अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले आहेत हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेली विनंती त्यांनी मान्य केली असल्याचे व अपिलार्थीस आवश्यक ते त्यांच्याकडील अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन दिल्याचे सिध्द होत आहे. परंतु अपिलार्थीचे त्यांना तपासणीसाठी उपलब्ध करुन दिलेल्या मूळ कागदपत्रावर आक्षेप आहेत. सार्वजनिक प्राधिकरणाकडील मूळ कागदपत्रामध्ये सूधारणा अथवा बदल आदेशित करणे हे माहिती अधिकार अधिनियमाच्या व्याप्तीबाहेरचे व

अव्यवहार्य देखिल आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या अभिलेख्यावर जर अपिलार्थीचे काही आक्षेप असतील तर त्यांनी या आक्षेपांची संचालक नगरपरिषद प्रशासन, मुंबई यांच्याकडे दाद मागून त्यांच्या आक्षेपाचे निराकरण करुन घ्यावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांच्या आयोगाकडील व्दितीय अपील अर्जाव्दारे नेमके काय म्हणावयाचे आहे याचा आयोगास बोध होत नाही व वरील परिच्छेदामधील वस्तुस्थितीचे अवलोकन करता अशा परिस्थितीत अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विश्वेश विजयकुमार शेटे, रंगार गल्ली, किल्ले धारुर, तालुका किल्ले धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर, तालुका किल्ले धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर, तालुका किल्ले धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५९

निर्णय दिनांक १६-०९-२००९

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, : अपिलार्थी
व्दारा- यक्रंस निवास, हनुमान व्यायाम शाळेसमोर,
अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग, प्रादेशिक कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग, प्रादेशिक कार्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निरीक्षक (तां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक संचालक (तां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या पत्रामध्ये दिलेली माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी

आहे. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा त्यांना कोणताही निर्णय विहित मुदतीत दिला नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकरे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीचा भंग केला असल्यामुळे त्यांच्यावर दंड व शिस्तभंग कारवाई करुन अपिलार्थीस अर्जानुसार सत्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग, औरंगाबाद यांच्याकडे त्यांनी केलेल्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या अर्जावर उपसंचालक कार्यालयाने केलेली कारवाई व इतर तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१-०६-२००८ रोजी निर्णय घेऊन सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०५-२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. तथापि मुद्दा क्रमांक १, ३ व ४ अंशतः 'शासन नियमांची सत्यप्रत व रक्कम अदा करणेबाबत' ही माहिती वगळता उर्वरित कोणतीही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणा-या स्वरुपात माहिती अपेक्षिली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीचे अथवा निर्णयाचे समर्थन करणारी कारणे देणे अशा प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाहीत, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ अंशतः ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती, मुद्दा क्रमांक ३ मधील शासनाच्या नियमाच्या सत्यप्रती व मुद्दा क्रमांक ४ मधील नियमाची सत्यप्रत व प्राचार्य यांना आदेशाची प्रत एवढी माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नाही तसेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली देखिल नाही असे आढळून येत आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती म्हणजेच अपिलार्थीचा दिनांक १०-०३-२००८ रोजीचा अर्ज उप संचालक कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर

त्या अर्जावर उप संचालक कार्यालयाने दि. १५-०४-२००८ पर्यंत केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती व या अर्जासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या सर्व सत्यप्रती त्यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील. मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्हताधारक अध्यापकास प्रतितास ७२ रु. देण्यासंदर्भात शासनाने पारीत केलेल्या परिपत्रकाची सत्यप्रत व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील फरकाची रक्कम देण्याबाबत काही शासकीय आदेश असल्यास त्या आदेशाची प्रत आणि जन माहिती अधिकारी यांनी प्राचार्यांना अपिलार्थीस फरकाची रक्कम अदा करणेसंदर्भात दिलेली माहिती ही अपिलार्थीस द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १४-०५-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अनिवार्य असतांना त्यांनी या प्रकरणी ११ दिवसाच्या विलंबाने प्रतिसाद देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी हे गैरहजर होते म्हणून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीशी सुसंगत नाही. जर या प्रकरणी त्यांनी वेळेत सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना यापूर्वीच प्राप्त झाली असती व अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची कदाचित वेळ आली नसती. जन अपिलीय अधिकारी यांनी इतःपर अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३ अंशतः व ४ अंशतः या मुद्दयावरील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा- यक्रंस निवास, हनुमान व्यायाम शाळेसमोर, अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक (तां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक (तां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३६०

निर्णय दिनांक १६-०९-२००९

१ श्री. कुर्ले सिद्राम रामलिंगप्पा, : अपिलार्थी
अधिव्याख्याता स्थापत्य,
पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह संचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागविली असता

तंत्रशिक्षण संचालनालय व सह संचालक तंत्रशिक्षण या कार्यालयांनी त्यांना माहिती देण्याची जबाबदारी टाळून त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून ही कार्यालये सात महिन्यापासून टाळाटाळ करत आहेत, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासकीय तंत्रनिकेतनात तंत्र शिक्षण संचालनालयाच्यामार्फत गठीत केलेल्या समितीने मंजूर केलेली वरिष्ठ श्रेणी देण्यासंदर्भात एकूण नऊ त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात प्रत्येकी नऊ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ९ त्रयस्थ पक्षांची नांवे दिली असून प्रत्येक प्राध्यापकाच्या पूर्व सेवेच्या जाहिरातीची प्रत, मुलाखतपत्र, समितीने नियुक्तीची शिफारस केलेले पत्र, निवड झाल्यानंतर नियुक्तीचे पत्र, सदर नियुक्तीस तंत्र शिक्षण संचालनालयाने मान्यता दिल्याचे पत्र, अधिव्याख्यात्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे अर्ज करतांना विहित मार्गाने अर्ज केल्याबाबतचा पुरावा, ज्या अभ्यासक्रमावर संबंधितांची नियुक्ती झाली होती त्या अभ्यासक्रमास ए. आय. सी. टी. ई. / शासनाची मान्यता असल्याबाबतच्या पत्राची प्रत, जी पूर्वसेवा जमेस धरली त्या सेवाकाळा-तील गोपनीय अहवालाची प्रत, पुर्वीच्या पदावरुन नियमित पदावर सेवेत येतांना सेवाखंड असेल तर सदर सेवाखंड शासनाने / संचालनालयाने क्षमापित केल्याचे पत्र ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास तंत्रशिक्षण संचालनालयाने दिनांक ०१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित माहिती संबंधित विभागीय कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सह संचालक तंत्रशिक्षण औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १४-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सह संचालक तंत्रशिक्षण कार्यालयाने त्यांच्या दिनांक २७-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस अपेक्षित

असलेली माहिती त्यांना तंत्रशिक्षण संचालनालयाकडून उपलब्ध होईल असे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०९-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण स्वरुपात व विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे. त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी श्री. ए. आर. थेटे यांच्याशी संबंधित कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही व श्री. एच. एस. कुलकर्णी यांच्या संदर्भात त्यांना फक्त त्यांच्या मूळ अर्जातील अनु. क्र. ४ शी संबंधित माहिती दिली व उर्वरित कोणत्याही मुद्दयावरील माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक ३०-०७-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्षासंदर्भात एकूण ९ मुद्दयाव्दारे माहिती मागविली आहे त्यापैकी त्रयस्थ पक्षाच्या गोपनीय अहवालाची प्रत ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र उर्वरित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यावाय नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील श्री. थेटे व श्री. एच. एस. कुलकर्णी या दोन त्रयस्थ पक्षाच्या व्यतिरिक्त उर्वरित त्रयस्थ पक्षाच्या संबंधित माहितीने ते समाधानी असल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ९ व्याख्यात्यांच्या संदर्भात होती. व्याख्यात्यांच्या नेमणुकीचे प्राधिकरण संचालनालय असून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रमाणित

प्रतीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सर्वसाधारण परिस्थितीत तंत्रशिक्षण संचालनालयाकडे उपलब्ध असावयास हवी. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस आता त्यांनी श्री. ए. आर. थेटे व श्री. एच. एस .कुलकर्णी यांच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८, (गोपनिय अहवाल प्रत ) वगळता उर्वरित संपूर्ण माहिती, त्यांनी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे पाठपुरावा करुन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस श्री. ए. आर. थेटे व श्री. एच. एस. कुलकर्णी यांच्या संदर्भात आवश्यक असलेली व वर निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती या कालावधीमध्ये उपलब्ध करुन दिली जाईल, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील श्री. ए. आर. थेटे व श्री. एच. एस. कुलकर्णी यांच्या संदर्भातील मुद्दा क्रमांक ८ वगळता, उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कुर्ले सिद्राम रामलिंगप्पा, अधिव्याख्याता स्थापत्य अभियांत्रिकी, पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३६१
निर्णय दिनांकः १६-०९-२००९

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपिलार्थी
रा.साताळा खुर्द, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांना हेतूपूर्वक चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्या शासकीय माहिती अधिकाऱ्यावर माहितीचा अधिकार अधिनियम कलम २० अन्वये कारवाई होण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

"दि. १० नोव्हेंबर, २००७ पासुन मौजे सताळा (खुर्द) ता.अहमदपूर येथील केंद्र सरकार पुरस्कृत नाविण्यपुर्ण व सहात योजनेतील संपूर्ण गोबरगॅसचे अप्रमाणीत आणि निकृष्ठ दर्जाचे बांधकाम करुन करण्यात आलेला भ्रष्टाचार उघडकिस येऊ नये?

यासाठी चक्रिय कार्य असलेल्या अधिकाऱ्यावर कठोर कार्यवाही करण्यासाठी मा. जिल्हाअध्यक्ष भ्रष्टाचार निर्मुलन समिती यांनी लिखित केलेल्या संपूर्ण कार्यवाहिचे सत्यप्रतीत माहिती मला अत्यंत आवश्यक आहे.

परंतु मा. शासकीय माहिती अधिकाऱ्यानी बुध्दिपुर्वक सदर योजनेतील भ्रष्टाचार उघडकिस येवु नये? म्हणुन शासनाचा आणि मला चुकिची व दिशाभुल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे."

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०४.१२.२००७ ते ०५.०१.२००८ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"दि. १० नोव्हेंबर, २००७ रोजी मी तुमच्या कार्यालयास सादर केलेल्या जनहितार्थ न्याय अर्जातील विषयास अनुसरुन मौ. सताळा (खुर्द), ता.अहमदपूर येथील केंद्र सरकार पुरस्कृत नाविण्यपुर्ण वसाहत योजनेतील गोबर गॅसचे अप्रमाणित आणि निकृष्ठ दर्जाचे बांधकाम करुन करण्यात आलेला भ्रष्टाचार उघडकीस येऊ नये?

म्हणून सक्रिय कार्यरत असलेल्या संघटीत अधिकाऱ्यावर विनाविलंब कठोर कार्यवाही करण्यासाठी.

जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती मार्फत केलेल्या लिखीत कार्यवाहीची सत्यप्रतीत माहितीची मला अत्यंत आवश्यकता आहे.

कारण राष्ट्रीय गोबरगॅस योजनेतील भ्रष्टाचार निर्मुलनार्थ, मी मुंबई उच्च न्यायालयात विशेष जनहितार्थ याचिका सादर करणार आहे.

करिता मे. साहेबांनी संबंधित माहिती सत्यप्रतित विनाविलंब उपलब्ध करुन दयावी. ही विनंती."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२८.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित माहिती अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यावर कारवाई करुन त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०२.२००८ रोजीचा निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या दरम्यान अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्या प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेकडून चौकशी अहवाल मागविल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस या चौकशी अहवालाची प्रत दि. १६.०२.२००८ रोजी पुरविली आहे व तसेच अपिलार्थीच्या या चौकशी अहवालावरील अभिप्रायाच्या संदर्भात जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीने घेतलेल्या निर्णयाची प्रत देखील अपिलार्थीस दि. ०२.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने

त्यांच्या दि. ०५.०१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली, वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली माहिती ही, स्पष्टपणे मांडलेली नाही. मात्र या मजकुरावरुन अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.११.२००७ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही अशी माहिती अपेक्षित असावी, असे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि. २८.०१.२००८ रोजी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची सद्यस्थिती त्यांनी अवगत करुन दिली आहे व तदनंतर दि. १६.०२.२००८ रोजी अपिलार्थीने मौ. सौताळा खु., ता.अहमदपूर येथील वसाहतीमधील गोबर गॅसच्या बांधकामासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रतही अपिलार्थीस पुरविली आहे. या अहवालावरुन अपिलार्थीने तदनंतर उपस्थित केलेल्या मुद्यांचाही परामर्ष घेऊन जिल्हाधिकारी यांनी अपिलार्थीस भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या दि. २६.०५.२००८ रोजीच्या इतिवृत्ताची प्रत दि.०२.०६.२००८ रोजी पुरविली आहे, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती वेळीच पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी, या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे,याचे कोणतेही लेखी समर्थन अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही अथवा त्यांचे म्हणणे तोंडी स्वरुपात आयोगाच्यासमोर मांडण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १६-०९-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर,रा.साताळा खुर्द, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७६६
निर्णय दिनांकः १६-०९-२००९

१. श्री. निलेश प्रकाशचंदजी कुचेरिया, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सामान्य रुग्णालय, परभणी

२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हा शल्य चिकित्सक,परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा सामान्य रुग्णालय,परभणी.

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा शल्य चिकित्सक,
परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत दखल घेतली नाही व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती चुकीची आणि अपूर्ण असल्याने व दिशाभूल करणारी माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - त्यांच्या इस्पितळाच्या बाह्य रुग्ण विभागाची वेळ व सी.टी. स्कॅनच्या शुल्कासंदर्भातील जी.आर.ची प्रत - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२९.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीस पुरविलेली माहिती व प्रत्यक्षातील वस्तुस्थिती यामध्ये विसंगती आढळल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी बाहय रुग्णालयाची वेळ सकाळी ०९.०० ते १२.३० व दुपारी ०४.३० ते ०५.३० अशी कळविली होती. बाहय रुग्ण विभागाच्या इमारतीत सकाळी ०८.३० ते १२.३० या कालावधीमध्ये इस्पितळात येणाऱ्या रुग्णांची नोंद करण्यात येते. बाहयरुग्ण विभागाशी संबंधित डॉक्टर हे सकाळी ०९.०० वाजेपासून येथे हजर असतात. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस सकाळी ०९.०० ते १२.३० अशी वेळ कळविली व तसेच त्यांच्या इस्पितळामधील सी.टी.स्कॅनची फी म्हणून रु.१००/- इतके शुल्क आकारले जाते, हे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, रुग्णांकडून घेण्यात येणारे सदरचे शुल्क शासकीय कोषागारात नियमाप्रमाणे जमा केले जात असून प्रत्येक रुग्णाला या शुल्काची पावती देण्यात येते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जिल्हा सामान्य

रुग्णालयाच्या बाहेर लावलेल्या फलकात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेली वेळ जरी बरोबर असली तरी त्यांनी प्रत्यक्षात अपिलार्थीस कळविलेली माहिती यापेक्षा वेगळी असल्याबाबत अपिलार्थीस कळवावयास हवे होते. ते त्यांनी कळविले नाही. सी.टी.स्कॅनच्या फीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, सर्वसाधारणपणे कोणत्याही रुग्णाचे सी.टी.स्कॅन झाल्यानंतर सी.टी.स्कॅनची फिल्म रुग्णास न देता त्यासंदर्भातील Data (Soft Copy) ते संगणकात संग्रहित करुन ठेवतात. शासनाच्या या संदर्भातील दि. १०.०७.२००१ च्या आदेशामध्ये सी.टी.स्कॅनच्या संदर्भात जे सुधारित दर दिले आहेत. त्यामध्ये रुग्णास सी.टी.स्कॅनची फिल्म देण्याचा अंतर्भाव नाही. रुग्णास केवळ अतिरिक्त वैद्यकीय सल्ला (Second Opinion) प्राप्त करुन घेणे सुलभ व्हावे म्हणून रुग्णाने मागणी केल्यास रु.१००/- इतके शुल्क आकारुन ते ही फिल्म रुग्णास देत असतात. यासंदर्भात त्यांना शासनाकडून अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडून कोणतेही आदेश प्राप्त नाहीत. केवळ 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर रुग्णास मदत करण्यासाठी त्यांनी ही पध्दत अवलंबिली आहे. यासंदर्भात शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१०.०७.२००१ च्या आदेशाचे अवलोकन करता, त्यामध्ये स्तंभ क्र. ४(७) व (८) चे अवलोकन करता सी.टी.स्कॅन या सुविधेकरिता रु. ३००/- ते ४००/- असे शुल्क नमूद केल्याचे दिसून येत आहे. मात्र यामध्ये जर सी.टी.स्कॅनची फिल्म संबंधित रुग्णास द्यावयाची असेल तर नेमकी किती फी आकारावयाची, याचा उल्लेख त्यामध्ये नाही, जो शासनाने करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या विभागातर्फे दि. १०.०७.२००१ रोजीच्या निर्णयामध्ये सी.टी.स्कॅन फिल्मच्या फीचा उल्लेख करुन त्याप्रमाणे आवश्यक ते शुध्दीपत्रक त्यांच्या स्तरावर तात्काळ जारी करावे. तसेच या निर्णयामध्ये ज्या इतर चाचण्यांचा उल्लेख केला आहे, त्या इतर चाचण्यांच्या अहवालासाठी रुग्णांना विनामूल्य द्यावयाची की जादा शुल्क आकारावयाचे, याचाही उल्लेख त्यांनी या निर्णयामध्ये केल्यास ते जनसामान्यांना सोयीचे होईल.

या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती व वस्तुस्थिती यामध्ये विसंगती असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. मात्र यावरुन अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सरपणे चुकीची अथवा दिशाभूल करणारी दिली आहे, असे मानता येणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वास्तवातील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती वास्तव स्वरुपात त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निलेश प्रकाशचंदजी कुचेरिया,द्वारा गुरु गणेश प्रोव्हिजन्स ॲण्ड कम्युनिकेशन, सरकारी दवाखान्यासमोर, सुभाष रोड,परभणी-४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

कृ.मा.प...५

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,परभणी यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७६७
निर्णय दिनांक: १६-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. नंदलाल मदनलाल गट्टाणी,<br>रा.परळी, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई,<br>जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिली, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१७.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या संदर्भातील एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०६.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस या प्रकरणा संदर्भात आयोगाच्या कोणत्याही प्रश्नांना उत्तरे देता आली नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.०८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे ज्या सहा मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती, त्यातील मुद्दा क्र. १ वगळता, उर्वरित ५ मुद्यांद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची स्पष्टीकरणे अपेक्षिणारी माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दि. १३.०१.१९७७ मध्ये हैद्राबाद लॅण्ड रेव्हेन्यू कोड १३१७ प्रमाणे दिलेल्या कलमाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांची मते व त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती त्यांच्याकडे मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दलची स्पष्टीकरणे अथवा

त्यासंदर्भात कारणे विचारणे हे मूळात त्यांना अनुज्ञेय नाही. तसेच विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीस जर महसूल प्राधिकरणाचा दि.१३.०१.७७ चा निर्णय मान्य नसेल तर त्यांना त्यांच्या गाऱ्हाण्याची तड लावण्याकरिता वेगळे स्वतंत्र व सक्षम प्राधिकरण उपलब्ध आहे, हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना आवश्यक असलेल्या निर्णयाकरिता त्यांनी सक्षम महसूल प्राधिकरणाकडे अथवा दिवाणी न्यायालयाकडे वेगळयाने अपील करावे. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या ६ मुद्यांपैकी ५ मुद्यांशी संबंधित माहिती तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस देय नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०९.२००७ रोजी म्हणजेच, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना विनामूल्य पुरविली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदलाल मदनलाल गट्टाणी, व्दारा-पायल मॅचिंग सेंटर,९ भाजी मार्केट,परळी (वै.), जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७६८
निर्णय दिनांक: १६-०९-२००९

१. श्री. पटेल जावेद गौसमियॉ, : अपिलार्थी
रा. औसा, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०९.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एकूण कर्मचाऱ्यांची यादी, पदनामासह मुख्यालयी राहत असलेले आणि पत्ते, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत एन.जी.ओ.साठी चालवत असलेल्या विविध योजना व जन माहिती अधिकारी

यांच्या कार्यालयामार्फत विविध अनुदानासाठी असलेल्या फॉर्मसाठी आकारण्यात आलेली किंमत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. मात्र या अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपात माहिती मागितली असून अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ चे अवलोकन करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही असे दिसून येत आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अशाप्रकारे मोघम स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. मात्र त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ व ३ शी संबंधित माहिती ही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींशी सुसंगत असल्याने देय होत आहे. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाला असल्याने, अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व ३ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती इतकी साधी होती की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फारसे कष्ट पडले असते, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती, जी विशेषत: माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी स्वयंप्रेरणेने घोषित करण्यासारखी माहिती आहे, ती देखील अपिलार्थीस न देऊन त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून निष्कारण वंचित ठेवले आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब संचालक, क्रीडा यांना, संबंधित जन माहिती अधिकारी (लातूर येथे जिल्हा क्रीडा अधिकारी या पदावर माहे सप्टेंबर ते ऑक्टोबर, २००७ या कालावधीत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व ३ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, क्रीडा यांना, संबंधित जन माहिती अधिकारी (लातूर येथे जिल्हा क्रीडा अधिकारी या पदावर माहे सप्टेंबर ते ऑक्टोबर, २००७ या कालावधीत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल जावेद गौसमियॉ, जलाल शाही चौक, औसा, ता.औसा,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, क्रीडा व युवक सेवा, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, म.रा.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७६९
निर्णय दिनांक: १६-०९-२००९

१. श्री. गौरीकुमार तुळजाराम फुलारी, : अपिलार्थी
लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर पालिका, लातूर

२. जन अपिलीय अधिकारी,
विभागीय आयुक्त (सामान्य प्रशासन),
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष : सचिव, स्नेहप्रभा सहकारी गृहनिर्माण संस्था

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०६.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी नको असलेली माहिती शुल्क आकारुन दिली. सदरचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी सूड भावनेने वसूल केले व ७९ दिवस इतक्या विलंबाने माहिती देऊनही अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क वसूल केले. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुन व त्यांच्याकडे सुनावणीस येणे भाग पाडून आर्थिक भुर्दंड सोसावा लागला. या सर्व कारणास्तव त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३०.०३.२००७ रोजीच्या (अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये हा दिनांक "३०.०३.२००६" असा दर्शविला आहे, जो चुकीचा आहे.) मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा भूखंड नाकारण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी गोळा केलेल्या हरकतीच्या प्रमाणित प्रतींची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, स्नेहप्रभा (भा.मा.)सह.गृह निर्माण संस्थेच्या संदर्भात वेगवेगळया कागदपत्रांच्या प्रतींचा समावेश आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती ३३ पृष्ठांची माहिती अपिलार्थीकडून रु.६६/- इतके शुल्क आकारुन अपिलार्थीस दिली. तथापि ही माहिती अपिलार्थीने अपेक्षिल्याप्रमाणे प्रमाणित स्वरुपात नव्हती. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.०५.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०६.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे व अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये जी अनावश्यक माहिती पुरविली आहे तीचे शुल्क अपिलार्थीस परत करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १३.०६.२००७ रोजी प्रमाणित माहिती पुरविली. ही माहिती देण्याकरिता त्यांनी अपिलार्थीकडून रु.१२/- इतक्या शुल्काची आकारणी केली व अपिलार्थीकडून पूर्वी प्राप्त करुन घेतलेले शुल्क रु. ६६/- उणे रु.१२/- याप्रमाणे रु. ५४/- इतके त्यांना परत केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.०८.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले होते. तथापि या अपील अर्जामध्ये त्रूटी असल्याकारणाने अपिलार्थीस त्या त्रूटी

दर्शविल्यानंतर त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे सदरचे द्वितीय अपील दि. ०६.०६.२००८ रोजी फेरसादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०९.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती सशुल्क पुरविल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, अपिलार्थीस त्यांनी मूळात दि. ०५.०५.२००७ रोजी प्रथम आवश्यक ती माहिती दिली होती. परंतु ही माहिती प्रमाणित नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याप्रमाणे त्यांनी दि. १३.०६.२००७ रोजी आवश्यक ती माहिती प्रमाणित करुन व त्या माहितीकरिता त्यांनी रु.१२/- इतके शुल्क आकारुन ती अपिलार्थीस दिली व अपिलार्थीकडून पूर्वी प्राप्त करुन घेतलेल्या शुल्कापैकी उर्वरित शुल्क रु.५४/- इतके अपिलार्थीस दि. १३.०६.२००७ रोजी परत केले. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०३.२००७ रोजी माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत होती. या अर्जास अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०४.२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अभिप्रेत होते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जो प्रथम प्रतिसाद दिला आहे, तोच अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ७(६) नुसार ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आपोआप विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीस माहिती विनामूल्य

देय होत असताना देखील अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क आकारण्याची या प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, असे सूचित करण्यात येते की, इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी. जन माहिती अधिकारी यांना पुढे असेही आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे आकारलेले शुल्क देखील त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही अभिप्राय त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत अथवा त्यानंतर सादर केल्याचे आढळून येत नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले संपूर्ण देय शुल्क त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.
३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गौरीकुमार तुळजाराम फुलारी, श्रीकृष्णनगर, लातूर-४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर पालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७७०
निर्णय दिनांक: १६-०९-२००९

१. श्री. सरदार हरजीतसिंग सहानी, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता (औरंगाबाद परिमंडळ),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.
(शहर विभाग-१),औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि..०१.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने या प्रकरणी, त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधितांच्याकडून दि.२७.०२.२००९ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ, अपिलार्थीचे कबूलीपत्र आयोगास सादर केले आहे.

या कबूलीपत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने ते समाधानी आहेत व त्यांना पूर्ण माहिती संबंधितांच्याकडून मिळाली आहे. अपिलाथीने सदर कबूलीपत्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०२.२००९ रोजी म्हणजेच त्यांनी आयोगाकडे दि.०१.११.२००७ रोजी केलेल्या द्वितीय अपील अर्जानंतर दिलेले

आहे. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २७७०/०७, दि. ०१.११.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०९-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सरदार हरजीतसिंग सहानी,घर नं.५-१-५५/१,उस्मानपूरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (औरंगाबाद परिमंडळ),महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.(शहर विभाग-१),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.